तैं जीवीं स्वयंभ सुख वाढे। मग आंत बाहेर दोहींकडे। करी वाडेंकोडें समसाम्य ॥ १२ ॥ जें कथेचें गोडपण। जीव गेल्या न सोडी जाण। ऐसें रसाळ निरूपण। उद्धवासी श्रीकृष्ण सांगेल ॥ १३ ॥ श्रवणें उपजे ब्रह्मभावो। तो हा अठ्ठावीसावा अध्यावो। उद्धवासी देवाधिदेवो। निजकृपें पहा हो सांगेल ॥ १४ ॥ अक्षरें भरोनि अक्षररसीं। देव सांगेल उद्धवासी। तें निरूपण अठ्ठाविसाव्यासी। ब्रह्मसुखेंसी उलगडेल ॥ १५ ॥ ब्रह्मसुखाची सांठवण। तो हा अठ्ठाविसावा जाण। तें उघडूनियां उणखूण। उद्धवासी श्रीकृष्ण सांगेल ॥ १६ ॥ कृष्णउद्धवनिजज्ञान। एका विनवी जनार्दन। तुमचे कृपेंकरूनि पूर्ण। श्रोतां अवधान मज द्यावें ॥ १७ ॥ श्रोतां दीधल्या अवधान। ग्रंथीं उल्हासे निरूपण। एका जनार्दना शरण। शिरीं श्रीचरण वंदिले ॥ ४१८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां सप्तविंशोऽध्यायः ॥ २७ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवतमहापुराणे एकादशस्कन्धे सप्तविंशोऽध्यायः ॥ २७ ॥

अध्याय अठ्ठाविसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमो सद्गुरु परमा। जय जय सद्गुरु पुरुषोत्तमा। जय जय सद्गुरु परब्रह्मा। ब्रह्मा ब्रह्मनामा तुझेनी ॥ १ ॥ जय सद्गुरु चिदैक्यस्फूर्ती। जय सद्गुरु चिदात्मज्योती। जय सद्गुरु चिन्मूर्ती। मूर्तामूर्तीं चिद्रूप ॥ २ ॥ जय जय सद्गुरु सत्क्षेत्रा। जय जय सद्गुरु सत्पात्रा। जय जय सद्गुरु सन्मात्रा। सदैकाक्षरा सद्रूपा ॥ ३ ॥ जय जय सद्गुरु स्वानंदमान। जय जय

आंत बाहेर तें साम्यानें भरून रहातें. १२ ज्या कथेची गोडी जीव गेला तरी सोडवत नाहीं, असें रसाळ निरूपण श्रीकृष्ण करणार आहे. १३ त्याच्या श्रवणानें मनांत ब्रह्मभाव उद्भवतो. तो अठ्ठाविसावा अध्याय श्रीकृष्ण उद्धवाला मोठ्या कृपेनें सांगणार आहे. १४ प्रत्येक अक्षर अक्षररसानेंच भरून देव उद्धवाला सांगणार आहे. तें अठ्ठाविसाव्या अध्यायाचें निरूपण ब्रह्मसुखानें परिपूर्ण होईल. १५ हा अठ्ठाविसावा अध्याय ब्रह्मसुखाचा सांठाच आहे. तो उघडून त्यांतील अर्थ श्रीकृष्ण उद्धवाला सांगेल, १६ हे श्रीकृष्ण-उद्धवाचें आत्मज्ञान आहे. एकनाथ जनार्दनस्वामींना विनवीत आहे कीं, तुमच्या कृपेनें श्रोत्यांनीं मजकडे लक्ष द्यावें, १७ कारण श्रोत्यांनीं सावधान चित्तानें श्रवण केल्यास ग्रंथाच्या निरूपणांत उल्हास वाढतो. एकनाथ जनार्दनास शरण जाऊन त्याच्या चरणांना शिरसा वंदन करीत आहे. ४१८.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील क्रियायोग नांवाचा सत्ताविसावा अध्याय समाप्त झाला.

परम सद्गुरूंना नमस्कार असो. पुरुषोत्तम, परब्रह्म सद्गुरूचा जयजयकार असो. हे गुरो ! ब्रह्माला 'ब्रह्म' हें नांव तुझ्यामुळेंच प्राप्त झालें. चिदैक्य स्फूर्तिरूप सद्गुरूचा जयजयकार असो. हें ज्ञानात्मज्योति, ज्ञानमूर्ति, मूर्त अमूर्तांतील चिद्रूप, ३ सत्क्षेत्र, सत्पात्र, सन्मात्र, सदैकाक्षर, सद्रूप, स्वानंदघन, जय सद्गुरो ! तुझ्यामुळेंच आनंदाला

सद्गुरु स्वानंदपूर्ण । जय जय सद्गुरु स्वानंदघन । आनंदा गोडपण तुझेनी ॥ ४ ॥ जय जय देवाअग्रगणी- जय जय देवशिरोमणी । सकळ देव लागती चरणीं । देवचूडामणी गुरुराया ॥ ५ ॥ जय जय जीवादि- जीवा । जय जय जीवशिवादिशिवा । जय जय देवादिदेवा । जय जय अभिनवा गुरुराया ॥ ६ ॥ जय जय सद्गुरु सुखसंपन्ना । जय जय सद्गुरु सुखनिधाना । जय जय सद्गुरु सुखैकघना । सुखा सुखपणा तुझेनी ॥ ७ ॥ तुझेनि सुखें निजसुख घडे । तुझेनि बोधें निजबोध आतुडे । तुझेनि ब्रह्मा ब्रह्मत्व जोडे । तुझे पडिपाडें तूंचि एकू ॥ ८ ॥ ऐसा श्रीगुरु तूं अनंत । तुझ्या स्वरूपासी नाहीं अंत । तो तूं होऊनि कृपायुक्त । निजरूपें बोधित निजभक्तां ॥ ९ ॥ आपुलें निजरूप बोधून । नुरविशी देवभक्तपण । त्याहीवरी निजभजन । अद्वयें पूर्ण करविशी ॥ १० ॥ गंगा मिळोनि सागरीं । मीनली तळपे तयावरी । तेवीं भक्त मिळोनि तुजमाझारीं । तुझें भजन करी तुझेनी ॥ ११ ॥ अद्वय करितां तुझी भक्ती । तूं संतोषसी यथानिगुती । संतोषोनि शिष्याहातीं । निजात्मसंपत्ति अर्पिशी ॥ १२ ॥ अर्पूनि निजात्मभर भारू । शिष्य गुरुत्वें करिशी थोरू । हा अतिलाघवी चमत्कारू । अतर्क्य विचारू तर्केना ॥ १३ ॥ जें अतर्क्य वेदशास्त्रांसी । ज्यालागीं वेद विवादिती अहर्निशीं । तें तूं क्षणार्धें बोधिसी । सच्छिष्यासी निजबोधें ॥ १४ ॥ तुझ्या निजबोधाची हातवटी । पढतां वेदवेदांतकोटी । तरी अलक्ष्य लक्षेना दृष्टीं । सर्वार्थी गोष्टी अगम्य ॥ १५ ॥ बहुत कळलें कळलें म्हणती । नाना परीच्या युक्ति चाळिती । परी ते न कळोनि बोसणती । जेवीं शुक बोलती सुभाषितें ॥ १६ ॥ यालागीं तुझी बोधकशक्ती । अगम्य सर्वांशीं सर्वार्थी । तुझी लाघल्य कृपायुक्ती । अगम्य पावती सुगमत्वें ॥ १७ ॥ जे अगम्य श्रीभागवत । त्याहीमाजीं एकादशार्थ । प्राकृत करविला यथार्थ । बाप समर्थ कृपाळू ॥ १८ ॥ दधि मंथूनि समस्त । जेवीं माता काढी नवनीत । तें बाळकाहातीं देत । तैसें केलें येथ जनार्दनें

गोडपणा आला आहे. ४ हे देवांतील अग्रगण्य देवशिरोमणे, देवचूडामणे, गुरुराया, ५ सगळे देव तुझ्या चरणीं लागतात. हे जीवाच्या आदिजीवा, शिवाच्या आदिशिवा, देवांच्या आदिदेवा, अभिनव गुरुराया, ६ सुखसंपन्न, सुखनिधान, सुखैक्यघन सद्गुरो, तुझा जयजयकार असो. तुझ्यामुळेंच सुखाला सुखपणा आला आहे. ७ तुझ्या बोधानें आत्मसुख लाभतें, आत्मज्ञान होतें व ब्रह्माला ब्रह्मत्व येतें. तुझ्यासारखा तूंच एक आहेस. ८ असा तूं श्रीगुरु अनंत आहेस. तुझ्या स्वरूपाला अंत नाहीं. तूं कृपायुक्त होऊन आपल्या भक्तांना आत्मरूपानें बोध करितोस. ९ आपल्या आत्मस्वरूपाचा उपदेश करून देव-भक्तपण उरूं देत नाहींस. उलट त्यांच्याकडून अद्वैतभावनेनें आत्मभजन करवितोस. १० गंगा समुद्राला जाऊन मिळाली म्हणजे जशी शोभते, त्याप्रमाणें भक्त तुझ्याशीं एकरूप होऊन तुझ्यांत राहून तुझेंच भजन करितात. ११ तुझी ऐक्यभावानें भक्ति केली असतां तुला अत्यंत संतोष होतो आणि तूं प्रसन्न होऊन शिष्याला आपली आत्मज्ञानाची संपत्ति अर्पण करितोस. १२ तूं आपल्या शिष्याला आत्मस्वरूपानें गुरुत्व देऊन श्रेष्ठ करितोस. हा तुझा चमत्कार मोठा आश्चर्यकारक आहे. या अतर्क्य विचारापुढें तर्क चालतच नाहीं. १३ जे वेदशास्त्रांसहि अतर्क्य, ज्यासाठीं वेद, रात्रंदिवस वाद करीत असतात, तें आत्मज्ञान तूं आपल्या सच्छिष्याला एका क्षणांत उपदेशितोस. १४ वेद-वेदान्तांच्या कोट्यवधि पठनानें तुझ्या आत्मज्ञानाचा थांग लागत नाहीं, इतकें तें अगम्य आहे. पुष्कळ विद्वान् 'आम्हांला ब्रह्मज्ञान कळलें, कळलें' म्हणून बोलतात आणि अनेक प्रकारच्या युक्त्या लढवितात. परंतु पोपट जसा पढविलेलीं सुबोध वचनें बोलतो, तसेंच त्यांचें तें अर्थरहित बरळणें असतें. १६ म्हणून तुझी आत्मज्ञान ठसविण्याची शक्ति सर्वांना अगम्य आहे. तुझी कृपादृष्टि लाभली असतां अगम्यज्ञानहि सोपें होतें. १७ हें जें अगम्य भागवत, त्यांतहि हा एकादश स्कंध (अत्यंत गहन असतां) तूं त्याचा प्राकृतांत यथायोग्य अर्थ करविलास. असा तूं सद्गुरु कृपाळू व समर्थ आहेस. १८ माता जशी दहीं घुसळून त्यांतील सगळें लोणी काढते आणि तो गोळा बाळाच्या हातावर देते,

॥ १९ ॥ वेदशास्त्रांचें निजमथित । व्यासें काढिलें श्रीमहाभागवत । त्या भागवताचा मथितार्थ । जाण निश्चित एकादश ॥ २० ॥ त्या एकादशाचें गोडपण । सर्वथा नेणें मी आपण । तें जनार्दनें करूनि कथन । सारांश पूर्ण मज दीधला ॥ २१ ॥ तो स्वभावें घालितां तोंडीं । लागली एकादशाची गोडी । त्या गोडपणाच्या आवडीं । टीका चढोवढी चालिली ॥ २२ ॥ यालागीं एकादशाची टीका । एकला कर्ता नव्हे एका । एकीं एक मिळोनि देखा । ग्रंथ नेटका निर्वाळिला ॥ २३ ॥ मागेंपुढें एक एका । हें एकादशाचें स्वरूप देखा । तणें एकपणें चालिली टीका । साह्य निजसखा जनार्दन ॥ २४ ॥ जनार्दनें पैं आपुलें । एकीं एकपण दृढ केलें । तेंचि एकादशाचें अर्था आलें । एकीं मीनलें एकत्वें ॥ २५ ॥ जेवीं जेवणीं गोड घांस । तेवीं भागवतीं एकादश । त्याहीमाजीं अष्टाविंश । अतिसुरस साजिरा ॥ २६ ॥ सर्वांगीं शिर प्रधान । तैसा अठ्ठाविसावा जाण । तेथील जें कां निरूपण । तो स्वानंद जाण सोलींव ॥ २७ ॥ तो हा अठ्ठाविसावा अध्यावो । ब्रह्मसुखाचा निजनिर्वाहो । उद्धवें न पुसतां पहा हो । स्वयें देवाधिदेवो सांगत ॥ २८ ॥ उद्धवें न करितां प्रश्न । कां सांगताहे श्रीकृष्ण । ये अर्थाचें निरूपण । सावधान परियेसा ॥ २९ ॥ उद्धव कृष्णोक्तीं निजज्ञान । पावोनि झाला ज्ञानसंपन्न । तेणें येऊं पाहे ज्ञानाभिमान । जाणपण अनिवार ॥ ३० ॥ जग मूर्ख मी एक ज्ञाता । ऐशी चढेल जें अहंता । तें गुणदोषांची कथा । दावील सर्वथा सर्वत्र ॥ ३१ ॥ जेथ गुणदोषांचें दर्शन । तेथ निःशेष मावळे ज्ञान । येथवरि ज्ञानाभिमान । बाधक जाण साधकां ॥ ३२ ॥ अभिमान बाधी तोहि सदाशिवा । तोही आणिला जीवभावा । तेथ मनुष्याचा कोण केवा । अहंतत्त्वें जीवा मुक्तता कैंची ॥ ३३ ॥ यापरी गुणदोषांचें दर्शन । जैं ईश्वर देखे आपण । तोही नाडू पावे जाण । इतरांचाकोण पडिपाडू ॥ ३४ ॥ यापरी गुणदोदर्शन । साधकां बाधक होय पूर्ण । यालागीं त्याचें निवारण । न करितां प्रश्न हरि सांगे ॥ ३५ ॥ बाळक नेणें निजहिता । तेथ साक्षेपें प्रवर्ते माता । तेवीं

तसें जनार्दनस्वामीनें केलें. १९ वेद-शास्त्राचा मथितार्थ काढून व्यासानें महाभागवत केलें. त्या भागवताचा सारांश हा अकरावा स्कंध आहे, हें निश्चित जाण. २० त्या अकराव्या स्कंधाची गोडी मला स्वतःला कळेना, तेव्हां जनार्दन स्वामीनें त्याचें मथन करून मला त्याचा संपूर्ण सारांश काढून दिला. २१ तो मी स्वभावतःच तोंडांत टाकितांच मला त्याची गोडी लागली आणि त्या गोडपणाच्या आवडीनें मी उत्तरोत्तर अधिक प्रासादिक टीका लिहिली. २२ म्हणून या एकादशस्कंधाची टीका करणारा मी एकटा नव्हे, तर एकामध्यें एक मिळवून हा ग्रंथ पुरा केला. २३ मागें एक व पुढें एक, हेंच अकरा या संख्येचें स्वरूप आहे. (किंवा मागें पुढें सगळें एकच अद्वैत या एकादशस्कंधांत प्रतिपादिलें आहे.) त्यानें एकत्वानेंच टीका चालविली. त्यांत साह्यकर्ता निजसखा जनार्दन आहे. २४ जनार्दनानें आपलें एकपण एकामध्येंच कायम केलें. तेंच या स्कंधाच्या अर्थांत सांगितलें आणि एकांतच ऐक्यरूपानें लीन झालें. २५ जेवणांतील गोड घासासारखा हा एकादश स्कंध आहे. त्यांतहि अठ्ठाविसावा अध्याय अत्यंत सुरस व सरस आहे. २६ शरीराच्या सगळ्या अवयवांत मस्तक जसें प्रधान असतें तसा हा अठ्ठाविसावा अध्याय आहे. त्यांतील निरूपण शुद्ध ब्रह्मानंदच आहे. २७ ब्रह्मसुखाचा ठेवाच असा हा अठ्ठाविसावा अध्याय उद्धवानें न विचारतां देवाधिदेव श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. २८ उद्धवानें प्रश्न न करितांच श्रीकृष्णानें कां सांगितलें, याचेंहि कारण लक्षपूर्वक ऐका. २९ श्रीकृष्णाच्या वचनानें आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर उद्धवाला अनिवार ज्ञानाभिमान वाटूं लागला. ३० ' सगळें जगत् मूर्ख व मी काय तो ज्ञानी ' असा अभिमान त्याच्या मनांत वाढेल म्हणून श्रीकृष्ण गुण-दोषांचें निरूपण करीत आहे. ३१ जेथें गुण-दोषांचें दर्शन होतें तेथें ज्ञान निःशेष मावळतें. असा ज्ञानाभिमान साधकाला बाधक आहे. ३२ अभिमानाची बाधा होतांच सदाशिवालाहि जीवपणा भोगावा लागला. मग त्याच्या पुढें मनुष्यांचा काय पाड ! अहंकारानें जीवाला मुक्ति कोठची ! ३३ त्याप्रमाणें गुण-दोषांचें दर्शन होतांच ईश्वरालाहि जर तें बाधक होतें व तोहि जर नाडला जातो तर मग इतरांची काय कथा ! ३४ याप्रमाणें साधकांना गुणदोषदर्शन पूर्णपणें अनर्थकारक आहे. म्हणून त्याच्या निवारणाचा उपाय न विचारतांच हरि सांगत आहे. ३५ बालकाला आपलें हित कळत नसतें; परंतु त्याची माता

उद्धवाचे निजस्वार्था । श्रीकृष्णनाथा कळवळा ।। ३६ ।। ज्ञानाभिमानाचें बाधकपण । सर्वथा साधकां न कळे जाण । यालागीं न करितांही प्रश्न । त्याचें निराकरण हरि सांगे ।। ३७ ।। उद्धव जन्मला यादववंशीं । यादव निमती ब्रह्मशापेंसीं । तेथ वांचवावया उद्धवासी । संपूर्ण ब्रह्मज्ञानासी हरि सांगे ।। ३८ ।। जेथ देहातींत आत्मज्ञान । तेथ न बाधी शापबंधन । हे जाणोनियां श्रीकृष्ण । पूर्ण ब्रह्मज्ञान उपदेशी ।। ३९ ।। जेवीं साकरेवरी माशी । तेवीं कृष्णमूर्तीपाशीं । प्रीति जडली उद्धवासी । भाव एकदेशी दृढ झाला ।। ४० ।। कृष्णापासूनि दूरी जातां । उद्धव प्राण सांडील तत्त्वतां । ते मोडावया एकदेशी अवस्था ब्रह्मसमता हरि सांगे ।। ४१ ।। एकदेशी झाला भावो । तो श्रीकृष्णा नावडे पहा हो । यालागीं देवाधिदेवो । ब्रह्मसमन्वयो हरि सांगे ।। ४२ ।। उद्धव असतां कृष्णाजवळी । ब्रह्मशापें होईल होळी । यालागीं त्यासी वनमाळी । सर्व ब्रह्मसुकाळीं घालूं पाहे ।। ४३ ।। कृष्णावेगळा उद्धव जातां । वियोग बाधीना त्याचिया चित्ता । ऐशी पावाया सर्वगतता । उद्धवा सर्वथा हरि बोधी ।। ४४ ।।

श्री० भ०–परस्वभावकर्माणि न प्रशंसेन्न गर्हयेत् । विश्वमेकात्मकं पश्यन्प्रकृत्या पुरुषेण च ॥ १ ॥

जो निःशब्दाचा सोलींव शब्द । ज्याचे निःश्वासें जन्मले वेद । उद्धवहितार्थ गोविंद । ज्ञान विशुद्ध स्वयें सांगे ।। ४५ ।। संसारीं मुख्य तिन्ही गुण । त्रिगुणांस्तव त्रिविध जन । त्यांचे स्वाभाविक कर्म जाण । शांत दारुण आणि मिश्र ।। ४६ ।। त्या कर्मांचें निंदास्तवन । सर्वथा न करावें आपण । एकाचे वानिता भलेपण । इतरां कुडेपण तेणेंचि बोलें ।। ४७ ।। पांचामाजी भलेपण । एकाचें वानितां

आपणच त्याच्या हितासाठीं झटत असते. त्याप्रमाणें उद्धवाला आत्मस्वार्थ साधतां यावा म्हणून श्रीकृष्णनाथ कळवळला. ३६ ज्ञानाभिमान बाधक होतो, हें साधकाला सर्वथा कळत नाहीं. म्हणून प्रश्न केल्यावांचून हरि त्याच्या निवारणाचा उपाय सांगत आहे. ३७ उद्धव यादवकुळांत जन्मला होता. यादवांचा ब्राह्मणांच्या शापानें नाश होणार होता. त्या वेळीं उद्धवाला वांचविण्यासाठीं हरि त्याला संपूर्ण ब्रह्मज्ञान सांगत आहे. ३८ जेथें देहातीत आत्मज्ञान होतें, तेथें शापाचें बंधन बाधत नाहीं. हें जाणून श्रीकृष्ण पूर्ण ब्रह्मज्ञानाचा उपदेश करीत आहे. ३९ साखरेवर माशी जशी लोलुप होऊन बसते, तशी श्रीकृष्णावर उद्धवाची प्रीति जडली होती. त्याची त्याजवरील एकदेशी आसक्ति दृढ झाली होती. ४० श्रीकृष्णापासून दूर जातांच उद्धव तत्काळ प्राण सोडील ही त्याची एकदेशी भावना घालविण्यासाठीं हरि ब्रह्मसमता सांगत आहे. ४१ उद्धवाचा हा एकदेशी भाव हरीला आवडला नाहीं, म्हणून देवाधिदेव त्याला ब्रह्मसमन्वय म्ह० ब्रह्माची सर्वत्र अनुवृत्ति सांगत आहे. ४२ उद्धव श्रीकृष्णाजवळ राहिला तर ब्राह्मणाच्या शापानें त्याचीहि होळी होणार म्हणून श्रीकृष्ण त्याला ब्रह्मसुखांत ठेवूं पहात आहे. ४३ कृष्णापासून दूर गेलें असतांहिं उद्धवाच्या मनाला वियोग बाधूं नये, अशा सर्वगत व्यापकतेचा उपदेश श्रीहरी करीत आहे. ४४.

[या अठ्ठाविसाव्या अध्यायांत पूर्वीं विस्तारानें वर्णिलेल्या ज्ञानयोगाचेंच पुनः संक्षेपानें वर्णन करितात.]

श्री० भ० उवाच- श्रीभगवान् म्हणाले–परस्वभावकर्माणि न प्रशंसेत न गर्हयेत्–दुसऱ्यांच्या शांत, घोर इत्यादि स्वभावकर्मांची प्रशंसा करूं नये व निंदा करूं नये. कारण प्रकृत्या पुरुषेण च विश्वं एकात्मकं पश्यन्–ज्ञानी प्रकृति व पुरुष या रूपानें सर्व विश्वाला एकरूप पहातो. १.

जो निःशब्दाचा केवळ गाभाच, ज्याच्या श्वासोच्छ्वासापासून वेद निपजले, तो गोविंद उद्धवाच्या हितासाठीं शुद्ध ज्ञान स्वतः सांगूं लागला. ४५ संसारांत मुख्य तीन गुण आहेत. त्या गुणांमुळें लोक तीन प्रकारचे झाले आहेत. त्यांचें शांत, दारुण व मिश्र असें त्रिविध कर्म आहे. ४६ त्या त्यांच्या कर्मांची निंदा किंवा स्तुति आपण करूं नये. कारण एकाचा भलेपणा वाखाणिला असतां दुसऱ्याकडे बुरेपणा सहज येतो. ४७ पांच मंडळी बसली असतां त्यांतील एकाच्या भलेपणाची आपण स्तुति केल्यास इतर चौघांची सहजच निंदा केल्याप्रमाणें होतें. ४८ शरीराची

आपण । इतर जे चौघेजण । सहजें जाण निंदिले ॥ ४८ ॥ वामसव्य उभय भाग । दों नांवीं एकचि अंग । तेवी प्रकृतिपुरुषात्मक जग । चिद्रूपें चांग एकत्वें ॥ ४९ ॥ जग ब्रह्मरूप परिपूर्ण । यालागीं निंदा आणि स्तवन । भूतमात्राचें आपण । कदाही काळीं जाण न करावें ॥ ५० ॥ सर्व भूतांच्या ठायीं आत्माराम असे पाहीं । यालागीं निंदास्तुति कांहीं । प्राणांतें पाहीं न करावी ॥ ५१ ॥ उद्धवा निंदा-स्तुतीची कथा । सांडीं सांडी गा सर्वथा । तरीच पावशी परमार्था निजस्वार्था । निजबोधू ॥ ५२ ॥ सर्व भूतीं भगवद्भाव । हा ब्रह्मस्थितीचा निर्वाह । यासी कदा नव्हे अपाव । ऐक तो भाव उद्धवा ॥ ५३ ॥ जेथूनि येवूं रिघे अपाव । तेथें दृढ वाढल्या भगवद्भाव । तेव्हां अपायचि होय उपाव । विघ्नासी ठाव असेना ॥ ५४ ॥ हे स्थिति सांडूनियां दूरी । मी ज्ञाता हा गर्व धरी । निंदास्तुतीच्या भरोवरी । तो अनर्था माझारीं निमग्न ॥ ५५ ॥

परस्वभावकर्माणि यः प्रशंसति निन्दति । स आशु भ्रश्यते स्वार्थादसत्यभिनिवेशतः ॥ २ ॥

मी एक सर्वज्ञाता पूर्ण । ऐसा धरोनि ज्ञानाभिमान । जगाचे देखे दोषगुण । निंदी ब्राह्मण मुख्यत्वें ॥ ५६ ॥ पराचें स्वाभाविक कर्म । स्वयें निंदणें हा अधर्म । हनुमंत ज्ञाता परम । त्यास वानरी कर्म सोडीना ॥ ५७ ॥ नारद ज्ञातेपणें मोठा । सत्य मानला श्रेष्ठश्रेष्ठां । तोही कळिक्रावा कळिलाटा स्वभावचेष्टा अनिवार ॥ ५८ ॥ गरुड देवाचें वाहन । सदा तिष्ठे हात जोडून । तोही करी सर्पभक्षण ऐसें कर्म जाण स्वाभाविक ॥ ५९ ॥ विचारितां जग त्रिगुण । गुणानुसारें कर्माचरण । तेथ पाहतां दोषगुण । दोषी जाण पाहे तो ॥ ६० ॥ जगीं पहावीं एकात्मता । हे ब्रह्मस्थिति गा सर्वथा । सांडूनि गुणदोष पाहतां । तो निजात्मघाता प्रवर्ते ॥ ६१ ॥ स्वभावें भेटल्या सज्जन । शोधूनि पाहे दोषगुण ।

डावी व उजवी बाजू हे जसे एकाच अंगाचे दोन भाग आहेत, तसें हे प्रकृति पुरुषापासून झालेलें जगत् चिद्रूपानें एकच आहे. ४९ हें जगत् परिपूर्ण ब्रह्मरूप आहे. यास्तव आपण प्राणिमात्राची निंदा किंवा स्तुति कधींकाळींहि करूं नये. ५० सर्व भूतांमध्यें आत्माराम आहे. यास्तव त्यांची निंदा-स्तुति प्राणान्तींहि करूं नये. ५१ हे उद्धवा ! निंदा-स्तुतीची गोष्ट सर्वथा सोडून दे. तरच तूं आत्मबोधानें आपला स्वार्थ साधशील व परमार्थाला प्राप्त होशील. ५२ सर्व भूतांत ब्रह्मभाव पहाणें हेंच ब्रह्मस्थितीचें लक्षण आहे. याचा कधींहि नाश होत नाहीं. तो भाव आतां ऐक. ५३ जेथून अपाय प्रवेश करीत असेल, तेथेंच भगवद्भाव दृढ वाढल्यास तो अपायच उपाय होतो व विघ्नाला जागाच मिळत नाहीं. ५४ या स्थितीचा सर्वथा त्याग करून जो 'मी ज्ञानी' असा गर्व वहातो, तो निंदा-स्तुतीच्या भरांत स्वतःच अनर्थांत पडतो. ५५.

—उलटपक्षीं दोष सांगतात—

यः परस्वभावकर्माणि प्रसंसति निन्दति च—जो दुसऱ्यांचे स्वभाव आणि कर्में यांची प्रशंसा व निंदा करितो **सः असति अभिनिवेशतः स्वार्थात् आशु भ्रश्यते**—तो मिथ्या पदार्थांतील अभिनिवेशामुळें ज्ञाननिष्ठालक्षण स्वार्थापासून सत्वर भ्रंश पावतो. २.

'मीच काय तो पूर्ण, सर्वज्ञ' असा ज्ञानाभिमान धरून जो जगाचे गुण-दोष पहातो व मुख्यत्वें करून ब्राह्मणांची निंदा करितो, ५६ त्या दुसऱ्याच्या स्वाभाविक कर्मांची आपण निंदा करणें हा अधर्म आहे. हनुमान इतका ज्ञानी; पण त्याच्या माकडचेष्टा गेल्या नाहींत. ५७ नारद अत्यंत ज्ञानसंपन्न, श्रेष्ठांनाहि पूज्य; परंतु त्याचा कळी लावण्याचा मूळ स्वभाव अनिवार आहे. ५८ गरुड एवढा देवाचें वाहन, सदा हात जोडून उभा रहाणारा; पण तोहि सर्पभक्षण करितो. असें हें स्वाभाविक कर्म असतें. ५९ जगाचा विचार केला असतां तें त्रिगुणयुक्त आहे. जीवा-गुणानुसार कर्में करीत असतात. तेथें गुण-दोष पाहूं गेल्यास पहाणाराच दोषी ठरतो. ६० जगांत एकात्मता पहावी, हीच खरी ब्रह्मस्थिति आहे. ती सोडून जो गुण-दोष पहातो, तो आपल्याच नाशाला प्रवृत्त होतो. ६१ सहज कोणी

यापरी ज्ञानाभिमान । निंदास्तवन उपजवी ॥ ६२ ॥ अभिमानाची जाती कैशी । अधिक खवळे सज्ञानापाशीं । दाखवी तो गुणदोषांसी । निंदास्तवनासी उपजवी ॥ ६३ ॥ आपुलें वृत्तीसी जो समान । त्याचें अळुमाळ करी स्तवन । न मने आपणासी ज्याचा गुण । त्यासी निंदी आपण यथेष्ट ॥ ६४ ॥ निंदास्तुति उपजे जेथ । भेद क्षोभला उठे तेथ । निःशेष निर्दाळी परमार्थ । महा अनर्थ अंगीं वाजे ॥ ६५ ॥ निंदेपाठीं अनर्थ । उधार लागों नेदी तेथ । रोकडा अंगीं आदळत । निज स्वार्थघातक ॥ ६६ ॥ भेद समूळ मिथ्या येथ । येचि अर्थींचा स्वप्नदृष्टांत । स्वयें सांगे श्रीकृष्णनाथ । दृढ परमार्थ साधावया ॥ ६७ ॥

तैजसे निद्रयाऽपन्ने पिण्डस्थो नष्टचेतनः । मायां प्राप्नोति मृत्युं वा तद्वन्नानार्थदृक् पुमान् ॥ ३ ॥

इंद्रियें जन्मलीं रजोगुणीं । तन्मात्रा विषयो तमोगुणीं । तीं इंद्रियें विषयसेवनीं । ठेलीं निद्रास्थानीं निश्चळ ॥ ६८ ॥ जागृतीं विश्व अभिमानी । दोनी जाती मावळोनी । तेव्हां मिथ्या प्रपंच स्वप्नीं । तैजस अभिमानी विस्तारी ॥ ६९ ॥ स्थूल देह असे निश्चळ । स्वप्नीं मनचि केवळ । विस्तारी भवजाळ । लोक सकळ त्रिलोकी ॥ ७० ॥ त्या स्वप्नामाजिले सृष्टीसी जाण । उत्पत्ति स्थिति आणि निधान । स्वयें देखतांही आपण । जन्ममरण तें मिथ्या ॥ ७१ ॥ तेवीं हे अविद्या दीर्घ स्वप्न । वृथा विस्तारी अभिमान । तेथील मिथ्या जन्ममरण । तूं ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥७२॥ तुझ्या निजरुपाच्या ठायीं । भेदाची वार्ताही नाही । तेथील शुभाशुभ कांहीं । तुज सर्वथा पाहीं स्पर्शेना ॥ ७३ ॥

सज्जन भेटल्यास त्याचे गुण-दोष शोधून पहात बसतो. याप्रमाणें ज्ञानाभिमान निंदा-स्तुति उत्पन्न करितो. ६२ अभिमानाचा स्वभाव असा आहे कीं, तो विद्वानापाशीं अधिक खवळतो व त्याचे गुण-दोष दाखवून स्तुति-निंदा उपजवितो. ६३ आपल्या वृत्तीला अनुकूल असेल त्याची तो स्तुति करितो आणि ज्याचा स्वभाव आपल्याला पटत नाहीं त्याची तो यथेष्ट निंदा करितो. ६४ जेथें निंदा-स्तुति उद्भवते तेथें भेदाचा क्षोभ होऊन तो प्रकट होतो आणि परमार्थाचा निःशेष नाश करितो. असा महा अनर्थ जडतो. ६५ निंदेपाशीं अनर्थ बसलेलाच असतो, तेथें उधारी चालत नाहीं सगळा रोखीचा व्यवहार अंगावर येऊन आदळतो व आपल्या खऱ्या स्वार्थाचा घात करितो. ६६ भेदभाव समूळ मिथ्या आहे. याविषयीं परमार्थ दृढ साधण्यासाठीं स्वप्नाचा दृष्टांत श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. ६७.

—भ्रंशच दृष्टान्तानें स्पष्ट करितात—

तैजसे निद्रया आपन्ने पिण्डस्थः मायां प्राप्नोति–राजस अहंकाराचें कार्य असा इंद्रियसमूह निद्रेनें पराभूत झाला असतां जीव केवल मनोमात्ररूपानें स्वप्नरूप मायेला प्राप्त होतो. नष्टचेतनः मृत्युं वा–त्यानंतर मन लीन झालें असतां ज्याचें चेतन नष्ट झालें आहे, असा होत्साता मृत्युतुल्य सुषुप्तीला प्राप्त होतो. तद्वत् नानार्थदृक् पुमान्–त्याचप्रमाणें द्वैताभिनिवेशी पुरुष विक्षेपाला व लयाला प्राप्त होतो. [ज्याप्रमाणें प्राज्ञाच्या संपर्कामुळें विश्वाचा भोगक्षयलक्षण भ्रंश होतो, त्याचप्रमाणें अनात्मसंपर्कामुळें आत्म्याचाहि स्वरूपभ्रंश होतो. ३.]

रजोगुणापासून इंद्रियें उत्पन्न झालीं. तमोगुणापासून तन्मात्र विषय उद्भवले. तीं इंद्रियें निद्रावस्थेंत विषयसेवनाविषयीं निश्चल होऊन रहातात. ६८ जागृतींत जागृति व तिचा अभिमानी विश्व, हीं दोन्हीं मावळतात व मिथ्या प्रपंचरूप स्वप्नामध्यें सूक्ष्म देहाभिमानी तैजसाचा विस्तार होतो. ६९ स्वप्नांत स्थूल देह निश्चल असतो आणि मनच केवल हा प्रपंचविस्तार पसरवितें. तेंच त्रिभुवनादि सर्व लोक उत्पन्न करितें. ७० त्या स्वप्नांतील सृष्टीचे उत्पत्ति-स्थिति-लय व जन्म-मरण आपण स्वतः प्रत्यक्ष पाहिले तरी ते जसे मिथ्या, ७१ त्याप्रमाणें हें अज्ञान दीर्घ स्वप्न आहे. अभिमान त्याचा व्यर्थ विस्तार करितो. त्यांतील जन्म-मरण मिथ्या आहे. तूं पूर्णत्वानें परिपूर्ण ब्रह्म आहेस. ७२ तुझ्या आत्मस्वरूपांत भेदाची वार्ताहि नाहीं. तेथील शुभाशुभ तुला सर्वथा स्पर्श करीत नाहीं. ७३.

किं भद्रं किमभद्रं वा द्वैतस्यावस्तुनः कियत् । वाचोदितं तदनृतं मनसा ध्यातमेव च ॥ ४ ॥

जें जन्मलेंचि नाहीं । तें काळें गोरें सांगूं कायी । ग्रहणेंवीण कांहीं । खग्रास पाहीं दिसेना ॥ ७४ ॥ उखरीं भासलें मृगजळ । तें खोल किंवा उथळ । मधुर कीं क्षार केवळ । सांगतां विकळ विवेक ॥ ७५ ॥ तेवीं मिथ्या प्रपंचाचें भान । तेथील दोष आणि गुण । निवडिती ते सज्ञान । अज्ञान जाण त्यामाजीं ॥ ७६ ॥ जेवीं आंवसेचिये रातीं । आंधारा जोखूं आंधळे येती । त्यांसी जोखितां दोहीं हातीं । एकही रती तुकेना ॥ ७७ ॥ तेवीं प्रपंच मिथ्यापणें । तेथ कानीं जें ऐकणें । कां डोळा जें देखणें । रसना जें चाखणें स्पर्शणें अंगें ॥ ७८ ॥ हाताचें घेणेंदेणें । पायांचें जें चालणें । वाचेचें जें बोलणें । कल्पणें मनें ॥ ७९ ॥ अहंकाराचा बडिवार । चित्ताचा चिंतनप्रकार । बुद्धीचा विवेकविचार । हा समूळ व्यवहार मिथ्या तेथ ॥ ८० ॥ चित्रीं जळ आणि हुताशन । अंत्यज आणि ब्राह्मण । व्याघ्र आणि हरिण । भासताही जाण भिंतीचि भासे ॥ ८१ ॥ तेवीं हा प्रपंच द्वैतयुक्त । भासतां भासे वस्तु अद्वैत । शुभाशुभ कैंचें तेथ । ब्रह्म सदोदित परिपूर्ण ॥ ८२ ॥ केळीचा दिंड उकलितां । जो जो पदर तो तो रिता । तेवीं देहादि प्रपंच विवंचितां । मिथ्या तत्त्वतां मायिक ॥ ८३ ॥ मिथ्या प्रपंचाच्या ठायीं । शुभाशुभ तें लटिकें पाहीं । सत्य वस्तु ठायींच्या ठायीं । शुभाशुभ नाहीं अणुमात्र ॥ ८४ ॥ जो शुभाशुभ म्हणे आहे । त्याची कल्पना त्यासंमुख होये । निजकल्पनामहाभयें । जन्ममरण वाहे लटिकेंची ॥ ८५ ॥

—' द्वैत असत्य असल्यामुळें स्तुति व निंदा यांना विषयच रहात नाहीं. ' ही गोष्ट पुढील साडेसहा श्लोकांनीं अधिक स्पष्ट करितात—

अवस्तुनः द्वैतस्य किं भद्रं वा किं अभद्रं कियत्-मिथ्या द्वैतांतील अभद्र काय व भद्र काय ! किंवा त्यांत भद्र व अभद्र कितीसें असणार ! (आतां त्याचें मिथ्यात्वच सांगतात—) **यत् वाचा उदितं मनसा ध्यातं एव च तद् अनृतं**—वाणीनें जें बोललेलें, चक्षूनें जें दृश्य असलेलें, व इतर इंद्रियांचाहि विषय होणारें, तसेंच मनानें चिंतिलेलें, तें सर्व मिथ्या होय. ४.

जें जन्मलेंच नाहीं तें काळें किंवा गोरें हें काय सांगूं ! ग्रहण लागल्यावांचून खग्रास कधींहि दिसत नाहीं. ७४ माळ जमिनीवर मृगजलाचा भास झाला असतां, तें खोल आहे किंवा उथळ आहे, मधुर आहे किंवा खारट आहे, हें सांगूं लागल्यास विचारच कुंठित होतो. ७५ त्याप्रमाणें प्रपंचाचें भान मिथ्या आहे. त्यांतील गुण-दोषांची निवड करणारे विद्वन्मन्यहि अज्ञच होत. ७६ अमावास्येच्या रात्रीं अंधाराचें वजन करावयास आंधळे आले व त्यांनीं दोन्हीं हातांनीं जरी अंधकारास तोलिले तरी रतीभरहि अंधार जसा त्यांच्या हातीं लागत नाहीं, ७७ त्याप्रमाणें हा प्रपंच मिथ्या आहे. त्यांत कानांनीं जें ऐकावें, डोळ्यांनीं जें पहावें, जिभेनें जें चाखावें, अंगानें ज्याला स्पर्श करावा, ७८ हातांनीं द्यावें, घ्यावें, पायांनीं चालावें, वाचेनें बोलावें तें सगळें मनःकल्पित आहे. ७९ अहंकाराची थोरवी, चित्ताचें चिंतन, बुद्धीची विचारशीलता हा सगळा व्यवहार मिथ्या आहे. ८० चित्रांतील जल, अग्नि, अंत्यज, ब्राह्मण, वाघ, हरिण हीं जरीं भासलीं तरी वास्तविक तीं जशीं एक भिंतच, ८१ तसा हा प्रपंच द्वैतयुक्त भासत असला तरी वास्तविक सगळी एक अद्वैत वस्तुच आहे. सदोदित परिपूर्ण ब्रह्म भरलेलें असतां तेथें शुभाशुभ कोठचें ! ८२ केळीचा खुंट सोलला असतां जेवढा पदर काढावा, तेवढा पोकळच असतो, त्याप्रमाणें देहादि प्रपंचाचा विचार केला असतां तो मिथ्या मायिकच ठरतो. ८३ त्या मिथ्या प्रपंचांत शुभाशुभ सगळें मायिकच आहे. आत्मवस्तु जागच्याजागीं असते. त्यांत रेंसभरहि शुभाशुभ नाहीं. ८४ शुभाशुभ म्हणणाराची कल्पनाच त्याच्या पुढें असते आणि आपल्या त्या कल्पनेच्या भीतीनेंच तो मिथ्या जन्म-मरण सोशीत असतो. ८५.

छाया प्रत्याह्वयाभासा ह्यसन्तोऽप्यर्थकारिणः । एवं देहादयो भावा यच्छन्त्यामृत्युतो भयम् ॥ ५ ॥

जळीं प्रतिबिंब साच नसे । जो पाहे तो बिंबला दिसे । मिथ्या प्रपंचाचें रूप तैसें । निजकल्पनावशें भासत ॥ ८६ ॥ तें प्रतिबिंब पाहोनि डोळां । मी म्हणोनि लाविजे टिळा । तेवीं देहाभिमानाचा सोहळा । जीवाच्या कपाळा आदळे ॥ ८७ ॥ कां आपुलींचीं उत्तरें । पडिसादें होतीं प्रत्युत्तरें । तें मिथ्याचि परी साचोकारें । श्रवणीं अक्षरें उमटती ॥ ८८ ॥ निश्चळ दोराचें निजरूप । भ्रमें भासला प्रचंड सर्प । तो मिथ्या परी भयकंप । महाखटाटोप उपजवी ॥ ८९ ॥ यापरी असंत देहादिक । देहाभिमानें जीवासी देख । जन्ममरणावर्त अनेक । आकल्प दुःख भोगवी ॥ ९० ॥ आत्म्यापासोनि देहादि भेद । उपजला हें बोले वेद । वेदरूपें तूं प्रसिद्ध । मिथ्या विवाद घडे केवीं ॥ ९१ ॥ ऐसा उद्धवाचा आवांका । वेदवादाची आशंका । समूळ कळली यदुनायका । तेंचि उत्तर देखा देतसे ॥ ९२ ॥

आत्मैव तदिदं विश्वं सृज्यते सृजति प्रभुः । त्रायते त्राति विश्वात्मा ह्रियते हरतीश्वरः ॥ ६ ॥
तस्मान्नह्यात्मनोऽन्यस्मादन्यो भावो निरूपितः । निरूपितेयं त्रिविधा निर्मूला भातिरात्मनि ।
इदं गुणमयं विद्धि त्रिविधं मायया कृतम् ॥ ७ ॥
एतद्विद्वान्मदुदितं ज्ञानविज्ञाननैपुणम् । न निन्दति न च स्तौति लोके चरति सूर्यवत् ॥ ८ ॥

—अहोपण मग देहादि पदार्थांनाहि मिथ्यात्व आहे, तेव्हां त्यांना भयहेतुत्व कसें !' दृष्टान्तानें उत्तर सांगतात—

छाया प्रत्याह्वयाभासाः असन्तः अपि अर्थकारिणः भवन्ति—प्रतिबिंब, प्रतिध्वनि व शुक्ति-रजतादि आभास, हे जसे मिथ्या असूनहि कार्यकारी असतात, एवं देहादयः भावाः आमृत्युतः भयं यच्छन्ति—त्याप्रमाणें हे देहादि पदार्थ मिथ्या असले तरी मरणापर्यंत किंवा मृत्यु म्ह० लय होईपर्यंत भय देतात. ५.

जलामध्यें कांहीं प्रतिबिंब नसतें; पण जो त्यांत पहावयास जातो, त्याला त्याचेंच प्रतिबिंब त्यांत दिसूं लागतें. तसें हें मिथ्या प्रपंचाचें रूप आपल्याच कल्पनेनें भासत असतें. ८६ जलांतील तें आपलेंच प्रतिबिंब पाहून 'हा मी' असें म्हणून त्याला जसा टिळा लावावा, त्याप्रमाणें देहाभिमानाचा सोहळा देहाच्या शिरावर आदळतो; ८७ किंवा आपल्याच शब्दांचा प्रतिध्वनि उमटतो, तो जरी मिथ्याच असतो, तरी आपल्या कानीं पडतो. ८८ दोराचें मुळचें स्वरूप कायमच असतें, परंतु आपण त्याला भ्रमानें प्रचंड साप समजतांच अंगाला भयंकर कंप सुटतो आणि मोठी त्रेधा उडते. ८९ याप्रमाणें मिथ्या देहादिक देहाभिमानामुळें जीवाला जन्म-मरणरूप भोंवऱ्यांत टाकितात आणि कल्पान्तापर्यंत दुःख भोगवितात. ९० 'आत्म्यापासूनच देहादि भेद झाला' असें वेद सांगतो आणि तूं वेदरूपानें प्रसिद्ध आहेस. तेव्हां हा मिथ्या वाद कसा संभवतो ! ९१ अशी उद्धवाची आशंका श्रीकृष्णाला पूर्णपणें कळली व तो त्याचेंच उत्तर देत आहे. ९२.

—अहोपण सृष्ट्यादि श्रुतीकडून द्वैताचें निरूपण केलें जातें, तेव्हां तें असत्य कसें असेल ! याचें उत्तर पुढील अडीच श्लोकांनीं देतात—

आत्मा एव प्रभुः तत् इदं विश्वं सृजति सृज्यते च—आत्माच प्रभू हें सर्व विश्व उत्पन्न करितो आणि तें उत्पन्न केलें जातें. विश्वात्मा त्राति त्रायते च—विश्वात्मा पालन करितो व तें पालन केलें जातें. ईश्वरः हरति ह्रियते—ईश्वर हरण करितो व तें हरण केलें जातें. तस्मात् अन्यस्मात् आत्मनः अन्यः भावः न हि निरूपितः—म्हणून सृज्यादिकांहून व्यतिरिक्त असलेल्या या आत्म्याहून भिन्न पदार्थ कोठेंच अनुभवाला आला नाहीं. इयं त्रिविधा भातिः आत्मनि निर्मूला निरूपिता—ही आध्यात्मिकादिरूप तीन प्रकारची प्रतीति आत्म्यामध्यें निर्मूलच अनुभवाला येते. (पण निर्मूल असतांना प्रतीतीला कशी येते ? उत्तर—) इदं त्रिविधं गुणमयं मायया कृतं विद्धि—हें त्रिविध गुणमय जगत् मायेनें केलेलें आहे, असें तूं समज. मदुदितं एतत् ज्ञानविज्ञाननैपुणं विद्वान् न निन्दति न च स्तौति—मीं सांगितलेली ही ज्ञान-विज्ञानातील निष्ठा जाणणारा कोणाची निंदा करीत नाहीं व कोणाची स्तुति करीत नाहीं. लोके सूर्यवत् चरति—लोकांमध्यें सूर्याप्रमाणें सम होऊन संचार करितो. ६-७-८.

प्रपंच प्रत्यक्ष विद्यमान । तेणें भेदयुक्त झालें मन । तेथ बोधी माझें वेदवचन । प्रपंच अभिन्न निजात्मता ।। ९३ ।। मूळीं ऊंसचि बीजीं विरूढे । तो ऊंस ऊंसपणें कांडा चढे । तेवीं प्रपंच वस्तुयोगें वाढे । वाडेंकोडें तद्रूप ।। ९४ ।। जैसें सोनियाचें झालें लेणें । तें वर्ततां वर्ते सोनेपणें । लेणें मोडलिया सोनें । सोनेपणें स्वतःसिद्ध ।। ९५ ।। तिळाची पुतळी केली । ते तिळावयवें शोभे आली । ते मोडितां न मोडितां भली । असे संचली तिळरूप ।। ९६ ।। तेवीं उत्पत्ति स्थिति निधन । प्रपंचासी होतां जाण । तेथ आदि मध्यें अवसान । वस्तु परिपूर्ण संचली ।। ९७ ।। जें एथ भासलें चराचर । तें मी आत्माचि साचार । मजवेगळा जगासी थार । अणुमात्र असेना ।। ९८ ।। एवं सृज्य आणि स्रजिता । पाल्य आणि पाळिता । संहार आणि संहर्ता । मी एकात्मता भगवंत ।। ९९ ।। एथ उत्पत्ति स्थिति निधन । त्रिविधरूपें प्रपंच भिन्न । या सर्वांसी मी अधिष्ठान । मजवेगळें जाण असेना । ।। १०० ।। प्रपंच मजवरी आभासे । परी मी प्रपंचामाजीं नसें । जेवीं मृगजळाचेनि रसें । सूर्य काळवशें भिजेना ।। १ ।। त्रिविध प्रपंचाचें जाळ । मजवरी दिसे हें निर्मूळ । जेवीं गगन भासे सुनीळ । परी तेथ अळुमाळ नीळिमा नाहीं ।। २ ।। जग प्रत्यक्ष डोळां दिसे । तें तूं निर्मूळ म्हणसी कैसें । हे आशंका मानिसी मानसें । ऐक अनायासें तो बोध ।। ३ ।।

अध्यात्म अधिदैव अधिभूत । हें त्रिविध जग मायाकृत । नसतें मजमाजीं आभासत । जाण निश्चित त्रिगुणात्मक ।। ४ ।। उद्धवा मिथ्या म्हणोनि तूं एथ । झणें होशी उपेक्षायुक्त । येणें मद्वाक्यें साधुसंत । ज्ञानविज्ञानार्थ पावले ।। ५ ।। प्रपंचाचें मिथ्याभान । तेंचि ज्ञानाचें मुख्य ज्ञान । येणें ज्ञानें जो सज्ञान । तोचि समान सर्वां भूतीं ।। ६ ।। यालागीं भूतांचे गुणागुण । कदा न वदे निंदास्तवन । सूर्याचे परी जाण । विचरे आपण समसाम्यें ।। ७ ।। बदरिकाश्रम उत्तरदेशीं । सेतुबंध दक्षिणेसी ।

प्रपंच प्रत्यक्ष असलेला दिसतो; त्यामुळें चित्त द्विधा होतें. म्हणून ' प्रपंच आत्मस्वरूपाहून भिन्न आहे ' असें माझें वेदवचन प्रतिपादन करितें. ९३ बीजामध्यें ऊंस सांठलेलाच असतो व तोच कांड्याच्या रूपानें उगवतो, त्याप्रमाणें प्रपंच ब्रह्मामुळें तद्रूप होतो. ९४ किंवा सोन्याचे अलंकार सोन्याच्या रूपानेंच असतात. ते दागिने मोडले तरी मूळचें सोनें कायमच रहातें. ९६ किंवा तिळाची बाहुली बनविली, तर ती तिळाच्या अवयवांनीं शोभते. ती मोडली किंवा न मोडली तरी तिळानेंच युक्त असते. ९५ त्याप्रमाणें प्रपंचाला उत्पत्ति-स्थिति-लय या तिन्ही अवस्था प्राप्त झाल्या असतां आदि, मध्यें व अंतीं एक आत्मतत्त्वच परिपूर्ण भरलेलें असतें. ९७ यालोकीं जें चराचर भासतें, तें मी आत्माच आहें. माझ्यावांचून जगाला अणुमात्र थारा नाहीं. ९८ याप्रमाणें उत्पन्न करण्यास योग्य जगत् व उत्पन्न करणारा, पाल्य व पालक, संहार व संहारकर्ता हें सर्व एकात्मतेनें मी भगवानच आहे. ९९ उत्पत्ति-स्थिति-लय या तीन प्रकारांनीं प्रपंच भिन्न भासला, तरी या सर्वांचें अधिष्ठान मी भगवानच आहें मजवांचून दुसरें कांहींहि नाहीं. १०० मृगजळांतील जलानें सूर्य जसा कधींहि भिजत नाहीं, त्याप्रमाणें मजवर प्रपंच भासतो. पण मी प्रपंचांत नाहीं. १ आकाश निळें दिसतें. परंतु त्यांत नीळेपणाचा लेशहि नसतो. त्याप्रमाणें त्रिविध प्रपंचाचें जाळें मजवर मिथ्याच भासतें. २ ' जग प्रत्यक्ष डोळ्यांना दिसत असतां तें मिथ्या आहे, असें तूं कसें म्हणतोस !' अशी शंका मनांत येत असल्यास त्याचाहि प्रकार सांगतों, ऐक. १०३.

अध्यात्म अधिदैव आणि अधिभूत असें हें त्रिविध जगत् मायेनें निर्मिलें आहे. तें माझ्यावर मिथ्याच भासतें; परंतु वास्तविक तें त्रिगुणात्मक आहे. ४ हे उद्धवा ! जगत् मिथ्या म्हटलें, म्हणून तूं त्याचा त्याग करूं नकोस. कारण माझ्या या वाक्यानेंच साधु-संतांना ज्ञान-विज्ञान प्राप्त झालें. ५ प्रपंच मिथ्या समजणें हें ज्ञानांतील मुख्य ज्ञान आहे. या ज्ञानानें जो संपन्न असतो; तोच सर्व प्राणिमात्रांविषयीं समान भाव ठेवितो. ६ यास्तव तो भूतांच्या गुण-अवगुणांची स्तुति किंवा निंदा कधींहि करीत नाहीं. सूर्याप्रमाणें सर्वांबरोबर सारखा वागतो. ७ उत्तरेकडे बदरिकाश्रमांत असो किंवा दक्षिणेंत सेतुबंधरामेश्वरीं असो, सूर्य सर्वांना समोरच असतो. तो कोणालाच विमुख

सूर्य संमुख सर्वांसी । विमुखता त्यासी असेना ॥८॥ सूर्य संमुख पूर्वेच्यांसी । तोचि विमुख पश्चिमेच्यांसी । मी सर्वत्र सर्वांसी । विमुखता मजसी असेना ॥९॥ सामर्थ्यें तम दवडूनि जाण । भूतांसी सूर्य भेटे आपण । तेवीं जगाचे दवडूनि दोषगुण । साधुसज्जन विचरती ॥११०॥ जें हें बोलिलें ज्ञानलक्षण । तेंचि सिद्धांताचें पूर्णपण । मुमुक्षीं हें अनुसंधान । सावधान साधावें ॥११॥ हेंचि पाविजे निजज्ञान । तेचि अर्थीचें साधन । उद्धवालागीं श्रीकृष्ण । स्वमुखें आपण सांगत ॥१२॥

प्रत्यक्षेणानुमानेन निगमेनात्मसंविदा । आद्यन्तवदसज्ज्ञात्वा निःसङ्गो विचरेदिह ॥ ९ ॥

जे जन्मोनि नाशवंत । ते सर्वही जाण असंत । आसक्ति सांडोनियां तेथ । उदास विरक्त वर्तावें ॥१३॥ सटवल्याचें बारसें । कोणी न करिती उल्हासें । नश्वर देह वाढतां तैसें । मूर्ख मानसें सुखावती ॥१४॥ उत्पत्तिविनाशलक्षण । त्याचें देव सांगतो प्रमाण । नित्य भूतांचें जन्ममरण । देखिजे आपण प्रत्यक्ष ॥१५॥ अनुमान परि तो साचार । जें जें देखिजे साकार । मेरु पृथ्व्यादि आकार । तेही नश्वर प्रळयांतीं ॥१६॥ येचि अर्थी वेदोक्ती । नाशवंत अष्टधा प्रकृती । जीवभाव नासे प्रांतीं । गर्जती श्रुती येणें अर्थें ॥१७॥ एथ आपुलाही अनुभव असे । जड विकारी तें तें नासे । हें कळत असे गा आपैसें । जग अनायासें नश्वर ॥१८॥ वडील निमाले देखती । पुत्रपौत्र स्वयें संस्कारिती । तरी स्वमृत्यूची चिंता न करिती । पडली भ्रांती देहलोभें ॥१९॥ पुत्र पितरां पिंडदान देती । उत्तम गति त्यांची चिंतिती । आपुली गति न विचारिती । नश्वर आसक्ती देहलोभें ॥१२०॥ आत्मा केवळ प्रकाशघन । प्रपंच जड मूढ अज्ञान । हें ऐकोनि उद्धव आपण । देवासी प्रश्न पूसतू ॥२१॥

नाहीं. ८ सूर्य ज्यावेळीं पूर्वदिशेंतील लोकांना संमुख असतो, त्यावेळीं तोच पश्चिमेच्या लोकांना विमुख होतो; पण मी सर्वत्र सर्वांना सारखाच आहें. मला विमुखता नाहीं. ९ सूर्य आपल्या सामर्थ्यानें अंधाराला घालवून जसा सगळ्या प्राण्यांना भेटतो, तसे साधु-संत जगाचे गुण-दोष दूर सारून संचार करितात ११० हें जें ज्ञानाचें लक्षण, तोच पूर्ण सिद्धान्त आहे. म्हणून मुमुक्षूंनीं त्याकडे लक्ष ठेवून तें सावधानपणानें साधावें. ११ हेंच ज्ञान प्राप्त होण्यासाठीं त्याविषयींचें साधन श्रीकृष्ण उद्धवाला आपल्या मुखानें सांगत आहे. ११२.

—या निष्ठेच्या प्राप्तीचा उपाय सांगतात —

प्रत्यक्षेण अनुमानेन निगमेन आत्मसंविदा आद्यन्तवत् असत् ज्ञात्वा निःसङ्गः इह विचरेत्–प्रत्यक्ष, अनुमान, शास्त्र व अनुभव यांनीं हें सर्व दृश्य उत्पत्ति-नाशवान् व असत् आहे, असें जाणून व आसक्तिशून्य होऊन रहावें. [प्रत्यक्ष प्रमाणानें घटादि दृश्य, सावयवत्व या हेतूवरून केलेल्या अनुमानानें पृथिव्यादि दृश्य, शास्त्रावरून अप्रत्यक्ष आकाशादि दृश्य व स्वानुभवानें हें सर्व दृश्य उत्पत्ति व नाश यांनीं युक्त आहे व त्यामुळेच तें असत् आहे, असें जाणून त्याविषयींची आसक्ति सोडावी.] ९.

जें उत्पन्न होऊन नाश पावतें तें सर्व मिथ्या आहे, असें जाणावें आणि त्यावरील आसक्ति टाकून त्याविषयीं उदासीन व विरक्त होऊन रहावें. १३ सटीच्या दिवशींच मृत झालेल्या बालकाचा कोणी बारशाचा समारंभ जसा करीत नाहीं, त्याप्रमाणें या नश्वर देहाच्या वाढीनें मूर्खच आनंद मानितात. १४ आतां श्रीकृष्ण उत्पत्ति व नाश याचें प्रमाण सांगत आहे. आपण जीवांचें जन्म-मरण नित्य प्रत्यक्ष पहातों. १५ बरें, अनुभवानें पाहूं गेल्यास तेंहि खरेंच असतें. कारण मेरुपर्वत, पृथ्वी इत्यादि जेवढे साकार पदार्थ दिसतात, तेवढे प्रलयकालीं नाश पावतात. १६ वेदानें हेंच प्रतिपादन केलें आहे. माझी अष्टधा प्रकृतीहि अशीच नाशिवंत आहे. ती जीवभावासह अखेर नाश पावते, अशी श्रुति गर्जना करीत आहे. १७ आपलाहि अनुभव असाच आहे कीं, जेवढें जड व विकारी तेवढें नाश पावतें. यावरून 'जगत् नश्वर आहे' हें आपोआप कळून चुकतें. १८ आपल्या वडिलांना मरण आलेलें पहातात, त्यांचे पुत्र व नातु त्यांची उत्तर-क्रिया करितात; पण ते आपल्या स्वतःच्या मरणाची कांहीं चिंता करीत नाहींत. अशी देहलोभानें त्यांना भ्रांति पडते. १९ पुत्र आपल्या पितरांना पिंड देतात. त्यांना उत्तम गति मिळावी, असें चिंतितात; पण आपल्या स्वतःच्या गतीचा ते कधीं विचार करीत नाहींत. अशी त्यांची नाशिवंत देहावर लोभानें आसक्ति जडलेली असते. १२० आत्मा केवल प्रकाशमय आहे. प्रपंच जड, मूढ, अज्ञान आहे. हें ऐकून उद्धव देवाला प्रश्न करीत आहे. १२१.

उ० उ०–नैवात्मनो न देहस्य संसृतिर्द्रष्टृदृश्ययोः । अनात्मसदृशोरीश कस्य स्यादुपलभ्यते ॥ १० ॥

आत्मा नित्यमुक्त चिद्घन । त्यासी न घडे भवबंधन । देह जड मूढ अज्ञान । त्यासी संसार जाण घडेना ॥ २२ ॥ एथ भवबंधन हृषीकेशी । सांग पां बाधक कोणासी । जरी तूं संसार नाहीं म्हणसी । तो प्रत्यक्ष जगासी जडलासे ॥ २३ ॥ आत्म्यासी विचारितां जाण । भवबंधा न दिसे स्थान । येचि अर्थीचें न घडतेपण । उद्धव आपण सांगत ॥ २४ ॥

आत्माऽव्ययोऽगुणः शुद्धः स्वयंज्योतिरनावृतः । अग्निवद्दारुवदचिद्देहः कस्येह संसृतिः ॥ ११ ॥

आत्मा चिद्रूप अविनाशी । गुण निर्गुण नातळे त्यासी । कर्माकर्मपापपुण्यांसी । ठाव ज्यापाशीं असेना ॥ २५ ॥ परादिवाचा नव्हे उच्चार । यालागीं म्हणिजे परात्पर । प्रकृति गुणीं अनिवार । प्रकृतिपर परमात्मा ॥ २६ ॥ जयाच्या स्वप्रकाशदीप्तीं । रविचंद्रादि प्रकाशती । प्रकाशें प्रकाशे त्रिजगती । तेजोमूर्ति परमात्मा ॥ २७ ॥ ऐशिया आत्म्याच्या ठायीं । भवबंध न लगे कांहीं । सूर्य बुडे मृगजळाच्या डोहीं । तैं आत्म्यासी पाहीं भवबंध ॥ २८ ॥ खद्योततेजें सूर्य जळे । बागुलाभेणें काळ पळे । मुंगीचेनि पांखबळें । जैं उडे सगळें आकाश ॥ २९ ॥ वारा आडखुळिला आडीं पडे । जैं थिल्लारामाजीं मेरु बुडे । तरी भवबंध आत्म्याकडे । सर्वथा न घडे गोविंदा ॥ १३० ॥ देहाकडे भवबंधन । मूर्खहि न मानिती

—'अहोपण, स्वानुभवानें सर्व दृश्य असत् आहे, असें जर म्हटलें तर 'आत्मा स्वप्रकाश व देहादि द्वैत जड आहे' असें म्हटल्यासारखें होईल आणि त्यामुळें संसारांत प्रतिभास संभवणार नाहीं' असा आक्षेप उद्धव घेतो.

उ० उ०–उद्धव म्हणाला–संसृतिः आत्मनः न एव देहस्य न–हा संसार आत्म्याचा नाहीं व देहाचाहि नाहीं. अनात्मसदृशोः द्रष्टृदृश्ययोः कस्य स्यात्–जड व अजड असलेल्या, म्ह० एक द्रष्टा व दुसरें दृश्य असलेल्या त्या दोहोंतील तो कोणाचा असणार ! (तर मग हा संसार त्या दोहोंतील कोणाचाच नसूं दे.) असें भगवान् म्हणेल म्हणून उद्धव सांगतो–ईश उपलभ्यते–पण हे ईश्वरा ! तो तर प्रत्यक्ष अनुभवाला येतो. १०.

आत्मा नित्यमुक्त चित्स्वरूप आहे. त्याला भवबंधन नाहीं. आणि देह जड, मूढ व अज्ञान असल्यामुळें त्याला संसार संभवत नाहीं. २२ तेव्हां मग हे श्रीकृष्णा, भवबंधन कोणाला बाधक होतें, तें सांग पाहूं ! तूं जरी संसार नाहीं म्हणतोस, तरी तो जगाला प्रत्यक्ष जडला आहे. २३ आत्म्याचा विचार केला असतां भवबंधाला कोठें जागाच दिसत नाहीं. याचेंच निरूपण उद्धव स्वतःच करीत आहे. १२४.

—उद्धव याचाच अधिक विस्तार करितो—

आत्मा अव्ययः अगुणः शुद्धः स्वयंज्योतिः अनावृतः अग्निवत् दारुवत् देहः अचित् इह कस्य संसृतिः–आत्मा अव्यय असल्यामुळें गुणादिरहित, निर्गुण असल्यामुळें नाशादिरहित, शुद्ध व स्वयंज्योति आणि अनावृत असल्यामुळें पुण्य, अपुण्य व अज्ञान यांच्या परिच्छेदानें रहित आहे. तो अग्नीप्रमाणें प्रकाशक आहे व देह काष्ठाप्रमाणें जड आहे, त्यामुळें संसार त्यांतील कोणालाच संभवत नाहीं. ११.

आत्मा चिद्रूप अविनाशी आहे, गुण किंवा निर्गुण त्याला स्पर्शहि करीत नाहींत. कर्म-अकर्म, पाप-पुण्य यांना त्याच्यापाशीं जागाहि मिळत नाहीं. २५ परा इत्यादि वाणीनें त्याचा उच्चारहि होत नाहीं. म्हणून त्याला परात्पर म्हणतात. प्रकृति गुणांनीं युक्त आहे व परमात्मा प्रकृतीच्याहि पलीकडे आहे. २६ ज्याच्या तेजाच्या प्रकाशानें सूर्य-चंद्र प्रकाशित होतात, ज्याच्या प्रकाशानें त्रिभुवन प्रकाशतें, असा तो परमात्मा तेजोमय आहे. २७ अशा आत्म्याला संसारबंधन लागत नाहीं. सूर्य जर मृगजलाच्या डोहांत बुडेल तर आत्म्याला भवबंध घडेल; २८ किंवा काजव्याच्या तेजानें सूर्य जळेल; बागुलबुवाच्या भीतीनें काळ पळेल; मुंगीच्या पंखाच्या वेगानें आकाश उडेल; २९ वायु अडखळून विहिरींत पडेल; किंवा मेरुपर्वत डबक्यांत बुडेल; परंतु हे गोविंदा ! आत्म्याला कर्मबंधन सर्वथा घडणार नाहीं. १३०

जाण । देह जड मूढ अज्ञान । त्यासी भवबंधन कदा न घडे ॥ ३१ जैं दगडाचें पोट दुखे । कोरडें काष्ठ चरफडी भुकें । तैं देहाकडे यथासुखें । भवबंध हरिखें लागत ॥ ३२ ॥ जैं डोंगरासी तरळ भरे । मृत्तिका नाहाणालागीं झुरे । कोळशानें काळें होय आंधारें । तैं भवबंधभारें देह दाटे ॥ ३३ ॥ म्हणसी देहात्मसंगती । घडे भवबंधाची प्राप्ती । विचारिता तेही अर्थी । न घडे श्रीपति तें ऐक ॥ ३४ ॥ आत्मा स्वप्रकाश महावन्ही । देह तो जड मूढ काष्ठस्थानीं । तो मिळतां आत्मामिळणीं । सांडी जाळूनि तत्काळ ॥ ३५ ॥ जैं अग्निमाजीं संवादें । कापूर आठ प्रहर नांदे । तैं देहात्मनिजसंबंधें देह भवबंधें नांदता ॥ ३६ ॥ म्हणती काष्ठामाजीं अग्नि असे । परी तो काष्ठीं असूनि न दिसे । मथूनि काढिल्या निजप्रकाशें । जाळी अनायासें काष्ठातें ॥ ३७ ॥ तेवीं आत्मा देहामाजीं असे । परी तो देहचि होऊनि नसे । देहप्रकाशक चिदंशें । भवबंधपिसें त्या न घडे ॥ ३८ ॥ आशंका म्हणशी आत्म्याचे निजसंगतीं । जैं जळोनि जाय भूतव्यक्ती । तैं भूतांची वर्तती स्थिति । कैशा रीतीं तें ऐक ॥ ३९ ॥ छायामंडपीं दीप प्रकाशी । नाचवी कागदांच्या बाहुल्यांसी । तेच लावितां दीपासी जाळी अनायासीं त्या व्यक्ती ॥ १४० ॥ तेवीं आत्म्याचे स्वसत्ताशक्तीं । भूतें दैवयोगें वर्तती । स्वयंभू झाल्या आत्मस्थिती । भूतव्यक्ती उरेना ॥ ४१ ॥ करितां आत्म्याचें अनुसंधान । संसाराचें नुरे भान । तेथ भूताकृति भिन्नाभिन्न । कैंच्या जाण अतिबद्ध ॥ ४२ ॥ यापरी भवबंधन । मज पाहतां मिथ्या जाण । भवबंधालागीं स्थान । नेमस्त जाण असेना ॥ ४३ ॥ आत्म्याच्या ठायीं ना देहीं । उभयसंबंधींही नाहीं । भवबंधन मिथ्या पाहीं । यासी ठावो कोठेंही असेना ॥ ४४ ॥ कोपों नको श्रीकृष्णनाथा । माझेनि निजनिर्धारें पाहतां । भवबंध मिथ्या तत्त्वतां । निश्चयें चित्ता मानलें ॥ ४५ ॥ ऐकोनि उद्धवाचें वचन । हरिखें

देहाला कर्मबंधन आहे, असें मूर्खहि मानीत नाहींत. कारण देह जड, मूढ, अज्ञान आहे. त्याला भवबंधन कदापीहि घडत नाहीं. ३१ दगडाचें जर पोट दुखेल, वाळलेलें लांकूड भुकेनें तडफडूं लागेल, तर देहाला खुशाल भवबंधन घडेल. ३२ पर्वत जर हलूं लागेल, माती स्नानासाठीं झुरेल, अंधार कोळशानें काळा होईल, तर देह भवबंधानें युक्त होईल. ३३ देहात्म्याच्या संगतीनें भवबंधाची प्राप्ति होते, असें जर म्हाणावें तर विचाराअंतीं तेंहि संभवत नाहीं. कसें तें ऐका. ३४ आत्मा स्वयंप्रकाशक महा-अग्नि आहे. देह जड, मूढ लाकडासारखा आहे. तो जर आत्म्याला मिळाला तर तत्काळ त्याचें जळून भस्म होईल. ३५ कापूर जर अग्नीमध्यें आठहि प्रहर एकरूपानें राहील, तर देहात्म्याच्या संबंधानें देह भवबंधानें युक्त होईल. ३६ काष्ठांमध्यें अग्नि असतो म्हणतात, परंतु तो त्यांत असून बाहेर दिसत नाहीं. पण तीं काष्ठें एकमेकांवर घासलीं असतां, तो प्रगट होतो व त्या काष्ठांनाच जसा जाळितो, ३७ त्याप्रमाणें आत्मा देहांतच आहे; परंतु तो देहरूप होऊन रहात नाहीं. तो ज्ञानस्वरूपानें देहाचा प्रकाशक असतो. त्याला भवबंधाचें वेड लागत नाहीं. ३८ (आशंका—) आत्म्याच्या संयोगानें देह जळून जातील, असें जर म्हणतोस, तर जीव जागतात कसे ! तेंहि सांगतों, ऐक. ३९ छायामंडप नांवाचें एक दीपपात्र असतें; त्याला बाहेरून पातळ कागद असतो व आंत रंगी-बेरंगीं कागदाचीं चित्रें वर्तुळाकार काडीला चिकटविलेलीं असतात. तीं आंत दिवा ठेवितांच गरगर फिरूं लागतात; परंतु त्याच चित्रांना जर दिव्याचा स्पर्श झाला तर तीं तत्काळ जळून जातात. १४० त्याप्रमाणें आत्म्याच्या स्वसामर्थ्यानें जीव आपल्या प्रारब्धानुसार वागत असतात; पण तोच आत्मा आपल्या स्वस्वरूपांत स्थित झाल्यास एकहि प्राणी उरणार नाहीं. ४१ आत्म्याचें ध्यान केलें असतां संसाराचें भान रहात नाहीं. तेव्हां भिन्न-भिन्न आकारांचे जीव अतिबद्ध कसे होणार ! ४२ याप्रमाणें पाहूं गेल्यास मला भवबंधन मिथ्या वाटतें. भवबंधाला निश्चित असें स्थान नाहीं. ४३ आत्म्यांत किंवा देहांत, दोहोंतहि भवबंध मिथ्याच आहे. याला कोठेंच जागा नाहीं. ४४ हे श्रीकृष्णनाथा ! रागावूं नकोस. माझ्या निश्चयानें पाहिल्यास भवबंध खरोखर मिथ्याच आहे, असें मनाला वाटतें. ४५ हें उद्धवाचें भाषण ऐकून श्रीकृष्णाला आनंदाचें भरतें आलें. माझा उद्धव आतां ज्ञानी झाला, त्याला

वोसंडला श्रीकृष्ण। माझा उद्धव झाला सज्ञान। निजात्मखूण पावला ॥ ४६ ॥ सत्य मिथ्या भवबंधन ऐकोनि उद्धवाचें वचन। परमानंदें डोले श्रीकृष्ण। जीवें निंबलोण करूं पाहे ॥ ४७ ॥ आत्म्यास भवबंध नाहीं। शेखीं न दिसे देहाच्या ठायीं। हा विवेक नेणिजे जिहीं। त्यासी भवबंध पाहीं हरि सांगे ॥ ४८ ॥

श्रीभ० उ०-यावद्देहेन्द्रियप्राणैरात्मनः सन्निकर्षणम्। संसारः फलवांस्तावदपार्थोऽप्यविवेकिनः ॥ १२ ॥

जो वर्णाश्रमांही परता। जो बंधमोक्षां अलिप्तता। जो देहद्वंद्वा नातळता। तो उद्धवहितार्था हरि बोले ॥ ४९ ॥ मी स्थूल कृश गौर श्याम। हे देहाचे देहधर्म। मी काणा मुका बहिरा परम। हे जाण धर्म इंद्रियांचे ॥ १५० ॥ क्षुधातृषादि अनुक्रम। हा प्राणांचा प्राणधर्म। कामक्रोधलोभादि संभ्रम। हा मनोधर्म मनाचा ॥ ५१ ॥ सत्वगुणाची जागृती। रजोगुणें स्वप्नस्फूर्ती। तमोगुणें जाड्य सुषुप्ती। जाण निश्चितीं देहयोगें ॥ ५२ ॥ देहासीं येतां मरण। मी मेलों म्हणे तो आपण। देहासी जन्म होतां जाण। जन्मलेपण स्वयें मानी ॥ ५३ ॥ इंद्रियें विषयो सेविती। ते म्यां सेविले मानी निश्चितीं। स्वर्गनरकभोगप्राप्ती। सत्य मानिती देहात्मता ॥ ५४ ॥ अन्न आकांक्षी प्राण। त्यातें भक्षी हुताशन। तत्साक्षी चिदात्मा आपण। तो म्हणे म्यां अन्न भक्षिलें ॥ ५५ ॥ हे अवघे माझे धर्म। ऐसा आत्म्यासी जंव दृढ भ्रम। तंव मिथ्याचि अतिदुर्गम। संसारविषम भ्रमें भोगी ॥ ५६ ॥ त्या भोगाचें फळ गहन। अविश्रम जन्ममरण। स्वर्गनरक पापपुण्य। भ्रमें आपण सत्य मानी ॥ ५७ ॥ संसार मूळीं निर्मूळ। तोही भ्रमफळें सदाफळ। जो

आत्मखूण समजली. ४६ हें उद्धवाचें वचन ऐकून श्रीकृष्ण परमानंदानें डोलूं लागला व आपल्या जीवाचें त्याच्यावरून लिंबलोण उतरून टाकण्यास तयार झाला. ४७ आत्म्याला भवबंध नाहीं व शेवटीं देहालाहि तें दिसत नाहीं. हा विवेक ज्यांस कळत नाहीं त्यांस भवबंध आहे, असें हरि सांगत आहे. १४८.

—हें तुझें म्हणणें खरें आहे; तथापि त्या दोहोंचा अशाप्रकारें विवेक न होणें हेंच संसाराचें मूळ आहे, असें पुढील पांच श्लोकांनीं भगवान् सांगतात—

श्रीभ० उ०-भगवान् म्हणाले–यावत् अविवेकिनः आत्मनः देहेन्द्रियप्राणैः सन्निकर्षणं तावत् अपार्थं अपि संसारः फलवान्–जोंवर अविवेकी आत्म्याचा देह, इंद्रियें व प्राण यांच्याशीं संबंध असतो तोंवर मिथ्या असलेलाहि संसार अनुभवाला येतो. [असंग आत्म्याचा देहादिकांशीं संबंध कसा हें ' अविवेकिनः ' या पदानें सांगितलें आहे. आज्ञानामुळें–आत्मा व अनात्मा यांच्या विवेकभावामुळें मिथ्या संबंधहि होतो. स्वप्रकाश आत्म्याचा आज्ञानामुळें संसार कसा संभवतो, या आक्षेपाचें उत्तर ' तो मिथ्या आहे तरी त्याचा अनुभव येतो म्ह० तो तत्त्वतः नाहीं ' असा याचा भावार्थ.] १२.

वर्णाश्रमाच्याहि पलीकडे असलेला, बंध-मोक्षापासून अलिप्त असलेला, देहद्वंद्वाला स्पर्शहि न करणारा श्रीहरि उद्धवाच्या हितासाठीं बोलूं लागला. ४९ मी स्थूल, कृश, गोरा, काळा हे शरीराचे धर्म आहेत. मी काणा, मुका, बहिरा हे इंद्रियांचे धर्म आहेत. १५० तहान, भूक हे प्राणांचे धर्म आहेत. काम-क्रोध-लोभादि हे मनाचे धर्म आहेत. (ब्र. सू. भा. अ. १ पृ. ५०) ५१ सत्त्वगुणानें जागृति, रजोगुणानें स्वप्नस्फूर्ति, तमोगुणानें जाड्य व सुषुप्ति हीं देहयोगानें होत असतात. ५२ देहाला मरण आलें असतां ' मी मेलों ' असें तो म्हणतो, आणि देह जन्मला असतां ' माझा जन्म झाला ' असें समजतो. ५३ इंद्रियें विषयसेवन करितात. तरी तो ' मीच विषयोपभोग घेतों ' असें मानितो. स्वर्ग व नरक, यांतील भोग प्राप्त झाले असतां देहात्मता खरी समजतो. ५४ प्राण अन्नाची इच्छा करितो; पण त्याला अग्नि भक्षण करितो व चिदात्मा त्याचा साक्षी असतां ' तें अन्न मीच खाल्लें ' असे तो म्हणतो. ५५ हे सारे धर्म माझेच आहेत, असा जीवाला जोंपर्यंत पूर्णपणें भ्रम होतो, तोंपर्यंत मिथ्या असणारा हा दुर्गम संसार तो विषयभ्रमानें भोगितो. ५६ त्या भोगाचें फल मोठें दुष्कर आहे. अविश्रांत जन्म-मरण, स्वर्ग-नरक, पाप-पुण्य हें सगळें तो भ्रमानें खरेंच मानितो. ५७ निरंतर निर्मूल असलेला संसार या भ्रामक फलानें फळतो व तो अविवेकी लोकांना मोठा प्रबल वाटून

कां अविवेक्यां अतिप्रबळ। सर्वकाळ फळलासे ॥ ५८ ॥ जेथ सत्य अर्थ नाहीं। तो अनर्थ म्हणिजे पाहीं। त्याचा फळभोग तोही। बाळबागुलन्यायीं भोगावा ॥ ५९ ॥ आशंका ॥ गगनकमळांची माळा। जैं वंध्यापुत्र घाली गळां। तैं संसारभोगाचा सोहळा। आत्म्याच्या जवळा देखिजे ॥ १६० ऐसें न घडतें केवीं घडे। तेचि अर्थीचें वाडेंकोडें। श्रीकृष्ण उद्धवापुढें। निजनिवाडें सांगत ॥ ६१ ॥

अर्थे ह्यविद्यमानेऽपि संसृतिर्न निवर्तते। ध्यायतो विषयानस्य स्वप्नेऽनर्थागमो यथा ॥ १३ ॥

सत्यार्थ नसतांही संसार। निवर्तेना अतिदुर्धर। याचि अर्थींचा विचार। निजनिर्धार अवधारीं ॥ ६२ ॥ वंध्यापुत्राचिया ऐसें। संसारा सत्यपण नसे। संत म्हणों तरी हा नासे। काळवशें सहजेंचि ॥ ६३ ॥ संसार जैं संत होता। तैं ब्रह्मज्ञानेंही न नासता। हा संतासंत नये म्हणतां। अनिर्वाच्य कथा पैं याची ॥ ६४ ॥ अविचारितां याचें कोड। अविवेकें हा अतिगोड। विषयध्यानें वाढे रूढ। संकल्प सदृढ मूळ याचें ॥ ६५ ॥ हा नसतचि परी आभासे। निद्रिता स्वप्नीं अनर्थ पिसें। तेवीं संसार मायावशें। विषय आभासें भोगवी ॥ ६६ ॥ जंव जंव विषयसेवन। तंव तंव वाढे विषयध्यान। विषयध्यानें भवबंधन। सदृढ जाण उद्धवा ॥ ६७ ॥ विषयसेवनें भवबंधन। जीवासी झालें दृढ पूर्ण। तें जीवन्मुक्तासी विषयभान। दैवयोगें जाण दिसताहे ॥ ६८ ॥ जीवन्मुक्तासी विषयप्राप्ती तेणें बुडाली त्याची मुक्ती। ऐशी आशंका न धरीं चित्तीं। तेंचि श्रीपति विशद सांगे ॥ ६९ ॥

यथा ह्यप्रतिबुद्धस्य प्रस्वापो बह्वनर्थभृत्। स एव प्रतिबुद्धस्य न वै मोहाय कल्पते ॥ १४ ॥

सदा-सर्वदा [illegible] भासतो. ५८ जेथें खरा अर्थ नाहीं त्याला अनर्थ म्हणावें व त्याचें फलहि मुलांच्या बागुलबुवाच्या न्यायानें भोगावें. ५९ (आशंका–) आकाशपुष्पाची माला वंध्यापुत्राच्या गळ्यांत जर घालतां येईल, तर संसारभोगाचा सोहळा आत्म्याला घडेल! १६० पण असा हा न घडणारा प्रकार कसा घडेल याचेंच उत्तर श्रीकृष्ण उद्धवाला [illegible] आवडीनें व निर्णयपूर्वक सांगत आहे. १६१.

—' [illegible] असत् देहादिकाला संसारस्फूर्तिहेतुत्वहि कोणत्या कारणानें आहे ! ' उत्तर—

अस्य [illegible] ध्यायतः स्वप्ने यथा अनर्थागमः तथा अर्थे अविद्यमाने अपि हि संसृतिः न निवर्तते–विषयाचें [illegible] या आत्म्याला स्वप्नांत जशी अनर्थप्राप्ति होते, त्याप्रमाणें अर्थ विद्यमान नसतांनाहि याच्या संसाराची निवृत्ति [illegible]. १३.

[illegible] नसतांहि तो अत्यंत दुर्धर होऊन सुटत नाहीं. या अर्थाचा निश्चित निर्णय ऐक. ६२ वंध्यापुत्र[illegible] सत्यपण नाहीं. त्याला सत्य म्हणावें तर तो कालानें सहजच नाश पावतो. ६३ संसार जर [illegible] ब्रह्मज्ञानानेंहि नाश पावला नसता. म्हणून याला सत्य किंवा मिथ्या ठरवितांच येत नाहीं. असा हा अगम्य [illegible] अविचारामुळेंच हा आवडतो. अविचारानेंच तो अतिगोड वाटतो. विषयचिंतनानें हा वाढतो. संकल्प हेंच याचें [illegible] हा नसूनहि भासतो. निजलेल्याला स्वप्नांत जसें अनर्थाचें वेड लागावें, तसा हा संसार मायेच्या [illegible] विषय भोगवितो. ६६ जेवढें जेवढें विषयसेवन करावें, तेवढें तेवढें विषयांचें ध्यान वाढतें आणि हे [illegible] भवबंधन दृढ होतें, हें खात्रीनें जाण. ६७ विषयसेवनामुळें जीवांचें भवबंधन दृढ झालें आहे. [illegible] जीवन्मुक्तालाहि दैवयोगानें भोगावें लागतें. ६८ जीवन्मुक्ताला विषयप्राप्ति झाली असतां [illegible] नाहींशी होईल, अशी शंका मनांत धरूं नये. म्हणून श्रीहरि तेंच स्पष्ट करून सांगत आहे. [illegible].

— [illegible] ज्ञानामुळें जीवन्मुक्तालाहि विषयस्फूर्ति होणें अशक्य नाहीं आणि ती जर अपरिहार्य आहे, तर [illegible] ...

यथा हि [illegible] प्रस्वापः बह्वनर्थभृत् सः एव प्रतिबुद्धस्य मोहाय न वै कल्पते–ज्याप्रमाणें झोंपलेल्या पुरुषाचें स्वप्न [illegible] अनेक अनर्थांचें पोषण करितें, पण तेंच स्वप्न जागा झालेल्या पुरुषाच्या मोहाला कारण होत नाहीं. १४.

सज्ञान आणि अज्ञान । यांसी जें विषयसेवन । त्यांचा अनुभव भिन्नभिन्न । तेंही लक्षण अवधारीं ॥ १७० ॥ जेवीं स्वप्नींची विषयप्राप्ती । स्वप्नस्थ साचचि मानती । तेचि विषय जागृतीं स्फूर्ती । परी सत्यप्रतीति त्यां नाहीं ॥ ७१ ॥ तेवीं अज्ञानां विषयसेवन । तेणें विषयासक्त होय मन । तेंचि मुक्तांप्रति जाण । मिथ्यादर्शन विषयांचें ॥ ७२ ॥ नटनाट्यलोकाचारीं । संपादी स्त्रीपुरुषव्यवहारीं । मुक्तासी तैशी परी । गृहदारीं नांदतां ॥ ७३ ॥ कां लेंकरांच्या खेळाप्रती । तुळसीदळ घेऊनि हातीं । वडे मांडे क्षीर तूप म्हणती । एकीं कल्पिती अनेकत्व ॥ ७४ ॥ तेवीं जीवन्मुक्तासी देख । जगीं विषयो अवघा एक । त्यासी नानात्वें भाविती लोक । परी तो अनेक देखेना ॥ ७५ ॥ दृढ धरोनि देहाभिमान । मी माझें जें विषयस्फुरण । तेंच भवबंधाचें कारण । विशद श्रीकृष्ण सांगत ॥ ७६ ॥

शोकहर्षभयक्रोधलोभमोहस्पृहादयः । अहंकारस्य दृश्यन्ते जन्म मृत्युश्च नात्मनः ॥ १५ ॥

देहाभिमानाचे पोटीं । अनेक दुःखांचिया कोटी । त्यांची संकळितें गुणगोठी । कृष्ण जगजेठी सांगत ॥ ७७ ॥ देहाभिमानाचें कार्य एथ । अद्वैतीं वाढवी द्वैत । इष्टानिष्टीं समस्त । जग व्याप्त तेणें कीजे ॥ ७८ ॥ नश्वरा इष्टाचा नाश देख । तेणें देहअहंता मानी दुःख । या नांव गा महाशोक । सकळही लोक मानिती ॥ ७९ ॥ नश्वर विषयप्राप्ती । आल्हाद उपजे चित्तीं । त्या नांव हर्ष म्हणती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ १८० ॥ बळी मिळोनि समस्त । आप्त विषयो विभांडूं पाहत । तेणें कासावीस होय चित्त । भय निश्चित या नांव ॥ ८१ ॥ आप्तकामाचें अवरोधन । ज्याचेनि अणुमात्र होय जाण ।

सज्ञान आणि अज्ञान यांच्या विषयसेवनाची पद्धत अगदीं भिन्न भिन्न आहे. त्यांचें लक्षण सांगतों, ऐक. १७० स्वप्नांतील विषय जसे त्या स्वप्नापुरतेच सत्य असतात, जागृतींत त्या विषयांचें नांवहि नसतें, ७१ त्याप्रमाणें अज्ञ मनुष्याचें मन विषयसेवनांत आसक्त होतें. पण मुक्त तेंच विषयदर्शन मिथ्या मानितो. ७२ नाटकांतील नट जसे रंगभूमीपुर्ताच स्त्री-पुरुषांचा व्यवहार करितात, त्याप्रमाणें मुक्त आपल्या घरीं स्त्रीपुत्रांमध्यें नांदत असतो. ७३ किंवा भातुकलीच्या खेळांत मुलें हातांत एक तुळशीपत्र घेऊन त्यालाच वडे, मांडे, खीर, तूप इत्यादि नांवें देतात व एकाच्याच ठिकाणीं अनेकाची कल्पना करितात, ७४ त्याप्रमाणें जीवनन्मुक्ताला जगांत सगळा एक परब्रह्म हा विषय दिसत असतो. लोकांनीं अनेक प्रकारच्या कल्पना केल्या तरी तो अनेकत्व पहात नाहीं. ७५ दृढ अभिमान धरून 'मी व माझें' असें जें विषयस्फुरण तेंच भवबंधाचें कारण आहे. श्रीकृष्ण तेंच आतां स्पष्ट करून सांगत आहे. १७६.

—अहंकाररूप देहादिसंबंधच संसाराचें मूळ आहे, असें अन्वय-व्यतिरेकानें सांगतात.—

शोक०...... स्पृहादयः जन्म मृत्युः च अहंकारस्य दृश्यन्ते आत्मनः न—शोक, हर्ष, भय, क्रोध, लोभ, मोह, स्पृहा इत्यादि आणि जन्म व मृत्यु हे अहंकाराचेच धर्म आहेत, आत्म्याचे नाहींत; कारण ते प्रतीतीला येतात. [सुषुप्तींत अहंकार नसतो, त्यामुळें शोकादिकहि नसतात. पण सुषुप्तींत आत्मा नसतो, असें नाहीं; पण शोकादिक नसतात. अर्थात् ते अहंकाराचेच धर्म आहेत. शिवाय 'मी सुखी' ही प्रतीति जशी येते, तशी चैतन्य सुखी, अशी प्रतीति येत नाहीं. शिवाय शोकादिक साक्षिवेद्य आहेत, त्यामुळें कुशत्वादिक हे जसे द्रष्ट्याचे धर्म नव्हेत, तसेच सुखादिकहि द्रष्ट्या आत्म्याचे धर्म नव्हेत.] १५.

देहाभिमानाच्या पोटांत कोट्यवधि दुःखें भरलेलीं आहेत. त्यांचीं गुणकार्यें जगजेठी श्रीकृष्ण थोडक्यांत सांगत आहे. ७७ देहाभिमानाचें कार्य असें आहे कीं, तें अद्वैतांत द्वैत उत्पन्न करितें. त्यामुळें हें सगळें जगत् इष्ट व अनिष्ट यांनीं व्यापिलें आहे. ७८ नाशिवंत असलेल्या इष्ट पदार्थांचा नाश झाला असतां देह-अहंता दुःखी होते. त्यालाच महाशोक असें म्हणतात. तो सगळे लोक मान्य करितात. ७९ नश्वर विषयांची प्राप्ति झाली असतां मनाला अत्यंत संतोष होतो. उद्धवा ! त्यालाच हर्ष म्हणतात. १८० बलवान् लोक मिळून कलह करून आपल्या प्रिय विषयप्राप्तींत अडथळा आणितात. त्या वेळीं जीव कासावीस होतो. यालाच भय असें म्हणतात. ८१ इष्ट विषयाच्या प्राप्तींत

त्याचे करूं धांवे हनन । क्रोध संपूर्ण त्या नांव ॥ ८२ ॥ गांठी झाल्याही धनकोडी । कवडी वेंचितां प्राण सोडी । या नांव लोभाची बेडी । कृपण परवडी पुरुषाची ॥ ८३ ॥ कर्माकर्म हिताहित । इष्टानिष्ट नाठवी चित्त । विवेकशून्य स्तब्धता प्राप्त । मोह निश्चित या नांव ॥ ८४ ॥ नित्य करितां विषयसेवन । मनीं विषयइच्छा गहन । अखंड विषयांचें ध्यान । स्पृहा जाण ती नांव ॥ ८५ ॥ इत्यादि हे नाना गुण । अथवा कां जन्ममरण । आत्म्यासी संबंध नाहीं जाण । हें देहाभिमान स्वयें भोगी ॥ ८६ ॥ जागृति आणि देखिजे स्वप्न । तेथ वसे देहाभिमान । ते ठायीं हे दिसती गुण । सुषुप्तीस जाण गुण नाहीं ॥ ८७ ॥ जेथ वृत्ति निरभिमान । तेथ जन्ममरणादि हे गुण । सर्वथा नुठती जाण । गुणासी कारण अभिमान ॥ ८८ ॥ जळीं स्थळीं वायु झगटी । जळीं तरंग स्थळीं नुठी । ते तरंगता जळाचे पोटीं । तेवी शोकादि गुणकोटी अहंतेमाजीं ॥ ८९ ॥ बद्धता झाली अहंकारासी । म्हणसी मुक्ति व्हावी त्यासी । ते अहंता लागली जीवासी । तेंचि हृषीकेशी सांगत ॥ १९० ॥ अंत्यजाचा विटाळ ज्यासी । गंगास्नानें शुद्धत्व त्यासी । तें गंगास्नान अंत्यजासी । शुद्धत्वासी अनुपयोगी ॥ ९१ ॥ तेवीं अहंता जडली जीवासी । ते त्यागितां मुक्तत्व त्यासी । परी मुक्तत्व अहंकारासी । कल्पांतेंसी घडेना ॥ ९२ ॥

देहेन्द्रियप्राणमनोभिमानो जीवोऽन्तरात्मा गुणकर्ममूर्तिः ॥
सूत्रं महानित्युरुधेव गीतः संसार आधावति कालतन्त्रः ॥ १६ ॥

प्रतिबंध करणाराचा वध करावयास धांवणें यालाच क्रोध म्हणतात. ८२ कोट्यवधि धनाच्या राशी जरी संग्रहीं असल्या तरी त्यांतील एक कवडी खर्च झाली असतां जो प्राणच सोडितो; तो कृपण पुरुष होय. ८३ त्याच्या कृतीला लोभाची बेडी म्हणतात. कर्म-अकर्म; हित-अहित, इष्ट-अनिष्ट, यांचें मनाला कधीं स्मरणहि होत नाहीं. विवेकशून्य व स्तब्ध होऊन रहाणें याला मोह असें म्हणतात. ८४ नित्य विषयसेवन करीत असतांहि मनांत गहन विषयेच्छा असणें व अखंड विषयांचें ध्यान करणें याला स्पृहा असें म्हणतात. ८५ अशा प्रकारचे हे अनेक गुण किंवा जन्म-मरण यांचा आत्म्याशीं संबंध नाहीं. देहाभिमान स्वतःच तो भोगीत असतो, असें जाणावें. ८६ जागृति व स्वप्न यांत देहाभिमान असतो, म्हणून त्या दोन्ही अवस्थांमध्यें हे गुण दिसतात. परंतु सुषुप्तींत म्ह० गाढ झोंपेंत हे गुण नसतात. ८७ वृत्ति जेव्हां निरभिमान असते तेव्हां जन्म मरणादि गुण केव्हांहि उद्भवत नाहींत. अभिमानच गुणांचें कारण आहे. ८८ वायु जलावर व भूमीवर वहात असतो; परंतु जलांतील लाटा कांहीं भूमीवर उठत नाहींत. यावरून लाटा उसळणें हा धर्म जसा जलांतच असतो; त्याचप्रमाणें शोकादिक कोट्यवधि धर्म अहंतेमध्यें रहातात. ८९ म्हणून अहंकाराला बद्धता आहे, त्यामुळें त्यालाच मुक्ति मिळावी, असें जर तूं म्हणशील तर अहंता जीवाला लागलेली आहे. तेंच श्रीकृष्ण सांगत आहे. १९० अंत्यजाचा विटाळ ज्याला झाला असेल तो मनुष्य गंगास्नानानें शुद्ध होतो; पण अत्यंज कांहीं गंगास्नानानें शुद्ध होत नाहीं. ९१ त्याप्रमाणें जीवाला अहंकार जडला आहे. तो टाकिला असतां जीव मुक्त होतो. परंतु अहंकारमुक्त होणें कल्पांतींहि घडणार नाहीं. १९२.

—' अहोपण, संसार हा जर अहंकाराचा धर्म आहे, तर मुक्तीहि त्याचीच असली पाहिजे. त्यामुळें मुक्तावस्थेंत अहंकाराचा अवशेष प्राप्त होतो. ' उत्तर—

देहेन्द्रियप्राणमनोभिमानः अन्तरात्मा जीवः गुणकर्ममूर्तिः—देह, इंद्रियें, प्राण व मन यांच्या ठिकाणीं ज्याच गुप्त जीव आहे, तो आत्माच त्याचा गुप्त जीव आहे. म्हणूनच त्याची मूर्ति गुण-कर्ममयी आहे. सूत्रं महान् इति उरुधा इव गीतः—आणि याप्रमाणें सूक्ष्म उपाधींनीं तो सूत्र, महान् इत्यादि शब्दांनीं सांगितलेला आहे. संसारे कालतंत्रः आधावति—तो या संसारांत कालरूपी परमेश्वराच्या अधीन होऊन सर्वथा धांवतो. [त्यामुळें मुक्तावस्थेंत अहंकारावशेषप्रसक्ति हा दोष येत नाहीं, असा त्याचा भावार्थ] १६.

अनंत अपार ज्ञानघन । मायातीत आत्मा पूर्ण । तोचि झाला मायेचें अधिष्ठान । अंतरात्मा जाण यालागीं म्हणिपे ॥ ९३ ॥ माया व्यापूनि अपार । यालागीं बोलिजे परमेश्वर । मायानियंता साचार । यालागीं ईश्वर म्हणिपे तो ॥ ९४ ॥ तोचि अविद्येमाजीं प्रतिबिंबला । यालागीं जीव हें नाम पावला । तोचि देहाध्यासें प्रबळला । अहंकार झाला या हेतु ॥ ९५ ॥ जो संकल्पविकल्पउपाधीन । स्वयें होऊनि ठेला मन । त्या मनासी करावया गमन । दशेंद्रियें जाण तोचि झाला ॥ ९६ ॥ त्यासी इंद्रियांचा आधार । सुखदुःखभोगांचा निकर । पापपुण्यांचा चमत्कार । देहाचा आकार तोचि झाला ॥ ९७ ॥ त्या देहाचें जें कारण । सत्व रज तमोगुण । ते तीन्ही गुण जाण । तोचि आपण स्वयें झाला ॥ ९८ ॥ गुणक्षोभाचें निजवर्म । झाला पंचविषय परम । विषयभोगादि क्रियाकर्म । स्वयें स्वधर्म होऊनि ठेला ॥ ९९ ॥ तिन्ही गुणांचें जन्मकारण । झाला महतत्त्व सूत्र प्रधान । एवं संसार अवघा जाण । ईश्वर आपण स्वयें झाला ॥ २०० ॥ त्या संसाराची आधावती । गुणसाम्यें तोचि प्रकृती । तेथ उत्पत्ति स्थिति प्रळयांतीं । क्षोभिका शक्ति काळ तो झाला ॥ १ ॥ तो काळ आपुल्या सत्ताशक्तीं । उपजवी पाळी संहारीं अंतीं । ऐशा पुनः पुनः आवृत्ती । नेणों किती करवीत ॥ २ ॥ एवं संसार तो ब्रह्मस्फूर्ती । लीलाविग्रहें साकारस्थिती । मी विश्वेश्वर विश्वमूर्ती । बहुधा व्यक्ती मी एक ॥ ३ ॥ यालागीं जो जो पदार्थ दिसे । तेणें तेणें रूपें आत्मा भासे । मजवेगळा पदार्थ नसे । हें मानी विश्वासें तो धन्य ॥ ४ ॥ मीचि एक बहुधा व्यक्ती । वेदही साक्षी येचि अर्थीं । 'विश्वतश्चक्षु' या वेदोक्तीं । श्रुति मज गाती सर्वदा ॥ ५ ॥ ऐसें असतां नवल कैसें । जीव भुलला कल्पनावशें । अहंता वाढवी देहाध्यासें । तो म्हणे देव न दिसे तिहीं लोकीं ॥ ६ ॥ सत्य मानूनि भेदभान । जीव झाला अतिअज्ञान । भुलला आपण्या आपण । देहाभिमान दृढ झाला ॥ ७ ॥ देहाभिमानाचें दृढपण । तेंचि बद्धतेचें लक्षण । देहाभिमानाचें

अनंत, अपार, ज्ञानघन, मायातीत, परिपूर्ण असा जो आत्मा तोच मायेचें अधिष्ठान होतो. म्हणून त्याला अंतरात्मा म्ह० कूटस्थ जीव म्हणतात. ९३ तो मायेला व्यापून अपार आहे. म्हणून त्याला परमेश्वर म्हणतात. तो मायेचा नियंता आहे, म्हणून त्याला ईश्वर म्हणतात. ९४ तोच अविद्येमध्यें प्रतिबिंबित झाल्यामुळें त्याला 'जीव' हें नांव प्राप्त झालें. तोच देहाध्यासानें प्रबल होतांच अहंकार झाला. ९५ तोच संकल्प-विकल्प या उपाधीच्या संसर्गानें स्वतःच मन होऊन राहिला. त्या मनाला संचार करण्यासाठीं तोच दहा इंद्रियें झाला. ९६ त्या इंद्रियांचा आधार व पाप-पुण्यांचा चमत्कार आणि सुखदुःखभोगांचा समुदाय असा हा देहाचा आकारहि तोच बनला. ९७ त्या देहाचें कारण जे सत्त्व-रज-तम तेहि तोच झाला. ९८ गुणक्षोभाचें मुख्य वर्म जे पांच विषय, विषयभोगादि क्रिया व स्वधर्म हीं तो स्वतःच होऊन राहिला. ९९ तीन गुणांच्या उत्पत्तीचें कारण जें महत्तत्त्व, सूत्र, प्रधान तें सर्व तोच झाला. अशा प्रकारें ईश्वर स्वतःच सगळा संसार झाला. २०० त्या संसाराची आश्रयभूत प्रकृति गुणसाम्यानें तोच झाला. त्यांतील उत्पत्ति-स्थिति-लयकाळीं क्षोभ करणारी शक्तिहि तोच झाला. १ तो काळ आपल्या सत्ताशक्तीनें जीवांना उत्पन्न करितो, त्यांचें पालन करितो व शेवटीं संहार करितो. तो अशा पुनः पुनः किती आवृत्त्या करावयास लावितो, त्याची गणती नाहीं. २ याप्रमाणें हा सगळा संसार परब्रह्माची स्फूर्ति आहे. त्याला लीलाशरीरानें आकार आला आहे. मी विश्वेश्वर, विश्वरूप आहें. नानाप्रकारचे पदार्थहि मीच आहें. ३ जो जो पदार्थ दिसतो, त्या त्या रूपानें आत्मा भासतो. माझ्याहून वेगळा असा पदार्थच नाहीं. यावर जो विश्वास ठेवील तो धन्य होय. ४ मी एक असून अनेक झालों आहें. याला वेदहि साक्षी आहे. 'विश्वतश्चक्षुः' ही वेदवचनरूपी श्रुति निरंतर माझें गान करीत आहे. ५ पण असें असतांना काय आश्चर्य आहे पहा ! जीव कल्पनेनेंच भुलला आहे. तो देहाध्यासानें अहंकार वाढवितो आणि म्हणतो कीं, त्रिभुवनांतहि देव नाहीं. ६ द्वैताचें भान खरें मानून जीव अत्यंत अज्ञानी झाला आहे. तो आपला आपण भुलला, इतका त्याचा देहाभिमान दृढ झाला आहे. ७ दृढ देहाभिमान हेंच बद्धतेचें लक्षण आहे. हा देहा-

निरसन । मुक्तता जाण ती नांव ॥८॥ समूळ मिथ्या देहाभिमान । मिथ्या भेदाचें भवभान । त्याचें आद्यंत निर्दळण । होतें लक्षण हरि सांगे ॥९॥

असूलमेतद्बहुरूपरूपितं मनोवचःप्राणशरीरकर्म ।
ज्ञानासिनोपासनया शितेन च्छित्त्वा पुनर्गां विचरत्यतृष्णः ॥ १७ ॥

भेदरूपें भवभान । मनसा वाचा कर्म प्राण । देहद्वयाचें स्फुरण । तें निर्मूळ जाण उद्धवा ॥ २१० ॥ भेदें बहुरूप भवपटळ । विचारितां तें निर्मूळ । विचित्र भासावया भवजाळ । आत्म्यावेगळें स्थळ असेना ॥ ११ ॥ आत्म्याहूनि संसार भिन्न । ह्मणती ते केवळ अज्ञान । त्यासी बहुरूप भेदभान । देहाभिमान वाढवी ॥ १२ ॥ त्या देहाभिमानाचे पोटीं । कर्माकर्मांची आटाटी । जन्ममरणांचिया कोटी । दुःख संकटीं जीव भोगी ॥ १३ ॥ ऐसा दुःखदाता देहाभिमान । समूळ जाणोनियां आपण । त्याचें करावया निर्दळण । अनुतापी जो पूर्ण स्वयें होये ॥ १४ ॥ तेणें आचार्यउपास्ती । लाहोनि ज्ञानखड्गाची प्राप्ती । गुरुवाक्यसाहणेप्रती । सतेजद्युती खड्ग केलें ॥ १५ ॥ भववृक्षाचा समूळ कंद । देहाभिमान अतिसुबद्ध । अद्वैतसाधना साधक शुद्ध । तेणें समूळ छेद करावा ॥ १६ ॥ एवं छेदूनि देहाभिमान । उरलेनि आयुष्यें जाण । महीं विचरती सज्जन । निरभिमान निजनिष्ठा ॥ १७ ॥ तेथ इच्छा निंदा द्वेष तृष्णा । सर्वथा नातळे पैं जाणा । मनचि मुकलें मनपणा । इच्छादि तृष्णा तेथ कैंची ॥ १८ ॥ आशंका ॥ समूळ संसार-

---

भिमान नाहींसा होणें, यालाच मुक्ति म्हणतात. ८ देहाभिमान समूळ मिथ्या आहे. संसारस्फूर्तिहि मिथ्या आहे. त्याचा पूर्णपणें नाश कसा करावा; त्याचें लक्षण हरि सांगत आहे. २०९.

—याप्रमाणें अहंकारामुळें प्राप्त झालेल्या बंधाचें उपपादन करून आतां ज्ञानानें त्याची निवृत्ति झाली असतां त्याची मुक्ति होते, असें सांगतात—

एतत् अमूलं—हें सर्व वस्तुतः निर्मूळ आहे, बहुरूपरूपितं—पण अज्ञानामुळें देवादि अनेक शरीरांनीं प्रकट झालें आहे, (किंवा हें लौकिक गारुड्यासारखें आहे. आतां हें काय तेंच सांगतात—) मनोवचः प्राणशरीरकर्म—मन, वाक्, प्राण, शरीर व कर्म हें वस्तुतः निर्मूल असून अज्ञानामुळें अनेक आकारांनीं प्रकाशित होतें. (किंवा मन इत्यादिकांमध्यें अहंभाव ठेवणें हें अज्ञानाचें कार्य आहे.) उपासनया शितेन ज्ञानासिना च्छित्त्वा पुनः अतृष्णः गां विचरति—गुरूच्या उपासनेनें तीक्ष्ण केलेल्या ज्ञानरूपी खड्गानें अहंकाराचा छेद करून पुनः तृष्णारहित होऊन पृथ्वीवर संचार करितो. १७.

उद्धवा ! द्वैतभावनेनेंच संसाराचें [illegible] होतें. मन-वाक्-कर्म व प्राण हें दोन देहाचें स्फुरण आहे. तें निर्मूल आहे, असें तूं जाण २१० भेदानें अनेक प्रकारचा भासणारा हा संसाराचा पडदा, विचार केला असतां मिथ्याच भासतो. हें विचित्र प्रपंचजाळें [illegible] आत्म्यावांचून दुसरें स्थलच नाहीं, ११ आत्म्याहून संसार भिन्न आहे असें जे म्हणतात, ते केवळ अज्ञानी आहेत. त्यांचा देहाभिमानच नानाप्रकारचा भेदभाव वाढवीत असतो. १२ त्या देहाभिमानामुळें जीव कर्माकर्मांचें उत्पादन, जन्म-मरणांच्या राशी, दुःख आणि संकटें भोगीत असतो. १३ हा देहाभिमान याप्रमाणें [illegible] दुःखदायक आहे, हें जाणून त्याचा नाश करण्यासाठीं जो पूर्ण पश्चात्तापयुक्त होतो. १४ त्यानें गुरूची सेवा करून ज्ञानरूपी शस्त्र मिळवावें व तें गुरुवचनरूपी सहाणेवर घांसून त्याला तीक्ष्ण धार चढवावी; १५ अतिदृढ देहाभिमान हाच संसारवृक्षाचा समूळ कंद आहे. साधकानें ज्ञानखड्गानें त्याचा समूळ छेद करावा. १६ सज्जन याप्रमाणें देहाभिमान छेदून आत्मनिष्ठेनें निरभिमान होऊन उरलेलें आयुष्य पृथ्वीवर संचार करण्यांत घालवितात. १७ त्यांना इच्छा, निंदा, द्वेष, तृष्णा सर्वथा स्पर्शहि करीत नाहीं. मनच मनपणाला मुकल्यावर तेथें इच्छातृष्णादि कोठच्या ? १८ आशंका— संसाराचा समूळ नाश करणारें ज्ञान कोणतें ! त्या ज्ञानाचें साधन

निर्दळण । करि ऐसें ज्ञान कोण । त्या ज्ञानासी कोण साधन । साधल्या ज्ञान फळ काय ॥ १९ ॥ याचें समूळ श्रवण । उद्धवाचें वांछी मन । तें जाणोनियां श्रीकृष्ण । स्वयें निरूपण सांगत ॥ २२० ॥

ज्ञानं विवेको निगमस्तपश्च प्रत्यक्षमैतिह्यमथानुमानम् ।
आद्यन्तयोरस्य यदेव केवलं कालश्च हेतुश्च तदेव मध्ये ॥ १८ ॥

नित्यानित्यविवेक । या नांव ज्ञान चोख । देहद्वयाचा प्रकाशक । आत्मा सम्यक जाणती ज्ञाते ॥ २१ ॥ सेवावया स्वादरसनव्हाळी । प्रथम उंसाचीं पानें साळी । मग ऊंस तोही बळें पिळी । तोही रस आळी तैं शर्करा लाभे ॥ २२ ॥ तेही शर्करा परिपाकबळें । तैं साखरचि केवळें । केळें आणि नारेळें । करितां नाना फळें मूळींच्या गोड्या ॥ २३ ॥ तेवीं स्थूलाचें निराकरण । लिंगदेहाचें उपमर्दन । अहंकाराचें निर्दळण । करूनि पूर्ण ब्रह्म पावती ज्ञाते ॥ २४ ॥ तें ब्रह्म निर्गुण निराकार । तद्रूपें देखती चराचर । यापरी विवेकचतुर । वस्तूचा निर्धार जाणती ॥ २५ ॥ यापरी गा विचक्षण । जाणती वस्तूचे लक्षण । या नांव विवेकज्ञान । उद्धवा जाण निश्चित ॥ २६ ॥ वस्तु निःशब्द निर्गुण । तेथ जें श्रुतीचें स्फुरण । इत्थंभूत शब्दज्ञान । वेद तो जाण निगम माझा ॥ २७ ॥ तो मी वेदरूप नारायण । यालागीं वेदवचन प्रमाण । श्रुत्यर्थें शब्दज्ञान । करी पावन पाठकां ॥ २८ ॥ जाणावया निजात्मस्वरूप । देहादि विषयांचा अनुताप । जेणें साधक होती निष्पाप । या नांव तप उद्धवा ॥ २९ ॥ अनुतापें दमितां मन । होय पापाचें क्षालन । तेव्हां श्रुत्यर्थें आपण । कल्पी अनुमान वस्तूचें ॥ २३० ॥ देह जड मूढ अचेतन

कोणतें ! आणि त्या मिळविलेल्या ज्ञानाचें फल काय ! १९ याचें साद्यंत वर्णन ऐकण्याची उद्धवाला इच्छा आहे, हें जाणून श्रीकृष्ण स्वतः होऊन त्यांचें निरूपण करीत आहे. १०—२२०

—त्याच ज्ञानाचें स्वरूप, साधन व फल, यांचें निरूपण करितात—

विवेकः ज्ञानं—विवेक हेंच तें ज्ञान होय. (साधनें सांगतात) निगमः तपः प्रत्यक्षं ऐतिह्यं अथ अनुमानं —वेद, स्वधर्मरूप तप, स्वानुभव, उपदेश हीं ज्ञानाचीं साधनें आहेत. (आतां ज्ञानाचें फल सांगतात—) आद्यन्तयोः यत् एव अस्य मध्ये अपि तत् एव केवलं—उत्पत्तीची पूर्वावस्था व नाशानंतरची अवस्था या दोन अवस्थांमध्यें जें जगाचें कारण असतें, तेंच केवल मध्येंहि असतें, जगत् नसतें. (पण तें काय !) कालः हेतुः च—जो प्रकाशित करितो व जें कारण आहे तेंच. [या विश्वाचें जें कारण आणि प्रकाशक ब्रह्म तद्रूपच हें जगत् आहे. त्याहून पृथक् नाहीं. अशाप्रकारें निश्चय करविणारा व वेदादि साधनांपासून होणारा जो विवेक तेंच ज्ञान होय.] १८.

नित्य वस्तु जें ब्रह्म त्याचा प्रपंचादि अनित्य वस्तूपासून पृथक् करणें याला नित्यानित्यविवेक म्हणतात. यालाच खरें ज्ञान असें नांव आहे. स्थूल व सूक्ष्म या दोन्ही देहांचा प्रकाशक आत्मा आहे, हें ज्ञाते जाणतात. २१ स्वादरसाची चव घेण्यासाठीं अगोदर उंसाचीं पानें तोडतात, नंतर ऊंस पिळून त्याचा रस काढितात आणि तो रस जेव्हां आळवावा तेव्हां साखरेचा लाभ होतो. २२ नंतर त्या साखरेचा पाक करून त्याचीं केळीं, नारळ इत्यादि अनेक आकाराचीं फळें बनविलीं, तरी त्या सर्वांत साखरेची मूळची गोडी जशी कायमच रहाते, २३ त्याप्रमाणें ज्ञाते जन स्थूल देहाचें निराकरण करितात. सूक्ष्मदेहाचा निरास करितात व अहंकाराचा नाश करून पूर्ण ब्रह्माला प्राप्त होतात. २४ तें जें निर्गुण, निराकार ब्रह्म तद्रूपच ते सगळ्या चराचराला पहातात. याप्रमाणें ज्ञानी पुरुष ब्रह्मरूपाचा निश्चय करितात. २५ उद्धवा ! बुद्धिमान् ज्ञाते परब्रह्माचें असें लक्षण जाणतात. यालाच विवेकज्ञान असें म्हणतात. २६ आत्मवस्तु निःशब्द निर्गुण आहे. त्यांत जें श्रुतीचें स्फुरण, जें सर्व शब्दज्ञान तोच माझा वेद आहे, असें तूं जाण. २७ तो मीच वेदरूपी नारायण, म्हणून वेदवचन प्रमाण आहे. श्रुतीचें शब्दज्ञान पाठ करणाराला पावन करितें. २८ उद्धवा ! आत्मस्वरूप जाणण्यासाठीं देहादि विषयांचा जो त्याग, ज्यायोगें साधक निष्पाप होतात; त्याला तप असें म्हणतात. २९ पश्चत्तापानें मनाचे दमन केलें असतां पापाचें क्षालन होतें. तेव्हां तो श्रुत्यर्थाच्या अनुरोधानें आत्मतत्त्वाची अनुमानानें कल्पना करूं लागतो. २३० देह जड, मूढ, अचेतन

तेथ चेतनात्मक नारायण । देहाचें मानूनि मिथ्यापण । अद्वैतीं मन मुसावें ॥ ३१ ॥ तें अद्वैतप्राप्तीचें लक्षण । अनन्यभावें आपण । सद्गुरूसी रिघावें शरण । निरभिमान भावार्थें ॥ ३२ ॥ सद्भावें अनन्य शरण । तो गुरुकृपा पावे आपण । पाहोनि अधिकारलक्षण । गुरु गुह्यज्ञान उपदेशी ॥ ३३ ॥ सर्वंही निष्टंक परब्रह्म । हें श्रुतिगुह्य उत्तमोत्तम । एथ भाग्यें जो सभाग्य परम । त्यासाचि सुगम ठसावे ॥ ३४ ॥ गुरुवचन पडतां कानीं । वृत्ति निजात्मसमाधानीं । विनटोनि ठेली चिद्घनीं । सुखसमाधानीं स्वानंदें ॥ ३५ ॥ तयासी पुढतीं साधन । अथवा कर्माचें कर्माचरण । तेथ बोलों शके कोण । वेदीं मौन घेतलें ॥ ३६ ॥ जेथ द्वंद्वांची निमाली स्फूर्ती । सकळ दुःखांची समाप्ती । देही विदेह-वस्तुप्राप्ती । प्रत्यक्ष म्हणती या नांव ॥ ३७ ॥ पुसूनियां विसराचा ठावो । आठवेंवीण नित्य आठवो । अखंड स्वरूपानुभवो । प्रत्यक्ष पहा हो या नांव ॥ ३८ ॥ मी आत्मा स्वानंदकंद । ऐसा अखंडत्वें परमानंद । प्रत्यक्ष पदाचा हा निजबोध । स्वयें गोविंद बोलिला ॥ ३९ ॥ हाचि बोध सभाग्याकडे । श्रवणमात्रें आतुडे । एका मननें जोडे । एका सांपडे निदिध्यासें ॥ २४० ॥ एकासी गा प्रत्यगावृत्तीं । हा बोध ठसावे चित्तीं । एका माझिया अद्वैत भक्तीं । मी सगळा श्रीपति आतुडें ॥ ४१ ॥ निजबोध साधावया पूर्ण । उद्धवा हेंचि मुख्य साधन । एवं साधलिया निजज्ञान । फळ कोण तें ऐक ॥ ४२ ॥ जो मी सृष्टिआ-दिअंतू । नित्यमुक्तत्वें अहेतु । तो मी भवमूळा मूळहेतू । सृष्टिस्रजिता अच्युतू स्वलीला ॥ ४३ ॥ तेथ रजोगुणाचिये स्थितीं । स्रष्टृरूपें मीचि पुढतीं । अद्वैतीं दावीं अनेक व्यक्ती । सृष्टिउत्पत्ति कर्ता तो मी ॥ ४४ ॥ बुद्धिबळें एका काष्ठाचे पोटीं । तेथ राजा प्रधान पशु प्यादा उठी । त्यांसी पूर्वकर्म नाहीं गांठी । तेवीं निष्कर्में सृष्टिप्रकाशिता मी ॥ ४५ ॥ निष्कर्में जग समस्त । स्रजिता मीमांसकमत । ठकोनि ठेलें निश्चित । जग सदोदित निष्कर्मब्रह्म ॥ ४६ ॥ जैसे मूळेंवीण सफळ झाड । वाढविलें निजांगीं

आहे. त्यांत चेतनात्मक नारायण आहे. देहाचें मिथ्यापण जाणून मन अद्वैतांत रंगतें. ३१ त्या अद्वैतप्राप्तीचें लक्षण असें आहे. मोठ्या श्रद्धेनें व अनन्य भावानें सद्गुरूला शरण जावें. ३२ सद्भावानें अनन्य शरण गेलें असतां सद्गुरु प्रसन्न होतो व शिष्याचा अधिकार पाहून त्याप्रमाणें गुह्य ज्ञानाचा उपदेश करितो. ३३ सर्व एकरूप परब्रह्म आहे. हें श्रुतीचें उत्तमोत्तम गुह्य आहे. जो परम भाग्यवान् असेल त्याच्याच मनावर हें ठसतें. ३४ गुरुवचन कानांवर पडतांच वृत्ति चित्स्वरूपांत तल्लीन होऊन आत्मानंदांत स्थिर होते. ३५ त्यानंतर त्याला दुसरें साधन किंवा कर्माचें कर्माचरण कोण सांगूं शकणार ! वेदानींच तेथें मौन धरिलें आहे. ३६ जेव्हां द्वंद्वांची स्फूर्ति नाहींशी होते, सगळ्या दुःखांची समाप्ति होते, देहाला विदेहावस्था प्राप्त होते तेव्हां त्याला प्रत्यक्ष असें म्हणतात. ३७ विस्मरणाचें ठिकाणच घालवून आठवणीवांचून नित्य स्मरण रहातें असा जो स्वरूपानुभव त्याला प्रत्यक्ष असें म्हणतात. ३८ मी आत्मा स्वानंदाचा कंद आहें, असें जें परिपूर्ण, परमानंद, प्रत्यक्ष पदाचें ज्ञान तें स्वतः श्रीकृष्णानें सांगितलें. ३९ हें ज्ञान भाग्यवानाला केवल श्रवणानें प्राप्त होतें. कोणाच्या मनावर नुसत्या मननानें ठसतें व कोणाला ध्यानानें प्राप्त होतें. २४० प्रत्यगात्म्याच्या चिंतनानें हें ज्ञान कोणाच्या चित्तांत बिंबतें. कोणाला माझी अद्वैतभक्ति केल्यानें मी सगळा श्रीपति लाधतों. ४१ उद्धवा ! आत्मज्ञानप्राप्तीचें हेंच मुख्य साधन आहे. याप्रमाणें आत्मज्ञान झाल्यावर त्याचें फल कोणतें, तें ऐक. ४२ मी जो सृष्टीचा आदि व अंत, नित्यमुक्त असल्यामुळें निष्काम, तो मी प्रपंचाच्या उद्भवाचा मूळ हेतु आहें. आपल्या लीलेनें सृष्टि उत्पन्न करणारा मीच आहें. ४३ पुढें रजोगुणाच्या साह्यानें सृष्टिकर्त्याच्या रूपानें मीच अद्वैतांत अनेक व्यक्ति दाखवितों. याप्रमाणें मी सृष्टीची उत्पत्ति करणारा होतों. ४४ बुद्धिबळाच्या खेळांत एकाच लाकडाचे राजा, प्रधान, प्यादा, उंट, घोडा हीं बनविलेलीं असतात. त्यांच्या पदरीं जसें पूर्वकर्म नसतें, तसा मी निष्कर्मतेनें सृष्टि प्रकाशित करितों. ४५ सृष्टिकर्त्यानें निष्कर्मानें जगत् निर्माण केलेलें पाहून मीमांसकांचें मतहि कुंठित झालें. असें हें जगत् निरंतर निष्कर्म ब्रह्मच आहे. ४६ मूळावांचूनच सफळ

गोड । तेवीं सृष्टिसंरक्षणीं कोड । मज निचाडा चाड प्रतिपालनीं ॥ ४७ ॥ जेवीं बुद्धिबळांचा खेळ । अचेतनीं युद्ध प्रबळ । तेवीं लोकरक्षणीं कळवळ । सृष्टिप्रतिपाळ मी कर्ता ॥ ४८ ॥ प्रकृतीच्या जडमूढ सारी । पुरुषाचेनि सचेतन निर्धारीं । काळफांसें घेऊनि करीं । खेळविता चराचरीं मी एक विष्णु ॥ ४९ ॥ तेथ अचेतना जुंझरीं । न मरत्या महामारामारीं । एका जीत एका हारी । उभयपक्षांतरीं खेळविता मी ॥ २५० ॥ सोंगटी निमालियापाठीं । कवण पुण्यात्मा चढे वैकुंठीं । कोण पडले नरकसंकटीं । तैसा जाण सृष्टीं बंधमोक्ष ॥ ५१ ॥ तेवीं न मोडतां एकलेपण । त्या खेळाच्या ऐसें जाण । जगाचें करीं मी पालन । दुजेपण नातळतां ॥ ५२ ॥ दोराचा सर्पाकार । सबळ बळें मारी वीर । तैसा सृष्टीसी संहार । मी प्रळय रुद्र पैं कर्ता ॥ ५३ ॥ स्वप्नीं भासले जळ संपूर्ण । तेथूनि जागा होतां आपण । स्वप्न निर्दळितां कष्ट कोण । तैसा मी जाण प्रळयकर्ता ॥ ५४ ॥ सृष्टीसी उत्पत्ति स्थिति निधन । आत्मा आत्मत्वें अखंड पूर्ण । तेंचि स्वरूप सज्ञान । स्वानुभवें आपण होऊनि ठेलें ॥ ५५ ॥ तें निजरूप झालों म्हणणें । हेंही बोलणें लाजिरवाणें । तें स्वयंभ असतां ब्रह्मपणें । होणें न होणें भ्रममात्र ॥ ५६ ॥ मिथ्या दोराचा सर्पाकार । भासतां तो असे दोर । निवर्तल्या सर्पभरभार । दोर तो दोर दोररूपें ॥ ५७ ॥ तेवीं सृष्टीसी उत्पत्ति होतां । आत्मा जन्मेना तत्त्वतां । सृष्टीचा प्रतिपाळकर्ता । आत्मा सर्वथा वाढेना ॥ ५८ ॥ सृष्टीसी महाप्रळय होतां । आत्मा नायके प्रळयवार्ता । उत्पत्तिस्थितिनिधनता । आत्मा तत्त्वतां अविकारी ॥ ५९ ॥ एवं साधनीं साधूनि ज्ञान । साधक झाले सज्ञान । तें अबाधित ब्रह्म पूर्ण । स्वयें आपण होऊनि ठेले ॥ २६० ॥ अज अव्यय स्वानंदघन । साधक झाले ब्रह्म पूर्ण । हें ज्ञानाचें फळ संपूर्ण । उद्धवा जाण निश्चित ॥ ६१ ॥ हें ज्ञान फळ आलिया हाता । उत्पत्ति स्थिति प्रळय होतां । अखंड परिपूर्ण निजात्मता । ते सदृष्टांता हरि सांगे ॥ ६२ ॥

वृक्ष जसा आपल्या हातानें मशागत करून प्रेमानें वाढवावा, त्याप्रमाणें सृष्टिसंरक्षणाची व तिचें प्रतिपालन करण्याची मज निष्कामाला आवड आहे. ४७ बुद्धिबलाच्या डावांत अचेतन राजाचेंच प्रबल युद्ध जुंपतें. त्याप्रमाणें लोकांच्या संरक्षणाच्या कळवळ्यानें मी सृष्टीचें प्रतिपालन करितों. ४८ प्रकृतीच्या जड, मूढ सोंगट्या घेऊन त्यांना पुरुषाच्या योगानें सचेतन करून, काळरूपी फांसे हातांत घेऊन सगळ्या चराचर सृष्टीला खेळविणारा मी एक विष्णुच आहें. ४९ त्या अचेतनाच्या युद्धांत अमरालाहि महामृत्यु येतो. एक जिंकितो व एक हरतो. दोन्ही पक्षांत खेळविणारा मीच आहें. २५० सोंगटी मेल्यावर कोणी पुण्यवान् वैकुंठाला जातो तर कोणी नरकवासाच्या अनर्थांत पडतो. त्याप्रमाणें सृष्टीचे हे बंध-मोक्ष आहेत. ५१ तसेंच, माझा एकटेपणा न सोडितां व त्या खेळाप्रमाणें मी दुजेपणाला स्पर्शहि न करितां, जगाचें पालन करितों. ५२ दोरीला साप समजून वीर त्याला मोठ्या बळानें झोडितो, त्याप्रमाणें मी प्रलयकाळचा रुद्र सृष्टीचा संहारकर्ता आहें. ५३ स्वप्नांत विपुल जल दिसतें पण जाग येतांच तें घालविण्यास प्रयास पडत नाहींत ! याप्रमाणें मी प्रलयकर्ता आहें. ५४ उत्पत्ति, स्थिति व लय सृष्टीलाच आहेत. आत्मा आत्मस्वरूपानें अखंड परिपूर्ण आहे. ज्ञानी स्वतःच त्या स्वरूपाला प्राप्त होऊन राहिले आहेत. ५५ 'तें आत्मस्वरूप मी झालों.' हें बोलणेंहि लाजिरवाणें आहे. कारण ब्रह्म स्वयंभूच आहे. त्याला 'होणें, न होणें' म्हणणें हा भ्रम आहे. ५६ 'दोर सर्प आहे' असें मिथ्याच भासतें; पण तो भ्रम दूर झाला म्हणजे 'हा सर्प नसून दोर आहे' हें कळतें. वास्तविक त्या दोराचें मूळचें रूप कायमच असतें, ५७ त्याप्रमाणें सृष्टीची उत्पत्ति झाली असतां आत्मा उत्पन्न होत नाहीं. सृष्टीचें प्रतिपालन करितेवेळीं आत्मा रेंसभरहि वाढत नाहीं. ५८ सृष्टीचा महाप्रलय झाला असतां आत्म्याला प्रलयाची वार्ताहि नसते. याप्रमाणें उत्पत्ति-स्थिति-लय या तीन्ही अवस्थांमध्यें आत्मा वास्तविक विकाररहितच असतो. ५९ याच साधनानें ज्ञान संपादन करून साधक ज्ञानी झाले व आपण स्वतःच अबाधित पूर्ण ब्रह्म होऊन राहिले. २६० उद्धवा ! साधक अज, अव्यय, आनंदरूप पूर्ण ब्रह्म होऊन राहिले. हें ज्ञानाचें पूर्ण स्वरूप आहे, असें निश्चयानें जाण, ६१ हें ज्ञानफल एकदां हातीं आलें म्हणजे उत्पत्ति, स्थिति, व प्रलय या तीन्हीं कालीं अखंड परिपूर्ण आत्मस्वरूपच रहातें. आतां हरि तेंच दृष्टान्तासह सांगत आहे. २६२.

यथा हिरण्यं सुकृतं पुरस्तात्पश्चाच्च सर्वस्य हिरण्मयस्य ।
तदेव मध्ये व्यवहार्यमाणं नानापदेशैरहमस्य तद्वत् ॥ १९ ॥

मुकुट कुंडलें करकंकणें । न घडितां सोनें सोनेपणें । त्याची करितां नाना भूषणें । लेणेंपणें उणें नव्हेचि हेम ॥ ६३ ॥ ते मोडतां अळंकारठसे । सोनें अविकार संचलें असे । तेवीं उत्पत्तिस्थितिविनाशें । माझें स्वरूप चिदंशें अविनाशी ॥ ६४ ॥ माझें स्वरूप शुद्ध परब्रह्म । तेथ नाना रूप नाना नाम । भासतांही जग विषम । ब्रह्म समसाम्य समन्वयें ॥ ६५ ॥ जेवीं सूर्याचे किरण । सूर्यावेगळे नव्हती जाण । तेवीं जग मजशीं अभिन्न । तेंचि निरूपण हरि सांगे ॥ ६६ ॥

विज्ञानमेतत्त्रियवस्थमङ्ग गुणत्रयं कारणकार्यकर्तृ ।
समन्वयेन व्यतिरेकतश्च येनैव तुर्येण तदेव सत्यम् ॥ २० ॥

सत्वगुणें जागरण । रजोगुणें दिसे स्वप्न । तमोगुणें सुषुप्ति जाण । लागे संपूर्ण गाढ मूढ ॥ ६७ ॥ ऐसें तिहीं अवस्थायुक्त मन । कार्य कर्तृत्व कारण । त्रिविध जग भासे संपूर्ण । ब्रह्म समन्वयें जाण सदोदित ॥ ६८ ॥ मृत्तिकेवेगळा घट न दिसे । तंतूवेगळा पट न प्रकाशे । तेवीं मजवेगळें जग नसे । जें जें भासे तें

आतां नानाभेदव्यवहाराचा आश्रय असलेल्या या जगालाहि कारणमात्ररूपत्व आहे, हें दृष्टान्तानें स्पष्ट करितात—

यथा सर्वस्य हिरण्मयस्य पुरस्तात् पश्चात् च सुकृतं हिरण्यं अस्ति मध्ये नानापदेशैः व्यवहार्यमाणं तत् एव तद्वत् अहं अस्य—ज्याप्रमाणें कुंडलादि सुवर्णालंकाराच्या उत्पत्तीपूर्वीं व नाशानंतर जें कुंडलादि आकारानें रचिलेलें सुवर्ण असतें. तेंच कडें, कुंडल, कंठभूषण इत्यादि नांवांनीं मध्यें व्यवहार केलें जातें. त्याचप्रमाणें मी या विश्वाचा कारणभूत व त्याच्या सर्व व्यवहाराचा आश्रय आहें, विश्व माझ्याहून पृथक् नाहीं. १९.

मुकुट, कुंडलें, हातांतील कंकणें हें घडविण्याच्या आधीं सोनें सोनेंपणानेंच असतें. त्या सोन्याचे अनेक अलंकार घडविले असतां सोन्यांत बदल होत नाहीं. ६३ पुनः ते अलंकार मोडले तरी सोन्याचें मूळचें स्वरूप कायमच असतें. त्याप्रमाणें उत्पत्ति-स्थिति-लय झाले असतां माझें स्वरूप ब्रह्मरूपानें अविनाशीच असतें. ६४ माझें स्वरूप शुद्ध परब्रह्म आहे. त्याला विविध रूपें व अनेक नांवें दिल्यामुळें हें जगत् विषम भासतें. परंतु ब्रह्म सर्वत्र समन्वयेंच भरलेलें आहे. ६५ सूर्याचे किरण जसे सूर्याहून वेगळे नसतात, तसें जगत् माझ्याहून भिन्न नाहीं. त्याचेंच निरूपण आतां हरी करीत आहे. २६६.

—यानंतर कार्याची कारणमात्ररूपता सांगून प्रकाश्याची प्रकाशकरूपता सांगतात—

अङ्ग—अरे बाबा उद्धवा ! त्रियवस्थं विज्ञानं गुणत्रयं कारणकार्यकर्तृ एतत्—जाग्रदादि तीन अवस्थांमध्यें असलेलें जें विज्ञान म्ह० मन, त्या अवस्थांचें कारणरूप जें गुणत्रय आणि कारण कार्य कर्तृ म्ह० अध्यात्म, अधिभूत व अधिदैव यारूपानें जें हें गुणत्रयकार्यभूत त्रिविध जगत् तें, येव एव तुर्येण समन्वयेन भवति—ज्या सामान्य ज्ञानमात्र तुर्याच्या अनुवृत्तीनें सिद्ध होतें व्यतिरेकतः च- आणि व्यतिरेकानें समाध्यादि—अवस्थांमध्यें जें असतें, तत् एव सत्यं—तेंच सत्य आहे. [त्या सामान्य चैतन्यप्रकाशानेंच सर्व प्रकाशित होतें, ते चक्षूचें चक्षु, श्रोत्रांचें श्रोत्र वगैरे आहे, असें ' उपनिषदांतून वगैरे सांगितलें आहे. त्यावरून तुरीयानें अनुवृत्त झालेलेंच जगत् प्रकाश पावतें, ही गोष्ट सिद्ध होते. पण यावर विशेष विज्ञानावांचून तुरीय आमच्या कधींच अनुभवास येत नाहीं ' अशी आशंका घेऊन ' समाध्यादि—अवस्थांमध्यें विज्ञानावांचून जें प्रतीत होतें ' असें म्हटलें आहे.] २०.

सत्वगुणानें जागृति, रजोगुणानें स्वप्न आणि तमोगुणानें गाढ, मूढ अशी सुषुप्ति प्राप्त होते, हें खात्रीनें जाण. ६७ याप्रमाणें मन तीन अवस्थांनीं युक्त आहे. कार्य-कर्तृत्व-कारण यांनीं जगत् तीन प्रकारचें भासते. ब्रह्म सर्वत्र व्यापून रहातें. ६८ मृत्तिकेवांचून घट दिसत नाहीं; तंतूंवांचून वस्त्र दिसत नाहीं, त्याप्रमाणें जगत् माझ्याहून भिन्न नाहीं. जें जें भासतें

मद्रूप ।। ६९ जो मी तिनी गुणांतें नातळता । अवस्थात्रयातें नाकळता । तिहीं अवस्थांतें प्रकाशिता । तो मी जाण चवथा तुरीय ।। २७० ।। तिन्ही अवस्था तिन्ही गुण । दृश्य द्रष्टा आणि दर्शन । त्रिपुटीप्रकाशिता पूर्ण । तो मी चवथा जाण तुरीय ।।७१।। जो मी तुरीय सच्चिद्घन । त्या माझ्या ठायीं अवस्थागुण । नभीं नीळिमा मिथ्या भान । तैसें नसतां जाण जग भासत ।। ७२ ।। आशंका ॥ तिहीं अवस्थांचें ज्ञान पाहीं । देखिजे समस्तांच्या ठायीं । चवथें ज्ञान तुरीय कांहीं । ऐकिलें नाहीं गोविंदा ।। ७३ ।। चौथें ज्ञान तुरीय वार्ता मिथ्या म्हणसी न विचारितां । तेचिविखीं विशदार्था । श्रीकृष्ण तत्त्वतां सांगत ।। ७४ ।। व्यतिरेकतश्च ।। देहादि प्रपंचव्यतिरेकता । भूतीं भूतांचा लयो पाहतां । लीन झालिया गुणावस्था । उरे चवथा तुरीयू ।। ७५ ।। तें एवं बोलों जातां । वेदीं मूग आरोगिले सर्वथा । हें अनुभवैकवेद्य तत्त्वतां । शब्दप्रगल्भता सरेना ।। ७६ ।। एथ न चले युक्तिप्रयुक्ती । न चले जाणिवेची व्युत्पत्ती । न चले लक्ष्यलक्षणास्थिती । गुरुकृपाप्राप्ती तुरीय ।। ७७ ।। जागृत्यादि सर्व सत्ता । सुषुप्ति सर्वही असतां । याचा तुरीय मी प्रकाशिता । मजवीण सर्वथा या भासती केवीं ।। ७८ ।। जो सुषुप्तीं साक्षित्व पावता । तो मी तुरीय जाण पां चौथा । त्या मज सत्यस्वरूपता । केला निश्चितार्थां निश्चयो वेदें ।। ७९ ।। या स्वरूपावेगळें एथ । जें भासे तें मिथ्याभूत । तेंचि अर्थीं श्रीकृष्णनाथ । असे सांगत निजबोधें ।। २८० ।।

न यत्पुरस्तादुत यन्न पश्चान्मध्ये च तत्तद्व्यपदेशमात्रम् ।
भूतं प्रसिद्धं च परेण यद्यत्तदेव तत्स्यादिति मे मनीषा ।। २१ ।।

तें सर्व मद्रूपच आहे. ६९ मी जो तिन्ही गुणांना स्पर्श न करणारा, तिन्ही अवस्थांत न सांपडणारा तो मी चवथा तुरीय आहे. २७० तिन्ही अवस्था, तिन्ही गुण व दृश्य, द्रष्टा, दर्शन इत्यादि सगळ्या त्रिपुटी, यांना प्रकाशित करणारा मी चवथा तुरीय आहें. ७१ जो मी तुरीय सत्-चिद्घन, त्या मजमध्यें गुणावस्था नसतांहि, आकाशांत जसा नीळा रंग मिथ्या दिसतो, तसें हें जगत् मिथ्या भासतें. ७२ (आशंका—) हे गोविंदा ! जाग्रदादि तीन अवस्थांचें भान सर्वांमध्यें दिसतें. परंतु चवथ्या तुरीयावस्थेचें ज्ञान मीं कोठें ऐकिलें नाहीं. ७३ (उत्तर-) चवथें तुरीयज्ञानहि मिथ्याच आहे, असें जर विचार न करितां म्हणशील तर त्याचाहि स्पष्टार्थ सांगत आहे, तो ऐक. ७४ (व्यतिरेकश्च—) देहादि प्रपंचाचा व्यतिरेक किंवा भूतांतच होणारा भूतांचा लय पाहिला असतां गुणावस्था लीन होतात व चवथें तुरीय मात्र उरतें. ७५ त्याविषयीं बोलतांना वेदांनाहि मूग गिळून बसावें लागलें आहे. हें तुरीय खरोखर अनुभवानेंच जाणतां येतें. शब्दप्रगल्भता पुरी पडत नाहीं. ७६ त्याच्या पुढें युक्ति-प्रयुक्ति चालत नाहीं. जाणिवेची व्युत्पत्ति चालत नाहीं. लक्ष्य-लक्षणस्थितिहि चालत नाहीं. केवळ गुरुकृपेनेंच तुरीयाची प्राप्ति होते. ७७ जाग्रदादि सर्व सत्ता किंवा सुषुप्ति या सर्वांना प्रकाशित करणारा मी तुरीय आहें. माझ्यावांचून त्या भासणार कशा ! ७८ सुषुप्तींत साक्षित्वानें राहणारा चवथा तुरीय मी आहें; तेंच माझें सत्यस्वरूप आहे, असा वेदांनीं निश्चय केला आहे. ७९ या स्वरूपावांचून इतर जेवढें कांहीं या सृष्टींत भासतें, तें सर्व मिथ्या आहे. श्रीकृष्णनाथ आतां आत्मज्ञानानें त्याविषयींचेंच निरूपण करीत आहे. २८०.

याप्रमाणें जें त्रिकालीं व्यभिचरित होत नाहीं तें सत्य, असें सांगून व्यभिचरित होणाराचें असत्यत्व सांगतात—

यत् पुरस्तात् न उत यत् पश्चात् न तत् मध्ये च न तद्व्यपदेशमात्रं—जें कार्य उत्पत्तीच्या पूर्वीं नसतें व जें नाशानंतर नसतें, तें मध्येंहि नसतें, तर तें केवल नाममात्र असतें. कारण यत् यत् परेण भूतं प्रसिद्धं च तत् एव तत् स्यात् इति मे मनीषा—जें जें दुसऱ्यापासून उत्पन्न झालेलें व प्रकाशित केलें गेलेलें तें तेंच केवल आपलें कारण व प्रकाशक एतद्रूप असतें, त्याहून पृथक नसतें, अशी माझी दृढ मति आहे. [‘ विकार नाममात्र आहे, मृत्तिकाच सत्य आहे ’ ‘ हें सर्व ब्रह्म आहे ’ अशी श्रुति असल्यामुळें व कारण आणि प्रकाशक यांहून कार्य व प्रकाश्य यांचा भेदानें अनुभव येत नसल्यामुळें माझा असा निश्चय झाला आहे.] २१.

जागृतीमाजीं जें जें दिसे। तें तें जागृतीसवें नासे। स्वप्नीं जें जें आभासे। तें स्वप्नासरिसें मावळे ॥ ८१ ॥ जागृती स्वप्न निजकार्येंसीं। दोनी हारपती सुषुप्तीपाशीं। सुषुप्ति हारपे जागृतीसीं। यापरी प्रपंचासी सत्यत्व नाहीं ॥ ८२ ॥ प्रपंच सृष्टीपूर्वी नाहीं। प्रळयानंतर नुरेचि कांहीं। मध्येंचि आभासे जें कांहीं। तें मिथ्या पाहीं असंत ॥ ८३ ॥ प्रपंचाचें वोडंबर। नामरूपाचे उभारीं भार। तें प्रत्यक्ष देखों नश्वर। गंधर्वनगरतत्प्राय ॥ ८४ ॥ पित्यादेखतां पुत्र मरे। पुत्रादेखतां पिता झुरे। काळेंकाळ अवघेंचि सरे। कोणी नुरे क्रियेसी ॥ ८५ ॥ सागरीं जे लहरी उसासे। उसासली ते स्वयेंचि नासे। तेवीं नामरूपा आलें दिसे। तें अनायासें नश्वर ॥ ८६ ॥ प्रपंच हें नाममात्र। येरवीं परमात्मा मी स्वतंत्र। एवं संसाराचें जन्मपत्र। नेणोनि दुस्तर मानिती जीव ॥ ८७ ॥ प्रपंच ज्यापासूनि झाला। जेणें सर्वार्थीं प्रकाशिला। अंतीं ज्यामाजीं सामावला। तो तद्रूप संचला निजात्मा ॥ ८८ ॥ शुक्तिकारजतन्यायें जाण। प्रपंच ब्रह्मेंसीं अभिन्न। जें प्रपंचाचें स्फुरें स्फुरण। तें ब्रह्मचि पूर्ण उद्धवा ॥ ८९ ॥ त्या माझेनि सत्य श्रुतिस्मृति। तो मी सत्यप्रतिज्ञ श्रीपती। त्रिसत्य सत्य तुजप्रती। सांगीतला निश्चितीं निजभावार्थ ॥ २९० ॥ ऐकोन देवाचें वचन। उद्धव आशंकी आपण। एकाचेनि मतें जाण। प्रपंच भिन्न मानिती ॥ ९१ ॥ प्रपंचासी देवो कांहीं। निजांगीं आतळला नाहीं। ऐसें तूं कल्पिसी कांहीं। ऐक तेविषयीं सांगेन ॥ ९२ ॥

अविद्यमानोऽप्यवभासते यो वैकारिको राजससर्ग एषः।
ब्रह्म स्वयंज्योतिरतो विभाति ब्रह्मेन्द्रियार्थात्मविकारचित्रम् ॥ २२ ॥

जागृतींत जें जें दिसतें, तें तें जागृतीबरोबर नाहींसें होतें; स्वप्नांत जें दिसतें तें सगळें स्वप्नाबरोबर नाश पावतें. ८१ जागृति व स्वप्न आपापल्या कार्यांसह सुषुप्तींत लीन होतात आणि सुषुप्ति म्ह० गाढ निद्रा जागृतींत नाहींशीं होते. याप्रमाणें प्रपंचाला सत्यत्व नाहीं. ८२ प्रपंच सृष्टीच्या पूर्वी नसतो. प्रळयानंतर नसतो. मध्येंच जें कांहीं भासतें, तें मायिक मिथ्या जाणावें. ८३ प्रपंचाचें अवडंबर नामरूपांच्या राशी निर्माण करितें. तें गंधर्वनगरासारखें मिथ्या असलेलें प्रत्यक्ष दिसतें. ८४ पित्याच्या देखत पुत्र मरण पावतो. पुत्राच्या देखत पिता झुरत असतो. दिवसें-दिवस सगळें नाहींसें होऊन मागें उत्तरक्रिया करण्यासहि कोणी उरत नाहीं. ८५ समुद्रांत लाटा उसळतात व आपणच लीन होतात, त्याप्रमाणें नामरूपाला आलेले सर्व पदार्थ स्वभावतः नश्वर होत. ८६ हा प्रपंच म्ह० जगत् त्याच्या कारणस्वरूपाहून भिन्न नाहीं, नाममात्र भिन्न आहे. एरवीं मी एक स्वतंत्र परमात्माच भरून राहिलों आहें. अशा प्रकारची ही संसाराची जन्मपत्रिका आहे; पण जीव तिला न जाणतां संसाराला दुस्तर मानितात. त्याच्यापासून हा प्रपंच उद्भवला आहे व त्यानेंच त्याला सर्वप्रकारें प्रकाशित केलें आहे. शेवटीं तो प्रपंच ज्यांत लीन होतो, तो स्वस्वरूप आत्मा आपल्या स्वरूपांत कायम असतो. ८८ 'शिंपीवर रूपें भासणें' या न्यायानें प्रपंच ब्रह्माहून भिन्न नाहीं. उद्धवा! प्रपंचाचें जें स्फुरण होतें, तें पूर्ण ब्रह्मच होय. ८९ ज्या माझ्यामुळें श्रुति-स्मृति सत्यत्वाला आल्या, त्या मीं सत्यप्रतिज्ञ श्रीकृष्णानें तुला त्यांचा निश्चित भावार्थ सांगितला. २९० हें श्रीहरीचें भाषण ऐकून उद्धवाच्या मनांत शंका आली कीं, कांहीं मतवादी 'प्रपंच ब्रह्माहून भिन्न आहे' असें मानितात. ९१ पण देव कांहीं प्रपंचाला स्पर्श करीत नाहीं. म्हणून श्रीकृष्ण म्हणतात कीं, तुझ्या मनांत जर अशी कल्पना येईल तर त्याविषयीं सांगतों, ऐक. २९२.

—याप्रमाणें कार्य व प्रकाश्य यांचा कारण व प्रकाशक यांच्याशीं अभेद सांगून उभयविवेकपूर्वक प्रपंचाचा ब्रह्माशीं अभेद सांगतात—

यः एषः वैकारिकः सः एव प्राक् अविद्यमानः अपि राजससर्गः अवभासते—हा जो विचारसमूह तोच उत्पत्तीच्या पूर्वी विद्यमान जरी नसला तरी रजोगुणाच्या द्वारा ब्रह्माचें कार्य आहे व ब्रह्माच्या प्रकाशानेंच अनुभवाला येतो, ब्रह्म तु स्वयं—पण ब्रह्म स्वतः सिद्ध आहे, तें कार्य नव्हे, ज्योतिः च—व तें प्रकाशक आहे, अतः इंद्रियार्थात्मविकारचित्रं ब्रह्म एव विभाति—यामुळें इंद्रियें, विषय, तमात्रें, मन, देवता व पंचभूतें असें हें विचित्र ब्रह्मच भासतें. २२.

मुख्यत्वें विकारी मन पूर्ण। त्यासी मिळूनि तिनी गुण। नसताचि संसार जाण। विचित्राभरण दाखवी॥ ९३॥ मन बुद्धि चित्त अहंकार। आणि अधिष्ठाते सुरवर। हे सत्वगुणांचे विकार। जाण साचार उद्धवा॥ ९४॥ रजोगुणाचीं दशेंद्रियें। पंचभूतें पंचविषये। तमोगुणिया जन्म होये। ते जनासी पाहें भुलविती॥ ९५॥ जेवीं बोडंबरियाचा खेळ। नसतांचि भासे प्रबळ। तेवीं त्रिगुणांचें विचित्र जाळ। मिथ्या निर्मूळ आभासे॥ ९६॥ ब्रह्म स्वयें अकारण। स्वप्रकाशें प्रकाशमान। तेंचि प्रपंचाचें महाकारण। प्रकाशक जाण स्वयें झालें॥ ९७॥ जेवीं छायामंडपींच्या नाना व्यक्ती। तद्रूप भासे दीपदीप्ती। तेवीं जगदाकारें स्वयंज्योती। भासें मी चिन्मूर्ति परमात्मा॥ ९८॥ एवं प्रपंचाचें जें स्फुरण। तें स्वप्रकाश ब्रह्म पूर्ण। हें हातबसूनि ब्रह्मज्ञान। विकल्पच्छेदन हरि सांगे॥ ९९॥

> एवं स्फुटं ब्रह्म विवेकहेतुभिः परापवादेन विशारदेन।
> छित्त्वाऽऽत्मसन्देहमुपारमेत स्वानन्दतुष्टोऽखिलकामुकेभ्यः॥ २३॥

पूर्वीं बोलिलों यथोनिगुती। ब्रह्मज्ञान नानायुक्ती। ते करतलामलस्थिती। प्रकट प्रतीती प्रमाण॥ ३००॥ वेद विवेक अनुमान। ब्रह्मउपदेशाचें लक्षण। ज्ञानाज्ञानाचें फळ पूर्ण। तुज संपूर्ण सांगीतलें॥ १॥ तेथें देहेंद्रियांचें मिथ्यापण। देहात्मभावाचें निराकरण। ब्रह्म अद्वयत्वें परिपूर्ण। तेंही गुह्य ज्ञान प्रकाशिलें॥ २॥ म्यां प्रकाशिलें पूर्ण ज्ञान। जें दुर्लभ दुर्गम दुष्प्राप जाण। हेंचि सिद्धांचें समाधान। हेंचि साधन साधकां॥३॥ जें म्यां सांगीतलें ब्रह्मज्ञान। हेंचि उपदेशशस्त्र तीक्ष्ण। साधक साधूनियां पूर्ण। संशय जाण छेदिती॥ ४॥ म्या सांगीतलें ब्रह्मज्ञान। तेथ संदेह मानी मन। तेणें संदेहेंसीं

मन मुख्यत्वेंकरून विकारी आहे. त्याला तीन्हीं गुणांनीं मिळून मिथ्या संसाररूपानें सजवून दाखविलें आहे. ९३ उद्धवा! मन, बुद्धि, चित्त, अहंकार आणि त्यांच्या अधिष्ठात्री देवता, हे सगळे सत्त्वगुणाचे विकार आहेत. ९४ दहा इंद्रियें हें रजोगुणाचें कार्य व पंचमहाभूतें, पांच विषय हे तमोगुणाचें विकार आहेत. हे गुण लोकांना भ्रमांत पाडितात. ९५ डोंबाऱ्याचा मिथ्या खेळ जसा सत्य भासतो, तसें हें त्रिगुणाचें विचित्र जाळें पसरलें आहे, तें खरोखर मिथ्या असून भासतें. ९६ ब्रह्म स्वतः अकारण आहे. तें स्वयप्रकाशानेंच प्रकाशतें. तेंच प्रपंचाचें महाकारण होऊन स्वतःच त्याचें प्रकाशक झालें आहे. ९७ छायामंडपांतील चित्राच्या आकारांसारखा दिव्याचा प्रकाश जसा भासतो, त्याप्रमाणें स्वयंप्रकाश चिद्रूप परमात्मा जगदाकारानें भासतो. ९८ याप्रमाणें जो प्रपंच भासतो तो स्वयंप्रकाश पूर्ण ब्रह्म आहे. हें ब्रह्मज्ञान हस्तगत करून. विकल्पाचा छेद कसा करावा, तें आतां हरि सांगत आहे. २९९.

—आतां उपसंहार करितात—

एवं स्फुटं ब्रह्मविवेकहेतुभिः विशारदेन परापवादेन आत्मसन्देहं छित्वा स्वानंदतुष्टः अखिलकामुकेभ्यः उपारमेत—याप्रमाणें वेद, तप, अनुभव, उपदेश व अनुमान या अति स्पष्ट ब्रह्मविवेक हेतूंनीं आणि अत्यंत निपुण अशा देहादिकांच्या आत्मत्वनिरासानें आत्म्याविषयींचा संदेह घालवून स्वानंदानें संतुष्ट सर्व इंद्रियादिकांपासून निःसंग व्हावें. २३.

अनेक प्रकारच्या युक्तींनीं ब्रह्मज्ञान कसें मिळवावें हें सांगून तें करतलामलवत् स्पष्ट करून दाखविलें. ३०० वेदांतील विचार, अनुमान, ब्रह्मोपदेशाचें लक्षण व ज्ञान-अज्ञानाचें पुरतें फल हें मी तुला सविस्तर सांगितलें. १ त्यांतील देहेंद्रियांचें मिथ्यात्व, देहात्मभावाचें निराकरण व ब्रह्माचें अद्वयत्वानें परिपूर्णत्व हेंहि गुह्यज्ञान प्रकाशित केलें. २ मीं जें गुह्यज्ञान प्रकट केलें, तें दुर्लभ, दुर्गम व दुष्प्राप्य आहे. हेंच सिद्धांचें समाधान व साधकांचें साधन आहे. ३ मीं जें आतां ब्रह्मज्ञान सांगितलें, त्याच उपदेशरूपी तीक्ष्ण शस्त्रानें साधक संशयाचा पूर्णपणें छेद करितात. ४ मी जें ब्रह्मज्ञान सांगितलें त्याविषयीं मनाला संशय वाटतो, साधक त्या संशयासह देहाभिमानाला याच शस्त्रानें

देहाभिमान । येणें शस्त्रें जाण छेदिती ॥ ५ ॥ यापरी संदेहच्छेदन । करूनि द्वैताची बोळवण । निर्दळूनियां मीतूंपण । स्वानंदीं निमग्न साधक ॥ ६ ॥ वर्णाश्रम कुळ जाती । जीवशिवादि पदस्थिती । यांची स्फुरेना अहंकृती । या नांव उपरति उद्धवा ॥ ७ ॥ इहामुत्रादि फळें समस्तें । कोण कामी त्या कामातें । विषयो विषयीं विषयभोगातें । सर्वथा तेथें असेना ॥ ८ ॥ यापरी नित्य निष्काम । साधक झाले आत्माराम । परमानन्दीं निमग्न परम । पावले उपरम येणें योगें ॥ ९ ॥ देहेंद्रियें असतां प्राण । कैसेनि गेला देहाभिमान । उद्धवा ऐसें कल्पील मन । तेंचि निरूपण हरि सांगे ॥ ३१० ॥

नात्मा वपुः पार्थिवमिन्द्रियाणि देवा ह्यसुर्वायुजलं हुताशः ।
मनोऽन्नमात्रं धिषणा च सत्त्वमहंकृतिः खं क्षितिरर्थसाम्यम् ॥ २४ ॥

देह आत्मा नव्हे पार्थिवपणें । इंद्रियें आत्मा नव्हती येणें गुणें । तें तंव देहाचीं उपकरणें । एकदेशीपणें व्यापार ॥ ११ ॥ इंद्रियअधिष्ठाते देव । तेहीं आत्मा नव्हती सर्व । त्यांसी इंद्रियांचा अभाव । आत्मपदीं ठाव त्यां कैंचा ॥ १२ ॥ देह चाळिता जो प्राण । तोही आत्मा नव्हे जाण । प्राण केवळ अज्ञान । करी गमनागमन देहवशें ॥ १३ ॥ प्राण जरी आत्मा होता । तरी तो देहासवें न वचता । यालागीं प्राणासी निजात्मता । जाण सर्वथा घडेना ॥ १४ ॥ आत्मा पृथ्वी नव्हे जडपणें । जळ नव्हे द्रवत्वगुणें । अग्नि नव्हे दाहकपणें । चंचळपणें नव्हे वायू ॥ १५ ॥ आत्मा नभ नव्हे शून्यपणें ।

तोडून टाकितात. ५ याप्रमाणें साधक संशयाचा छेद करून द्वैताची बोळवण करितात आणि 'मीतूंपणा'चा समूळ नाश करून स्वानंदांत निमग्न होतात. ६ उद्धवा ! वर्णाश्रम, कुळ, जाति, जीव-शिवादि अधिकार यांचा अहंकार न होणें यालाच उपरति म्हणतात. ७ त्या कामीं ऐहिक व पारलौकिक फलाचा काय उपयोग ! त्या वेळीं विषय, विषयी आणि विषयोपभोग हे तीन्ही मुळीं राहतच नाहींत. ८ याप्रमाणें नित्य निष्काम असलेले साधक आत्माराम होऊन परमानंदांत निमग्न होतात व त्यायोगानें उपरम पावतात. ९ उद्धवा ! देहेंद्रियें व प्राण असतांनाच देहाभिमान कसा नाहींसा होतो, अशी कल्पना तुझ्या मनांत येईल म्हणून हरि त्याचें निरूपण करीत आहे. ३१०.

—आतां परापवादाचेंच वर्णन करितात—

पार्थिवं वपुः आत्मा न—पृथ्वीचें कार्य असें हें शरीर आत्मा नव्हे. (घटाप्रमाणें) इंद्रियाणि देवाः हि असुः वायुः जलं हुताशः अन्नमात्र मनः धिषणा सत्त्वं अहंकृतिः खं क्षितिः अर्थसाम्यं च—इंद्रियें, त्यांचे अधिष्ठाते देव, प्राण, वायु, जल, अग्नि, अन्नाचा विकार मन, बुद्धि, चित्त अहंकार, आकाश, पृथ्वी, विषय व प्रकृति यांतील कांहींहि आत्मा नव्हे. [मन अन्नाच्या आधारानें रहात असल्यामुळें शरीराप्रमाणें तेंहि आत्मा नव्हे. पृथिव्यादि पांच भूतें, शब्दादि विषय व प्रकृति हीं जड असल्यामुळें घटाप्रमाणें आत्मा नव्हेत. तशींच दुसरींहि अनुमानें 'हि-' शब्दानें सुचविलीं आहेत. जसें—मनाप्रमाणें करणत्व असल्यामुळें इंद्रियें आत्मा नव्हेत.] २४.

देह जड असल्यामुळें तो आत्मा नव्हे. त्याच गुणामुळें इंद्रियेंहि आत्मा नव्हेत. कारण तीं देहाचीं साधनें आहेत व त्यांचा व्यापारहि एकदेशीच असतो. ११ इंद्रियांच्या अधिष्ठात्री देवताहि आत्मा नव्हेत. त्यांना इंद्रियांचा अभिमान असतो. तेव्हां आत्म्यामध्यें त्यांना ठाव कसा मिळणार ! १२ देहाचें चलन-वलन करविणारा जो प्राण, तोहि आत्मा नव्हे. कारण प्राण केवळ अज्ञ आहे. तो देहाच्या वश होऊन त्याच्याबरोबर जा, ये करीत असतो. १३ प्राण जर आत्मा असता तर तो देहाबरोबर गेला नसता. म्हणून प्राण आत्मा नव्हे. पृथ्वी जड असल्यामुळें आत्मा नव्हे. १४ जलाला द्रवत्व असल्यामुळें तें आत्मा नव्हे. अग्नि दाहक असल्यामुळें तो आत्मा नव्हे. वायु चंचल असल्यामुळें तो आत्मा नव्हे आकाश शून्य असल्यामुळें आत्मा नव्हे. मन संकल्प-विकल्पात्मक असल्यामुळें आत्मा नव्हे. १५ अंतःकरण नश्वर असल्यामुळें आत्मा नव्हे. चित्त चिंतन

मन नव्हे संकल्पगुणें । अंतःकरण नव्हे नश्वरलक्षणें । चित्त चिंतनें नव्हे आत्मा ॥ १६ ॥ आत्मा नव्हे अभिमान । त्यासी सुखदुःखांचें बंधन । बुद्धि आत्मा नव्हे जाण । बोधकपण तीमाजीं ॥ १७॥ आत्मा नव्हे तिनी गुण । गुणांमाजीं विकार पूर्ण । महत्तत्व गुणांचें कारण । तें आत्मा आपण कदा नव्हे ॥ १८ ॥ प्रकृति जे गुणसाम्यावस्था । तेही आत्मा नव्हे तत्त्वतां । आत्मदृष्टीं प्रकृति पाहातां । मिथ्या तत्त्वतां ते होय ॥ १९ ॥ जेथ मूळप्रकृतीच वावो । तेथ प्रकृतिकार्याचा कैंचा ठावो । यापरी आत्मानुभवो । निःसंदेहो भोगिती ॥ ३२० ॥ यापरी साधूनियां ज्ञान । साधकीं छेदिला देहाभिमान । ऐसा होऊनियां निरभिमान । सुखसंपन्न साधक ॥ २१ ॥ एवं जे नित्य निरभिमान । त्यांसी प्रारब्धें विषयसेवन । करितां न बाधी दोषगुण । तेंचि निरूपण हरि सांगे ॥ २२ ॥

समाहितैः कः करणैर्गुणात्मभिर्गुणो भवेन्मत्सुविविक्तधाम्नः ।
विक्षिप्यमाणैरुत किं नु दूषणं घनैरुपेतैर्विगतै रवेः किम् ॥ २५ ॥

देहेंद्रियावेगळा पाहीं । अपरोक्षा आत्मा जाणीतला जिहीं । त्यांसी इंद्रियनेमें लाभ कायी । विक्षेपें नाहीं हानी त्यांसी ॥ २३ ॥ दोराचा साप खिळोनि मंत्रीं । मंत्रवादी निःशंक धरी । न खिळितां जो धरी करीं । त्यासीही न करी बाधा तो ॥ २४ ॥ जो मृगजळीं पोहोनि निघाला । तो दैवाच्या कडे पडिला । पोहेंचिना तो नाहीं बुडाला । कोरडा आला ऐलतीरा ॥ २५ ॥ तेवीं देहेंद्रियांचें मिथ्याभान । जाणोनि झाले जे सज्ञान । त्यांसी इंद्रियांचें बंधन । सर्वथा जाण असेना ॥ २६ ॥ जेवीं मिळाला विग्रहधारी । तेवीं तेही वर्ततां शरीरीं । ते इंद्रियकर्माचारी । भवसागरीं न बुडती ॥ २७ ॥ जयासी

करणारें असल्यामुळें आत्मा नव्हे. १६ अभिमानाला सुख-दुःखांचें बंधन असल्यामुळें तो आत्मा नव्हे. बुद्धीला बोधकत्व असल्यामुळें ती आत्मा नव्हे.१७ सत्त्वरजादि तिन्ही गुण विकारी असल्यामुळें ते आत्मा नव्हेत. महत्तत्त्व गुणांचें कारण असल्यामुळें तें कदापि आत्मा नव्हे. १८ प्रकृतीला गुणांची साम्यावस्था असल्यामुळें तीहि आत्मा नव्हे. आत्मदृष्टीनें प्रकृतीकडे पाहिलें असतां तीहि मिथ्या ठरते. १९ जेथें मूळ प्रकृतीच मिथ्या तेथें प्रकृतीच्या कार्याला सत्यत्व कोठचें ! याप्रमाणें साधक संशयरहित होऊन आत्मानुभव घेतात. ३२० साधक असें ज्ञान मिळवून देहाभिमान तोडून टाकितात व ते निरभिमानानें सुखसंपन्न होऊन रहातात. २१ जे असे निरभिमानी साधक असतात, त्यांनीं प्रारब्धवशात् विषयसेवन केलें, तरी त्यांस गुण-दोष बाधत नाहींत. हरि आतां त्याचेंच निरूपण करीत आहे. ३२२.

—याप्रमाणें विवेक-विज्ञानवान् मुक्तांचा इंद्रियाविकृत गुणदोषांशीं कांहीं संबंध नाहीं, असें आतां सांगतात—

मत्सुविविक्तधाम्नः समाहितैः गुणात्मभिः करणैः कः गुणः भवेत्—माझें स्वरूप अगदीं पृथक्पणें ज्याच्या प्रत्ययास आलें आहे, अशा विद्वानाच्या ठिकाणीं शांत गुणरूप इंद्रियांनीं कोणता गुण होणार ! उत विक्षिप्यमाणैः किं नु दूषणं—किंवा चंचल इंद्रियांनीं त्यांच्या ठिकाणीं कोणता दोष होणार ! रुपेतैः वा विगतैः घनैः रवेः किं—आकाशांत आलेल्या व निघून गेलेल्या मेघांनीं सूर्याला काय होणार ! [प्रकाशकाचा प्रकाश्याच्या गुणदोषांशीं संबंध नाहीं, हें येथें सूर्याच्या दृष्टान्तानें सांगितलें.] २५.

'आत्मा देहेंद्रियांहून भिन्न आहे' असें ज्यांनीं जाणलें आहे, त्यांस इंद्रियनिग्रह करण्यांत लाभ कोणता व इंद्रियें विषयलोलुप झालीं तरी त्यांत हानि कसली ! २३ दोरीचा सर्प मांत्रिकानें मंत्रून हातांत धरिला काय किंवा इतरांनीं न भारतांच घेतला काय, दोघांनाहि सर्पापासून पीडा होत नाहीं. २४ मृगजलांत पोहण्यास गेलेला दैवयोगानें तीरावर न भिजतांच येऊन पोंचावा व जो पोहण्यास गेलाच नाहीं, तोहि न बुडतां परतीरावर कोरडाच उभा असावा, २५ त्याप्रमाणें देहेंद्रियांचें ज्ञान मिथ्या आहे. हें जाणून जे सज्ञान झाले, त्यांना इंद्रियांचें बंधन सर्वथा लागत नाहीं. २६ मी जसें लीलाशरीर धारण केलें आहे तसेंच तेहि शरीरांत वागत असतात. ते इंद्रियांनीं कर्में करीत असले तरी भवसागरांत बुडत नाहींत. २७ ज्यांना माझें अपरोक्ष ज्ञान झालें आहे, ते आसन घालून अखंड ध्यान करीत बसले, तरी त्याचा

माझें अपरोक्षज्ञान । तेणें घालोनियां आसन । अखंड धरितां ध्यान । अधिक उपेग जाण असेना ॥२८॥ अथवा तो इंद्रियसंगतीं । दैवें अनेक विषयप्राप्ती । भोगितांही अहोरातीं । ब्रह्मस्थिति भंगेना ॥ २९ ॥ स्थिति न भंगावया हेंचि कारण । माझें स्वप्रकाश आनंदघन । पावले निजधाम ब्रह्म पूर्ण । तेथ विषयस्फुरण बाधीना ॥ ३३० ॥ जेवीं सूर्य उगवोनि गगनीं । लोक सोडवी निद्रेपासूनी । ते लोक कर्मीं प्रवर्तवोनी । अलिप्त दिनमणि जगत्कर्मा ॥ ३१ ॥ तेवीं मी परमात्मा स्वयंज्योती । प्रभा प्रकाशी त्रिजगतीं । त्या जनकर्मांच्या क्रियाशक्तीं । मी अलिप्त निश्चितीं निजात्मा ॥ ३२ ॥ मुक्तासी स्त्रीपुत्रगृहसंग । तेणें वेष्टिला देखों चांग । म्हणसी केवीं मानू निःसंग । तें सांगे श्रीरंग रविदृष्टांतें ॥ ३३ ॥

घनैरुपेतैर्विगतै रवेः किम् ॥

उंच लक्षयोजनें रविमंडळ । बारा योजनें मेघपडळ । तेणें झांकोळिला केवळ । लोक सकळ मानिती ॥ ३४ ॥ परी सूर्य आणि आभाळासी । भेटी नाहीं कल्पांतेंसीं । तेवीं इंद्रियकर्म सज्ञानासी । कदाकाळेंसी स्पर्शेना ॥ ३५ ॥ अभ्र आच्छादी जगाचे डोळे । जग म्हणे सूर्य आच्छादिला आभाळें । ऐसेंचि विपरीत ज्ञान कळे । मायामेळें भ्रांतासी ॥ ३६ ॥ तें अभ्र आल्यागेल्यापाठीं । सूर्यासी न पडे आठीवेठी । तेवीं गृहदारासंगासाठीं । न पडे संकटीं सज्ञान ॥ ३७ ॥ जेवीं सूर्यातें नातळे आभाळ । तेवीं ज्ञात्यासी संग सकळ । इंद्रियकर्मांचा विटाळ । ज्ञात्यासी अळुमाळ लागेना ॥ ३८ ॥ ऐक ज्ञात्याचें रूप परम । तो देहीं असोनि परब्रह्म । यालागीं त्यासी इंद्रियकर्म । समविषम बाधीना ॥ ३९ ॥ ज्ञाता सर्वार्थीं अलिप्त । तेंचि करावया सुनिश्चित । दृष्टांतेंसीं श्रीकृष्णनाथ । स्वयें सांगत साक्षेपें ॥ ३४० ॥

अधिक उपयोग होत नाहीं. किंवा दैवयोगानें प्राप्त झालेल्या अनेक विषयांचा भोग त्यांच्या इंद्रियांनीं रात्रंदिवस जरी घेतला, तरी ते आपल्या आत्मस्थितीपासून ढळत नाहींत. २९ माझ्या स्वयंप्रकाश, आनंदघन व पूर्णब्रह्मरूप अशा निजधामाला प्राप्त झाल्यावर मग विषयांचें स्फुरण न होणें हेंच त्यांची आत्मस्थिति न भंगण्याचें कारण आहे. ३३० सूर्य जसा आकाशांत उगवतो आणि लोकांना निद्रेपासून सोडवून आपल्या कर्मांत प्रवृत्त व्हावयास लावितो, पण तो स्वतः मात्र जगाच्या कर्मापासून अलिप्त रहातो; ३१ तसा मी स्वयंप्रकाश परमात्मा त्रिभुवनाला प्रकाशित करितों, परंतु त्या लोकांच्या कर्मापासून अलिप्त असतों. ३२ 'आतां मुक्त स्त्री- पुत्र गृह यांच्या परिवारांत राहून व्यवहार करीत असलेला दिसत असतां त्याला निःसंग कसें मानावें' म्हणून म्हणशील, तर तेंच रवीचा दृष्टांत देऊन श्रीरंग सांगत आहे. ३३३.

रविमंडळ लक्ष योजनें म्ह० चार लक्ष कोस उंच आहे. मेघाचें पटल बारा योजनें दूर आहे. त्यानें सूर्य आच्छादिला आहे, असें सगळे लोक मानितात. ३४ परंतु सूर्य आणि मेघ यांची कल्पांतींहि भेट होत नाहीं. त्याप्रमाणें ज्ञानसंपन्न माणसाला इंद्रियकर्में कधीं काळींहि स्पर्श करीत नाहींत. ३५ वास्तविक अभ्रें जगाच्या डोळ्याआड येतात, पण लोक म्हणतात कीं, सूर्य आभाळानें झांकला आहे. अशा प्रकारचेंच विपरीत ज्ञान मायेमुळें भ्रांत झालेल्या लोकांना होत असतें. ३६ आभाळ आलें किंवा गेलें तरी सूर्याचा त्यापासून जसा लाभ किंवा हानि नाहीं, त्याप्रमाणें ज्ञानी मनुष्य घर-स्त्री-पुत्र यांच्या संगतीनें संकटांत पडत नाहीं. ३७ सूर्याला जसें आभाळ स्पर्श करीत नाहीं, तसें ज्ञानी माणसाला कोणताच संग बाधत नाहीं. त्यांस इंद्रियकर्मांचा रेंसभरहि विटाळ होत नाहीं. ३८ ज्ञात्याचें स्वरूप अशा प्रकारें श्रेष्ठ असतें. तो देहांत असून परब्रह्म असतो. यास्तव त्याला पाप-पुण्यात्मक कोणतेंच इंद्रियकर्म बाधत नाहीं. ३९ ज्ञानी सर्वांपासून अलिप्त असतो. हेंच निश्चित करण्यासाठीं श्रीकृष्ण स्वतः दृष्टान्त देऊन साक्षेपानें सांगत आहे. ३४०.

यथा नभो वाय्वनलाम्बुभूगुणैर्गतागतैर्वर्तुगुणैर्न सज्जते ।
तथाऽक्षरं सत्त्वरजस्तमोमलैरहंमतेः संसृतिहेतुभिः परम् ॥ २६ ॥

पृथ्वी जळ अनळ अनिळ । त्यांसी नभ व्यापक सकळ । परी पृथ्व्यादिकांचा मळ । नभासी अळुमाळ लागेना ॥ ४१ ॥ नभ पृथ्वीरजें कदा न मैळे । धुरकटेना धूमकल्लोळें । अग्नीचेनि महाज्वाळें । कदाकाळें जळेना ॥ ४२ ॥ वायूचेनि अतिझडाडें । आकाश कदाकाळें न उडे । उदकाचेनि अतिचढें । आकाश न बुडे सर्वथा ॥ ४२ ॥ कां सूर्याचे निदाघकिरणीं । नभ घामिजेना उन्हाळेनी । अथवा हिमाचिया हिमकणी । नभ कांकडोनी हिंवेना ॥ ४४ ॥ पर्जन्य वर्षतां प्रबळ । नभ वोल नव्हे अनुमाळ । यापरी नभ निर्मळ । लावितांही मळ लागेना ॥ ४५ ॥ त्या आकाशासी अलिप्त । जे क्षराक्षरांहीं अतीत । अक्षर परब्रह्म सदोदित । त्रिगुणांतीत चिन्मात्र ॥ ४६ ॥ जें अजरामर अविनाशी । जें प्रकाशमान स्वप्रकाशीं । ऐसिये वस्तूची प्रतीति ज्यासी । अद्वयत्वेंसी फावली ॥ ४७ ॥ जेवीं न मोडितां लागवेगें । सोनटका सोनें झाला सर्वांगें । तेवीं करणीवीण येणे योगें । जे झाले निजांगें परब्रह्म ॥ ४८ ॥ त्यांसी गुणांची त्रिगुण मागी । लावितांही न लगे अंगीं । विषयीं करितां विषयभोगी । ते विषयसंगीं निःसंग ॥४९ ॥ घटीं चंद्रबिंब दिसे । तें घटासी स्पर्शले नसे । ओलें नव्हे जळरसे । देहीं जीव असे अलिप्त तैसा ॥ ३५० ॥ ते घटीं कालविल्या शेण । बिंबप्रतिबिंबा नातळे जाण । तेवीं देहींचे पापाचरण । जीवशिवस्थान ठाकीना ॥ ५१ ॥ घटीं कालविल्या कस्तूरी । बिंबप्रतिबिंब सुवास नेंधरी । तेवीं देहींच्या पुण्याची थोरी । जीवशिवावरी पावेना ॥ ५२ ॥ आकाश जाळावयालागीं । घृतें

असंग झालेल्या विद्वानाला कोणतेच गुण-दोष नाहींत, असें आकाशाच्या दृष्टान्तानें सांगतात——

यथा नभः गतागतैः वाय्वनलाम्बुभूगुणैः ऋतुगुणैः वा न सज्जते—ज्याप्रमाणें आकाश उपन्न होऊन नाश पावणाऱ्या वायु अग्नि, जल व पृथ्वी यांचा सुकविणें जाळणें, ओलें करणें व धुळीनें मलिन होणें इत्यादि गुणांनीं किंवा शीतोष्णादि ऋतुगुणांनीं लिप्त होत नाहीं, **तथा अहंमतेः परं अक्षरं संसृतिहेतुभिः सत्त्व-रजः तमोमलैः न सज्जते**—त्याप्रमाणें **अहंकाराहून सूक्ष्म,** पलीकडे व नित्य असलेलें **अक्षर** संसाराला **कारण** होणाऱ्या **सत्त्व-रज** तम यांच्या विकाररूप मळांनीं लिप्त **होत नाहीं.** [किंवा अहंकाराच्या संसाराचे हेतु असे जे सत्त्व-रज-स्तमो-मल, यांनीं पर अक्षर लिप्त होत नाहीं.] २६.

पृथ्वी, जल, अग्नि, वायु या सर्वांस आकाश व्यापितें; पण पृथ्व्यादिकांचा मळ आकाशाला अणुमात्र स्पर्श करीत नाहीं. ४१ आकाश पृथ्वीच्या धुळीनें कधींहि मळत नाहीं, धुळीच्या कल्लोळानें धुरकटत नाहीं, किंवा अग्नीच्या महाज्वालांनीं तें कधीं जळत नाहीं. ४२ सोसाट्याचा वारा सुटला तरी तें कधीं उडत नाहीं. जलाला मोठी भरती आली तरी त्यांत आकाश बुडत नाहीं. ४३ सूर्याच्या उष्ण किरणांनीं उन्हाळ्यांत आकाशाला घाम येत नाहीं; किंवा बर्फाच्या गारठ्यानें तें कांकडत नाहीं. ४४ पर्जन्याच्या अनिवार वृष्टीनें आकाश यत्किंचित्‌हि ओलें होत नाहीं. आकाश असें निर्मल आहे. त्याला मळ लाविला तरी लागत नाहीं, ४५ त्या आकाशाप्रमाणें जें अलिप्त, क्षराक्षराहूनहि अतीत, तें अक्षर ब्रह्म सदोदित गुणातीत व चिन्मात्र आहे. ४६ जें अजरामर, अविनाशी; स्वयंप्रकाशानें प्रकाशमान त्या परब्रह्माची अद्वैतानें प्रतीति आली ४७ असतां सोन्याचें नाणें जसें सर्वांगानें सोनेंच असतें त्याप्रमाणें साधक कोणत्याहि कर्मावांचून स्वतःच ब्रह्मरूप होतात. ४८ त्यांना गुणांची त्रिपुटी लावली तरी लागत नाहीं. विषयानें त्यांस विषय भोगविले, तरी ते विषयसंगापासून अलिप्तच असतात. ४९ घटांत चंद्रबिंब दिसतें, पण तें घटाला जसें स्पर्शहि करीत नाहीं किंवा त्यांतील जलानें भिजत नाहीं; तसा जीव शरीरांत राहून अलिप्त असतो. ३५० त्या घटांतील पाण्यांत शेण जरी कालविलें तरी तें चंद्रबिंबाला किंवा त्याच्या प्रतिबिंबाला चिकटत नाहीं; त्याप्रमाणें देहाचें पापाचरण जीवा-शिवाला स्पर्शहि करीत नाहीं. ५१ त्या जलांत कस्तुरी मिसळली तर त्याचा सुवास जसा त्या बिंबाला किंवा प्रतिबिंबाला लागत नाहीं, त्याप्रमाणें देहाचें पुण्याचरण जीवा-शिवाकडे येत नाहीं. ५२ आकाशाला जाळण्यासाठीं तूप ओतून महा अग्नि पेटविला तर त्या अग्नीमध्यें आकाश असूनहि

पेटविली महाआगीं । आकाश असता अग्निसंगीं । दाहो अंगीं लागेना ॥ ५३ ॥ अवकाश असोनि अग्निमेळें । अग्निज्वाळें कदा न जळे । तेवीं ज्ञाता विषयकल्लोळें । कदा काळ विषयीं नव्हे ॥ ५४ ॥ गुणाचेनि देहसंगे । योगी वर्ततां येणें योगें । ते भोगितांही विषयभोगें । अलिप्त सर्वांगें सर्वदा ॥ ५५ ॥ हे कळलें ज्यां भोगवर्म । ते देहीं असोनि परब्रह्म । त्यांसी बाधीना भोगभ्रम । अक्षर परम स्वयें झाले ॥ ५६ ॥ ते अक्षर झाले आतां । याही बोलाशी ये लघुता । जन ज्ञानीं अज्ञानीं वर्ततां । अक्षरतां अभंग ॥ ५७ ॥ ते विसरोनि ब्रह्मरूपता । मी देहीं म्हणवी देहअहंता । तेथें वाढली विषयावस्था । दृढ बद्धता तेणें झाली ॥ ५८ ॥ ते निवारावया बद्धता । त्यजावी विषयलोलुपता । विषयत्यागेंवीण सर्वथा । नित्यमुक्तता घडेना ॥ ५९ न जोडतां नित्यमुक्तता । साधक जरी झाला ज्ञाता । तेणें ज्ञातेपणें सर्वथा । विषयासक्तता न करावी ॥ ३६० ॥

> तथापि सङ्गः परिवर्जनीयो गुणेषु मायारचितेषु तावत् ।
> मद्भक्तियोगेन दृढेन यावद्रजो निरस्येत मनःकषायः ॥ २७ ॥

स्वरवर्णयुक्त संपूर्ण । चहूं वेदीं झाला निपुण । तेणें बळें विषयाचरण । कारितां दारुण बाधक ॥ ६१ ॥ सकळ शास्त्रांचें श्रवण । करतळामळक झाल्या पूर्ण । शब्दज्ञानाचें जें युक्तपण । तेंही विषयाचरण बाधक ॥ ६२ ॥ प्राणापानांचिया समता । जरी काळवंचना आली हाता । तरी विषयाची विषयावस्था । जाण सर्वथा बाधक ॥ ६३ ॥ शापानुग्रहसमर्थ नर । आम्ही ज्ञाते मानूनि थोर । त्यांसही विषयसंचार । होय अपार बाधक ॥ ६४ ॥ आसन उडविती योगबळें । दाविती नाना सिद्धींचे मोहळे । त्यांसही विषयांचे भोगलळे । होती निजबळें बाधक ॥ ६५ ॥ इतरांची कोण कथा ।

त्याचा दाह [illegible] आकाशाला लागत नाहीं. ५३ अग्नीबरोबर आकाश असूनहि तें अग्नीच्या ज्वालांनीं जसें जळत नाहीं, [illegible] ज्ञानी विषयांच्या कल्लोळानें कदापिहि विषयी होत नाहीं. ५४ याप्रमाणें योगी गुणांच्या व देहाच्या संगतीनें [illegible] असले तरी ते विषयोपभोग घेत असूनहि त्यापासून सर्वप्रकारें निरंतर अलिप्तच असतात. ५५ हें भोग[illegible] जे जाणतात, ते देहांत असूनहि परब्रह्मच आहेत. त्यांना भोगाचा भ्रम बाधत नाहीं. ते स्वतःच परम अक्षर [illegible]. ५६ 'ते अक्षर झाले' या बोलण्यांतहि कमीपणा आहे. कारण ज्ञानी जरी अज्ञानांत वागत असले [illegible] अक्षरता अभंगच असते. ५७ ब्रह्मस्वरूप विसरून ते जेव्हां देहाभिमानानें 'मी देही' असें म्हणूं [illegible] त्यांची विषयावस्था वाढते व त्यायोगें त्यांना दृढ बंध प्राप्त होतो. ५८ त्या बद्धतेचें निवारण [illegible] टाकावी; कारण विषयत्यागावांचून नित्य मुक्तता सर्वथा घडत नाहीं. ५९ नित्यमुक्ति प्राप्त [illegible] जरी ज्ञानी झाला, तरी त्यानें जाणतेपणीं विषयासक्ति केव्हांहि ठेवूं नये. ३६०.

—[illegible] असम्यक् ज्ञानी पुरुषानें यथेष्ट आचरण करूं नये' असें पुढील दोन श्लोकांनीं सांगतात—

[illegible] मद्भक्तियोगेन मनः कषायः रजः यावत् न निरस्येत तावत् मायारचितेषु गुणेषु सङ्गः परिवर्जनीयः- असें [illegible] भक्तियोगानें मनाचा मल अशी जी विषयासक्ति ती जोंवर निवृत्त झाली नाहीं, तोंवर मायेचीं कार्यें [illegible] त्यांवरील आसक्ति टाकावी. २७.

[illegible] वेदांत निपुण जरी असला, तरी त्यानें मुद्दाम विषयाचरण केल्यास तें अत्यंत बाधक [illegible] शास्त्राचें श्रवण केवल करतलामलवत् झालें तरी त्या शब्दज्ञानसंपन्नत्वाला विषयाचरण [illegible] नानें प्राणापानाची समता जरी साध्य झाली व मृत्युहि हातीं आला तरी सुद्धां [illegible] आणि व[illegible] देण्यास समर्थ असलेले पुरुष 'आम्ही मोठे ज्ञानी' असें मानून विषयाचरण [illegible] अत्यंत बाधक होतें. ६४ योगसामर्थ्यानें आसन अंतराळीं धरणारे व सिद्धीचे अनेक खेळ [illegible] जर विषयेच्छा बाधक होते, ६५ तर इतरांच्या गोष्टी काय सांगाव्या !

मंत्रमूर्ति प्रसन्न असतां । त्यांसीही विषयावस्था । जाण सर्वथा बाधक ॥ ६६ ॥ किंचित् झाल्या स्वरूपप्राप्ती । मी मुक्त हे स्फुरे स्फूर्ती । तथापि विषयांची संगती । त्यासीही निश्चितीं बाधक ॥ ६७ ॥ जेवीं चकमकेची आगी । जाळूं न शके नाटेलागीं । तेवीं ब्रह्मप्राप्ति प्रथमरंगीं । प्रपंचसंगीं विनाशे ॥६८॥ देहाभिमानाचें निदळण । स्वयें करूनियां आपण । नित्यमुक्त म्हणतां जाण । विषयाचरण बाधक ॥ ६९ ॥ विषय मिथ्या मायिक । ते भोगीं जंव भासे हरिख । तंववरी विषय बाधक । जाण निष्टंक उद्धवा ॥ ३७० ॥ तें त्यागावया विषयसेवन । निर्दाळावया देहाभिमान । त्याचियालागीं माझें भजन । साक्षेपें जाण करावें ॥ ७१ ॥ व्रत तप तीर्थ दान । करितां योग याग यजन । वेदशास्त्रार्थ पुराणश्रवण । तेणें देहाभिमान ढळेना ॥ ७२ ॥ भावें करितां माझें भजन । समूळ सुटे देहाभिमान । भक्ति उत्तमोत्तम साधन । भक्ताधीन परब्रह्म ॥ ७३ ॥ ज्ञान वैराग्य निवृत्ती । धृति शांति ब्रह्मस्थिती । यांची जननी माझी भक्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ७४ ॥ चहूं मुक्तींहूनि वरती । उल्हासें नांदे माझी भक्ती । माझे भक्तीची अनिवार शक्ती । तिसीं निश्चिती आकळलों ॥ ७५ ॥ माझें स्वरूप अनंत अपार । तो मी भक्तीनें आकळलों साचार । यालागीं निजभक्ताचें द्वार । मी निरंतर सेवितसें ॥ ७६ भक्तीनें आकळलों जाण । यालागीं मी भक्तांअधीन । माझिये भक्तीचें महिमान । मजही संपूर्ण कळेना ॥ ७७ ॥ बहुतीं करूनि माझी भक्ती । मज ते मोक्षचि मागती । उपेक्षूनि चारी मुक्ती । करी मद्भक्ती तो धन्य ॥ ७८ ॥ ऐशी जेथ माझी भक्ती । तेथ पायां लागती चारी मुक्ती । त्यासी सर्वस्वें मी श्रीपती । विकलों निश्चितीं भावार्थी ॥ ७९ ॥ ते भक्तीच मुख्य ज्यास साधन । यालागीं मी त्या भक्ताअधीन । त्याचें कदाकाळें वचन । मी अणुप्रमाण नुल्लंघीं ॥ ३८० ॥ ते मज म्हणती होईं सगुण । तैं सिंह सूकर होय मी आपण । त्यांलागीं मी विदेही जाण । होय संपूर्ण देहधारी ॥ ८१ ॥ एका अंबरीषाकारणें ।

मंत्रदेवता सिद्ध केलेल्यांनाहि विषयासक्ति सर्वथा बाधक होते. ६६ किंचित् आत्मानुभव येतांच 'मी मुक्त' असें ज्यांना वाटूं लागतें, त्यांसहि विषयांची संगति निश्चयानें बाधक होते. ६७ चकमकीनें उत्पन्न झालेली ठिणगी नळकंड्याला कांहीं जाळूं शकत नाहीं, त्याप्रमाणें आरंभीं प्रपंचाच्या संगतीनें ब्रह्मप्राप्ति नाश पावते. ६८ यास्तव देहाभिमान स्वतः नाहींसा करून, नित्य मुक्त म्हणवून घेऊन, विषयाचरण करणें बाधक आहे. ६९ हे उद्धवा ! विषय मिथ्या, मायिक आहेत. ते भोगतांना जोंवर आनंद होतो तोंवर विषय बाधक आहेत, असें तूं निश्चित जाण. ३७० त्या विषयसेवनाचा त्याग करण्यासाठीं व देहाभिमानाचा नाश करण्यासाठीं माझें भजन अवश्य करावें. ७१ व्रत, तप, तीर्थें, दान, योग, यज्ञ, पूजन, वेदशास्त्रार्थ, पुराणश्रवण यांतील कशानेंहि देहाभिमान ढळत नाहीं. ७२ परंतु भक्तिभावानें माझें भजन केलें असतां देहाभिमान समूळ सुटतो. माझी भक्तिच उत्तमोत्तम साधन आहे. कारण परब्रह्म भक्ताच्या अधीन आहे. ७३ उद्धवा ! माझी भक्ति ज्ञान, वैराग्य, निवृत्ति, धृति, शांति व ब्रह्मस्थिति यांची जननी आहे, हें निश्चयानें जाण. ७४ माझी भक्ति चारी मुक्तींच्याहि वर उल्हासानें रहात असते. माझ्या भक्तीची शक्ति अनिवार आहे तिनें मी बांधला गेलों आहें. ७५ माझें स्वरूप अनंत अपार असतां मी भक्तीनें बांधला गेलों म्हणून मी माझ्या भक्तांच्या दारांत निरंतर असतों. ७६ भक्तीनें बांधला गेल्यामुळें मी माझ्या भक्तांच्या अधीन झालों आहें. माझ्या भक्तांचा महिमा मलाहि कळत नाहीं. ७७ आतांपर्यंत पुष्कळांनीं माझी भक्ति करून मजपाशीं मोक्षच मागितला; पण चारी मुक्तींची उपेक्षा करून जे माझी भक्ति करितात ते धन्य होत. ७८ जे माझी अशी भक्ति करितात, त्यांच्या चारी मुक्ति पायां पडतात. त्यांच्या भावार्थामुळें मी श्रीपति स्वतःला पूर्णपणें विकून घेतों. ७९ ही भक्तीच ज्यांचें मुख्य साधन असतें, त्या भक्तांच्या मी अधीन होतों. त्यांच्या शब्दाचें मी कधींकाळीं देखील अणुमात्रहि उलंघन करीत नाहीं. ३८० त्यांनीं 'मला सगुण हो' असें म्हणतांच मीं नृसिंह, वराह इत्यादि अवतार धारण केले. मी विदेही असतां त्यांच्यासाठीं पूर्ण देहधारी झालों. ८१ एका अंबरीषासाठीं मला दहा जन्म घ्यावे लागले. मी माझ्या अजन्मपणाचा भंग झालेला सहन करितों;

दहा जन्म मज लागले घेणें । अजत्वाचा भंग साहणें । परी भक्तासी उणें येऊं नेदी ॥ ८२ ॥ द्रौपदी नग्न करितां तांतडी । तिळभरी हों नेदींच उघडी । झालों नेसविता वस्त्रें कोडी । भक्तसांकडीं मी निवारीं ॥ ८३ ॥ तो मी भक्तसाहाकारी । अजन्मा त्यांचेनि जन्म धरीं । समही वर्ते अरिमित्रीं । भक्तकैवारी होऊनियां ॥ ८४ ॥ जो माझिया भक्तां हितकारी । तो मज परम मित्र संसारीं । जो माझ्या भक्तांसीं वैर करी । तो मी नानापरी निर्दळीं ॥ ८५ ॥ ऐसा मी भक्तसाह्य श्रीकृष्ण । त्या माझें जे निजभजन । न करूनियां अभाग्य जन । अधःपतन पावती ॥ ८६ ॥ म्हणशी पाप असतां शरीरीं । तुझें भजन घडे कैशा परी । सकळ पापांची बोहरी । माझें नाम करी निमेषार्धें ॥ ८७ ॥ ऐकोनि नामाचा गजर । पळे महापातकांचा संभार । नामापाशीं पापास थार । अणुमात्र असेना ॥ ८८ ॥ माझिया निजनामापुढें । सकळ पाप तत्काळ उडे । तें पाप नामसमर्थ्याकडे । केवीं बापुडें येऊं सके ॥ ८९ ॥ अवचटें सूर्य अंधारीं बुडे । तरी पाप न ये भक्तांकडे । भक्तचरणरेणु जेथ पडे । तेथ मूळ उडे पापाचें ॥३९०॥ माझें नाम ब्रह्मास्त्र जगीं । महापाप बापुडें मुंगी । नामापुढें उरावयालागीं । कस त्याचे अंगीं असेना ॥ ९१ ॥ माझे नामाचा प्रताप ऐसा । माझे भक्तीची कोण दशा । पडलिया मद्भक्तीचा ठसा । तो नागवे सहसा कळिकाळा ॥ ९२ ॥ यालागीं माझें भजन । निर्दळी देहाभिमान । माझेनि भजनेंवीण जाण । देहाभिमान तुटेना ॥ ९३ ॥ जेणें तुटे देहाभिमान । तें कैसें म्हणशी तुझें भजन । अभेदभावें भक्ती पूर्ण । तेणें देहाभिमान निर्दळे ॥ ९४ ॥ भगवद्भाव सर्वांभूतीं । या नांव गा अभेदभक्ती । हे आकळल्या भजन-स्थिती । अहंकृती उरेना ॥ ९५ ॥ माझें नाम ज्याचे वदनीं । माझी कीर्ति ज्याचे श्रवणीं । माझा भाव ज्याचे मनीं । ज्याचे करादिचरणीं क्रिया माझी ॥ ९६ ॥ जो जागृतीमाजीं पाहे मातें ।

पण माझ्या भक्तांना उणेपणा येऊं देत नाहीं. ८२ कौरवांनीं द्रौपदीला वस्त्ररहित करण्याचा प्रयत्न करितांच मी सत्वर धांवलों व तिला तिळभरहि उघडी होऊं न देतां कोट्यवधि लुगडीं नेसविलीं. मी भक्तावरील संकट अशाप्रकारें निवारितों. ८३ मी भक्तांचा साह्यकर्ता जन्मरहित असून त्यांच्यासाठीं जन्म घेतों आणि भक्तांचा कैवार घेऊन शत्रु व मित्र यांच्याशीं समान वागतों. ८४ जो माझ्या भक्तांचा हितकर्ता असतो त्याचा मी संसारांत परम मित्र होतों व जो माझ्या भक्तांशीं वैर करितो, त्याचा मी अनेक प्रकारें नाश करितों. ८५ असा जो मी भक्तांचा साह्यकर्ता श्रीकृष्ण, त्या माझें भजन न करितां अभागी लोक अधोगतीला जातात ८६ तूं म्हणशील कीं, देहांत पापाचा संचय असल्यावर तुझें भजन कसें घडावें ! तर माझें नांव एका अर्ध्यापळांत पापाचें भस्म करून टाकितें. ८७ हरिनामाचा गजर ऐकून पातकांच्या राशी पळून जातात. नामा-जवळ पातकाला अणुमात्र थारा मिळत नाहीं. ८८ माझ्या नांवापुढें सगळें पातक तत्काल उडून जातें. तें बापडें पाप नामस्मरण करणारापुढें कसें येऊं शकणार ! ८९ सूर्य जर अकस्मात अंधारांत बुडेल तर भक्तांकडे पाप येईल. भक्तांच्या चरणांची धूळ जेथे पडते तेथें पापाचें मूळच तुटतें ३९० माझें नांव ब्रह्मास्त्र आहे. त्यापुढें महापाप म्हणजे बापडी एक मुंगी; नामापुढें टिकाव धरण्याचें सामर्थ्य त्यांत नाहीं. ९१ माझ्या नांवाचा प्रभाव असा आहे. मग माझ्या भक्तीची थोरवी काय सांगावी ! माझी भक्ति मनांत ठसली कीं भक्त कळिकाळासहि जुमानीत नाहींत. ९२ म्हणून माझें भजन देहाभिमानाला नाहींसें करितें. माझ्या भजनावांचून देहाभिमान सुटत नाहीं. ९३ 'ज्यानें देहाभिमान सुटतो तें तुझें भजन कसें असतें. !' असें जर विचारशील तर, अभेदभावानें भक्ति केली असतां देहाभिमानाचा पूर्ण नाश होतो. ९४ सर्व प्राणिमात्रांत भगवद्भाव ठेवणें यालाच अभेदभक्ति म्हणतात. अशा प्रकारच्या भजनाची संवय जडली कीं मग अहंकार उरत नाहीं. ९५ ज्याच्या मुखांत माझें नांव, श्रवणांत माझी कीर्ति व मनांत माझा भाव असतो त्याच्या हात-पाय इत्यादि सर्व इंद्रियांची हालचाल मीच करितों. ९६ तो जागृतींत मला पहातो, स्वप्नांत मला एकट्यालाच पहातो. जो आत्मनिष्ठेनें माझ्यावांचून चित्त क्षणभरहि रिकामें

जो स्वप्नीं देखे मज एकातें । जो मजवेगळें चित्त रितें । न राखे निश्चितें निजनिग्रहा ॥ ९७ ॥ यापरी भजनस्थिती । त्रिगुण विकार मावळती । तेणें अहंकाराची निवृत्ती । विषयासक्ति निर्दळे ॥ ९८ ॥ भक्तांसी विषयसेवन । सर्वथा बाधक नव्हे जाण । तो विषय करी मदर्पण । तेणें बाधकपण नव्हे त्यासी ॥ ९९ ॥ नाना साधनें विषयो त्यागिती । त्यागितां परम दुःखी होती । भक्त विषयो भगवंतीं अर्पिती । तेणें होती नित्यमुक्त ॥ ४०० ॥ ग्रासोग्रासीं हरिस्मरण । तें अन्नचि होय परब्रह्म पूर्ण । त्यासी नाहीं बाधकपण । ब्रह्मार्पण सहजेंचि ॥ १ ॥ भक्तांची भजनस्थिती । विषयीं मद्रूपता भाविती । तेणें मावळे विषयस्फूर्ती । नव्हे ती या रीती बाधक ॥ २ ॥ यापरी माझें भजन । करी मनोमळक्षाळण । विकारेंसीं तिन्ही गुण । करी निर्दळण देहाभिमान ॥ ३ ॥ ऐशी न करितां माझी भक्ती । न निर्दाळितां अहंकृती । करणें जे विषयासक्ती । तें जाण निश्चितीं बाधक ॥ ४ ॥ नातुडतां अकर्तात्मबोध । आदरूं नये विषयसंबंध । विषयांचा विषयउद्बोध । अति अशुद्ध बाधक ॥ ५ ॥ जरी विषय मिथ्या मायिक । तरी साधकां अतिबाधक । येचि अर्थीं यदुनायक । विशदार्थें देख सांगत ॥ ६ ॥

यथामयोऽसाधुचिकित्सितो नृणां पुनः पुनः सन्तुदति प्ररोहन् ।
एवं मनोऽपक्वकषायकर्म कुयोगिनं विध्यति सर्वसङ्गम् ॥ २८ ॥

वैद्य नेणे रोगाचें लक्षण । नेणे धातुपुष्ट कीं क्षीण । नेणें पथ्य ना अनुपान । नाडीज्ञान कळेना ॥ ७ ॥ त्यापासाव ओखद घेतां । पुनःपुनः वाढे व्यथा । तेवीं अवैराग्यें त्याग करितां । साधकां बाधकता

राहूं देत नाहीं, ९७. त्याच्या अशा भजनानें त्रिगुणांचे विकार मावळतात. त्यानें अहंकाराची निवृत्ति होते व विषयासक्ति नाश पावते. ९८ माझ्या भक्ताला विषयोपभोग सर्वथा बाधक होत नाहींत. कारण तो विषय मदर्पण करितो. त्यामुळें ते त्याला बाधत नाहींत. ९९ जे अनेक साधनांनीं विषयांचा त्याग करितात ते तो करीत-असतां अत्यंत दुःखी होतात. परंतु माझे भक्त भगवंताला विषय अर्पण करितात व त्यामुळें नित्यमुक्त होतात. ४०० प्रत्येक घासाला हरिस्मरण केलें असतां अन्नच पूर्ण ब्रह्म होतें. त्याचा बाधकपणा जाऊन तें सहजच ब्रह्मार्पण होतें. १ भक्तांच्या भजनाचा प्रकार असा असतो कीं, ते विषयांना मद्रूप पहातात. त्यामुळें त्यांची विषयस्फूर्ति मावळते व याप्रमाणें ती बाधक होत नाहीं. २ अशा प्रकारें माझें भजन वासनांचा क्षय करितें आणि तिन्ही गुणांच्या विकारांसह देहाभिमान नाहींसा करितें. ३ पण माझी अशी भक्ति करून, अहंकार न टाकितां, जे विषयांचें सेवन करितात त्यांस ते विषय निश्चयानें बाधतात, ४ असें समजावें. ' मी अकर्ता आहें ' असा आत्मबोध पूर्ण ठसल्यावांचून विषयांशीं संबंध ठेवूं नये. कारण विषयस्मरण अत्यंत अशुद्ध व बाधक आहे. ५ विषय जरी मिथ्या मायिक आहेत तरी ते साधकाला अत्यंत बाधक होतात. आतां श्रीकृष्ण याचेंच स्पष्टीकरण करीत आहे. ४०६.

—आतां याचेंच दृष्टान्तानें उपपादन करितात—

यथा नृणां आमयः असाधुचिकित्सितः पुनः पुनः प्ररोहान् सन्तुदति—ज्याप्रमाणें मनुष्याचा रोग चांगल्या-प्रकारें उपचार न केलेला असा होत्साता पुनः पुनः उत्पन्न होऊन त्याला पीडा देतो **एवं अपक्वकषायकर्म सर्वसङ्गं मनः कुयोगिनं** विध्यति—याप्रमाणें ज्यांतील रागादि कषाय व तन्मूलक कर्में दग्ध झालेलीं नाहींत व त्यामुळेंच पुत्रादि सर्व विषयां-मध्यें आसक्त होणारें मन असम्यक् ज्ञानी पुरुषाला ज्ञानापासून भ्रष्ट करितें. २८.

ज्या वैद्याला रोगाचें लक्षण ओळखितां येत नाहीं, तो सशक्त आहे कीं क्षीण झाला आहे हें कळत नाहीं, ज्याला पथ्य व अनुपमान समजत नाहीं, नाडीचें ज्ञान नाहीं, ७ त्याच्यापासून औषध घेतलें असतां रोगाची व्यथा

अनिवार ॥ ८ ॥ हृदयीं नाहीं विषयनिवृत्ती । बाह्य त्याग वाढवी विरक्ती । ऐशी जे बहिर्मुद्रास्थिती । ते जाण निश्चितीं कुयोगी ॥ ९ ॥ सांडोनियां भगवद्भजन । वेदविधिमार्गविहीन । ऐसें जें कां त्याग-लक्षण । कुयोग संपूर्ण त्या नांव ॥ ४१० ॥ द्रव्यदाराविषयासक्ती । दृढ वासना असतां चित्तीं । बाह्य त्याग मिथ्या विरक्ती । कुयोग निश्चितीं या नांव ॥ ११ ॥ आम्ही राजयोगी अतिश्रेष्ठ । म्हणोनि विषय भोगी यथेष्ट । वोस पडली वैराग्यपेंठ । कुयोग चोखट या नांव ॥ १२ ॥ आपली चोरूनि विषयासक्ती बाह्य मिरवी मिथ्या विरक्ती । हेचि कुयोगाची स्थितीं । जाण निश्चितीं उद्धवा ॥ १३ ॥ ऐशिया कुयोगियां जाण । पुढती जन्म पुढती मरण । दुखावर्तीं पडिले पूर्ण । सोडवी कोण तयासी ॥ १४ ॥ नव्हेचि इहलोकींचा विषयभोग । नव्हे परमार्थीं शुद्ध त्याग । अंतरला उभय प्रयोग । दुःखभाग कुयोग्या ॥ १५ ॥ परमार्थे त्यागसाधन । करितां अंतराय आले विघ्न । तयासी अवगती नव्हे जाण । जरी अनुताप पूर्ण स्वयें उपजे ॥ १६ ॥

कुयोगिनो ये विहितान्तरायैर्मनुष्यभूतैस्त्रिदशोपसृष्टैः ।
ते प्राक्तनाभ्यासबलेन भूयो युञ्जन्ति योगं न तु कर्मतन्त्रम् ॥ २९ ॥

ब्रह्मज्ञानार्थ केला त्याग । अभ्यासही मांडिला सांग । मध्येंचि वोढवला उपसर्ग । विघ्नें अनेग साधकां ॥ १७ ॥ उपजे कामाचा अतिवेग । खवळे क्रोधाची लगबग । शिष्यसुहृदांचे उद्वेग । मनीं उबग स्वहिताचा ॥ १८ ॥ दारारूपें उपसर्ग । देव देती पैं अनेग । ऐसा अंतरायीं योगभंग । होतां अनुराग उद्धरीं ॥ १९ ॥ अभ्यास करितां अतिनिगुती । दैवें अंतराया योगी येती । तेथ निर्वेद उपजल्या

जशी पुनः पुनः वाढते; त्याप्रमाणें विरक्तीवांचून विषयांचा त्याग केला असतां साधकाला तो अनिवार बाधतो. ८ अंतःकरणांत विषयनिवृत्ति नाहीं. पण बाह्य त्यागानें मात्र जो विरक्ति दाखवितो त्याच्या त्यागाला कुयोग व त्याला कुयोगी म्हणतात. ९ द्रव्य, स्त्री व इतर विषय यांची आसक्ति चित्तांत दृढ असतांना बाहेरून विषयांचा खोटाच त्याग करून विरक्तीचा आव आणणें हा कुयोग होय. ४१० भगवद्भजन सोडून वेदविधिमार्गविहीन असें जें त्यागाचें लक्षण त्याला 'कुयोग' असें नांव आहे. ११ 'आम्ही अति श्रेष्ठ राजयोगी' असें म्हणून यथेच्छ विषयोपभोग घेणें व अंगीं रेंसभरहि विरक्ति नसणें, याला कुयोग म्हणतात. १२ उद्धवा ! मनांतील विषयासक्ति लपवून ठेवून जो बाहेरून मोठी विरक्ति मिरविणें हा त्याचा कुयोग होय, हें खात्रीनें जाण. १३ अशा कुयोगी साधकांना पुनः जन्म व पुनः मरण भोगावें लागतें. असले कुयोगी पूर्णपणें दुःखार्णवांत पडतात. त्यांतून त्यांना कोण सोडविणार ! १४ या लोकीं, विषयभोग मिळत नाहीं व परमार्थासाठीं पूर्णत्यागहि नसतो. याप्रमाणें दोन्ही लाभांना अंतरून कुयोग्याला दुःखी व्हावें लागतें. १५ पण परमार्थासाठीं विषयत्यागाचें साधन आचरीत असतां मध्यें जरी विघ्नें आलीं तरी ज्याच्या मनांत पूर्ण पश्चात्ताप उत्पन्न झालेला असतो त्याला त्यापासून अवगति प्राप्त होत नाहीं. ४१६

—'अहोपण, अल्पस्वल्प विषयासक्तीनेंहि जर ज्ञानाचा भ्रंश होत असेल तर मग उपायासह हा योगमार्ग व्यर्थ आहे' अशी शंका घेऊन सांगतात—

विहितान्तरायैः मनुष्यभूतैः त्रिदशोपसृष्टैः ये कुयोगिनः—ज्यांनीं ज्ञानमार्गात विघ्न केलें आहे अशा बंधु-शिष्यादिरूप देवांनीं उत्पन्न केलेल्या उपसर्गांनीं जे कुयोगी होतात म्ह० योगापासून भ्रंश पावतात, ते प्राक्तनाभ्यासबलेन योगं भूयः युञ्जन्ति—ते पूर्वजन्मांतील अभ्यासबलानें पुनः जन्मान्तरीं ज्ञानसाधनरूप योगाचें अनुष्ठान करितात. न तु कर्मतंत्रं—कर्मांचा विस्तार करीत नाहींत. २९.

साधकानें ब्रह्मज्ञानासाठीं विषयांचा त्याग केला व सांग अभ्यास आरंभिला तर त्यांत मध्येंच अनेक विघ्नें उद्भवतात. १७ काम वेगानें उसळतो क्रोधाची खळबळ उडते, शिष्य, सुहृद् यांचा उपसर्ग होतो आणि मनांत स्वहिताचा कंटाळा येतो. १८ स्त्रीरूपानें देवहि अनेक उपसर्ग सुरू करितात. अशा विघ्नांनीं योगाचा भंग होतो; परंतु त्याची भक्तीच त्याचा उद्धार करिते. १९ एकनिष्ठेनें अभ्यास केल्यास योगांत दुर्दैवानें विघ्नें येतात.

चित्तीं । तोचि अभ्यास पुढतीं करी योगी ।। ४२० ।। निजयोगअभ्यासबळें । जाळी अंतरायदोष समूळें । परी कर्माचीं कर्मठजाळें । योगी कदाकाळें स्पर्शेना ।। २१ ।। अंतरायीं योग छळितां जाण । जरी योगी । पावला मरण । तरी नव्हे कर्माधीन । हें श्लोकार्धेंसीं श्रीकृष्ण बोलिला स्वयें ।। २२ ।। पूर्वीं करितां योगासधन । अदृष्टगतीं अंतराव जाण । योगी पावल्याही मरण । क्षिति कोण तयासी ।। २३ ।। अंतरायपरतंत्र । झाल्या योगी पावे जन्ममात्र । तेथही नादरी कर्मतंत्र । पूर्वाभ्यासें स्वतंत्र प्रवर्ते योगी ।। २४ ।। मार्गस्था मार्गीं गुंती । पडोनियां लागली वस्ती । तो येरे दिवशीं तेचि पंथीं । लागे निश्चितीं निजमार्गा ।। २५ ।। यापरी योगिया आपण । प्राक्तनपूर्वसंस्कारें जाण । योगाभ्यास करी पूर्ण । परी कर्माधीन कदा नव्हे ।। २६ ।। साधनी असतां माझी भक्ती । तैं अणुमात्र न पडे गुंती । मी भक्तकैवारीं श्रीपती । राखे अहोराती निजभक्तां ।। २७ ।। जेथ माझे भक्तीची आवडी । तेथ विघ्नें केवीं रिघती बापुडीं । महाविघ्नांचिया कोडी । माझें नाम विभांडी उद्धवा ।। २८ ।। भजनहीन योगीश्वर । अंतरायें पावे जन्मांतर । तरी तो कर्मीं कर्मपर । नव्हे साचार पूर्वसंस्कारें ।। २९ ।। जे पावले जीवन्मुक्ती । तेही प्रारब्धकर्में वर्तती । मा योगभ्रष्ट कर्म त्यागिती । घडे कैशा रीती म्हणशील ।। ४३० ।। मुक्ताचें जें मोक्षस्थान । तेंचि साधकाचें मुख्य साधन । यालागीं त्या दोघांही जाण । कर्मबंधन बाधीना ।।३१।। मी एक कर्मकर्ता । ऐशी ज्यास नुपजे अहंता । त्यासी हीं जाण सर्वथा । कर्मबंधकता स्पर्शेना ।। ३२ ।।

करोति कर्म क्रियते च जन्तुः केनाप्यसौ चोदित आनिपातात् ।
न तत्र विद्वान् प्रकृतौ स्थितोऽपि निवृत्ततृष्णः स्वसुखानुभूत्या ।। ३० ।।

पण त्याविषयींहि मनांत विरक्ति उत्पन्न झाल्यास तो पुढें अभ्यास करितो. ४२० योगाभ्यासाच्या सामर्थ्यानें तो विघ्नांचे दोष समूळ जाळून टाकितो; योगी कर्माच्या कर्मठजाळ्याला कदापि स्पर्श करीत नाहींत. २१ योगाभ्यासांत विघ्न येऊन त्यांतच मरण जरी आलें तरी योगी कर्माधीन होत नाहीं. हेंच श्रीकृष्णानें स्वतः अर्ध्या श्लोकानें सांगितलें. पूर्वी योगसाधन करीत असतां दैवयोगानें योगी मरण पावला तर त्यांत त्याची हानी कसली ! विघ्नाच्या अधीन झाल्यामुळें योगी जन्म घेतो. २३ पण त्या जन्मांतहि तो कर्माधीन होत नाहीं. पूर्वजन्मांतील संस्काराप्रमाणें तो स्वतंत्र योगमार्गांतच प्रवृत्त होतो. २४ एखादा प्रवासी चालला असतां मार्गांत कांहीं अडचण आली तर तो तेवढा दिवस वाटेंत मुक्काम करितो व दुसऱ्या दिवशीं पुनः आपल्या ठरलेल्या मार्गाला लागतो. २५ त्याप्रमाणें योगी आपल्या पूर्वजन्मींच्या संस्कारानुसार पूर्ण योगाभ्यास करितो. तो कर्माच्या अधीन कधींहि होत नाहीं. २६ त्याच्या साधनांत माझी भक्ति जर असेल तर त्याला अणुमात्रहि विघ्न येत नाहीं. मी भक्तांचा कैवारी श्रीपति आपल्या भक्तांचें रात्रंदिवस रक्षण करीत असतों. २७ जेथें माझ्या भक्तीची आवड आहे तेथें बापडीं विघ्नें तीं काय करणार ! उद्धवा ! माझें नांव महा विघ्नांच्या राशी दूर घालवितें. २८ माझें भजन न करणारा श्रेष्ठ योगी विघ्नामुळें पुनः जन्म घेतो, परंतु तो पूर्वसंस्कारामुळें कर्में करणारा कर्मठ होत नाहीं. २९ जीवन्मुक्त झालेले लोकहि जर प्रारब्धकर्माप्रमाणें वागत असतात, तर मग योगभ्रष्ट कर्मांचा त्याग करितात, हें कसें घडतें ! असें जर म्हणशील तर ऐक. ४३० मुक्ताचें जें मोक्षस्थान तेंच साधकाचें मुख्य साधन आहे. म्हणून त्या दोघांनाहि कर्मबंधन बाधत नाहीं. ३१ 'मी एक कर्मकर्ता' असा अहंकार ज्याच्या मनांत उपजत नाहीं, त्यालाहि कर्मबंधकता सर्वथा स्पर्श करीत नाहीं. ४३२.

——अहोपण, विद्वानांनाहि कर्म सर्वथा अनिवार्य आहे, त्यामुळें त्याला पुनः संसार प्राप्त होईल, अशी आशंका घेऊन सांगतात——

असौ जंतुः केन अपि चोदितः आनिपातात् कर्म क्रियते च—विद्वानाहून पृथक् असलेला हा जंतु म्ह० देहच संस्कारादिकांनीं प्रेरित होऊन मरेपर्यंत भोजनादि कर्म करितो व त्याच्यायोगानें पुष्ट्यादि विकारांसहि प्राप्त होतो. तत्र विद्वान् प्रकृतौ स्थितः अपि निवृत्ततृष्णः स्वसुखानुभूत्या न—पण विद्वान् शरीरेंद्रियाकार प्रकृतीमध्यें स्थित असूनहि ज्यांची तृष्णा निवृत्त झाली आहे असा होत्साता स्वरूपसुखाच्या अनुभवानें कर्मामध्यें विकार पावत नाहीं. [निरहंकारित्वामुळें हर्ष-विषादादिकांनीं तो संसाराला प्राप्त होत नाहीं.] ३०.

जन्मापासूनि मरणांत । प्राणी जें जें कर्म करित । तें तें कोणी एक प्राचीन एथ । असे वर्तवीत निजसत्ता ॥ ३३ ॥ तेथ सज्ञान आणि अज्ञान । प्राचीन कर्मे कर्माधीन । अज्ञानासी अहंकर्तेपण । ज्ञाते निरभिमान वर्तती कर्मीं ॥ ३४ ॥ म्हणसी देहीं असतां प्राण । केवीं नुठी देहाभिमान । ज्ञाता स्वसुखानुभवें पूर्ण । अहंकर्तेपण त्या स्फुरेना ॥ ३५ ॥ दोराचे सर्पाचा महाधाक । दोर जाणितल्या नुपजे देख । तेवीं अनुभविल्या ब्रह्मसुख । अहंता बाधक स्फुरेना ॥ ३६ ॥ ऐक योगभ्रष्टाचें लक्षण । त्याचा प्राचीनसंस्कार जाण । उपजो नेदी देहाभिमान । योग संपूर्ण सिद्ध्यर्थ ॥ ३७ ॥ जे देहीं नित्य निरभिमान । तेचि ब्रह्मसुखें सदा संपन्न । त्यांसीं देहीचें कर्माचरण । सर्वथा जाण बाधीना ॥ ३८ ॥ ज्ञाता देहकर्मासी अलिप्त । हेंही अपूर्व नव्हे एथ । तो देहीं असोनि वेदातीत । तेंचि श्रीकृष्णनाथ स्वयें सांगे ॥ ३९ ॥

तिष्ठन्तमासीनमुत व्रजन्तं शयानमुक्षन्तमदन्तमन्नम् ।
स्वभावमन्यत् किमपीहमानमात्मानमात्मस्थमतिर्न वेद ॥ ३१ ॥

देह उभा असतां जाण । ज्ञाता न देखे उभेपण । मा बैसल्या बैसलेपण । मानी कोण देहाचें ॥ ४४० ॥ परिपूर्ण ब्रह्माच्या ठायीं । उठणें बैसणें दोनी नाहीं । ज्ञाता तेंची झाला पाही । ऊठ-बैस कांहीं जाणेना ॥ ४१ ॥ दोराचा सर्प उपजला । भोग भोगूनि स्वयें निमाला । सत्यत्व नाहीं या बोला । तैसा देहो झाला मुक्तासी ॥ ४२ ॥ देह दैवें असे एकदेशी । ज्ञाता सर्वां देखे आपणासी देह जातां परदेशासी । ज्ञाता गमन मानसीं देखेना ॥ ४३ ॥ वस्तु वस्तुत्वें पूर्णपणें । तेथ कैंचें असे

जन्मापासून मरणापर्यंत प्राणी जें जें कर्म करितो, तें तें कोणी एक सनातन तत्त्व आपल्या सत्तेनें त्याच्या-कडून करवीत असतें. ३३ ज्ञानी आणि अज्ञ दोघेहि प्रारब्धानुसार कर्माधीन आहेत. अज्ञ कर्तेपणाच्या अहंकारानें व ज्ञानी निरभिमानानें कर्मे करीत असतो. ३४ 'पण देहामध्यें प्राण असतां देहाभिमान कसा उद्भवणार नाहीं.,' असें जर म्हणशील तर ऐक. ज्ञानी पूर्ण आत्मासुखानुभव घेत असल्यामुळें त्याला अहंकर्तेपणा स्फुरत नाहीं. दोराच्या सापाची भीति दोर आहे असें कळल्यावर जशी उपजत नाहीं, त्याप्रमाणें ब्रह्मसुख अनुभविल्यावर अहंकाराची बाधा स्फुरत नाहीं. ३६ योगभ्रष्टाची अशी अवस्था होण्याचें कारण त्याचा पूर्वजन्मांतील योगसंस्कारच होय. त्याचा योग पूर्णपणें सिद्धीस जावा म्हणून तो देहाभिमान उद्भवूं देतच नाहीं. ३७ जो देहामध्यें पूर्ण निरभिमान असतो तोच ब्रह्मसुखानें सदा संपन्न असतो. त्याला देहाचें कर्माचरण सर्वथा बांधत नाहीं. ३८ ज्ञानी देहकर्मापासून अलिप्त असतो. यांत अपूर्व असें कांहींच नाहीं. पण तो देहांत असून विदेही कसा असतो, तेंच श्रीकृष्णनाथ आतां सांगत आहे. ३९.

—देहाच्या कर्मांनीं त्याच्या विकाराची शंकाहि येत नाहीं. कारण तो देहालाहि पहात नाहीं, असें सांगतात—

तिष्ठन्तं आसीनं उत व्रजन्तं शयानं उक्षन्तं अन्नं अदंतं स्वभावं अन्यत् किं अपि ईहमानं आत्मानं आत्मस्थमतिः न वेद—उभा असलेल्या, बसलेल्या, जाणाऱ्या, शयन करणाऱ्या, मूत्रोत्सर्ग करणाऱ्या, अन्न खाणाऱ्या व स्वभाव-प्राप्त दुसरेंहि दर्शन-स्पर्शनादि कर्म करणाऱ्या देहाला ज्याची बुद्धि आत्म्यामध्यें स्थित आहे, असा विद्वान जाणत नाहीं. ३१

ज्ञानी आपल्याचा देह उभा असला तरी तो त्याचें 'उभें रहाणें' पहात नाहीं. मग बसलेल्याचें बसणें कोण मानणार ! ४४० परिपूर्ण ब्रह्माला बसणें व उठणें, हीं दोन्हीं नाहींत, तेव्हां ज्ञानी स्वतःच ब्रह्म झाल्यावर तो ऊठ, बैस इत्यादि कांहीं जाणत नाहीं. ४१ दोराचा सर्प झाला व तो भोग-भोगून आपणच नाहींसा झाला, या बोलण्यांत जसें सत्यत्व नाहीं तसाच मुक्ताचा त्याचा देह होतो. ४२ देह दैववशात् एका भागांत रहातो पण ज्ञाता स्वतःला सर्वां-मध्यें पहातो. देह दुसरीकडे जात असतां ज्ञानी त्याचें गमन मनांत आणीत नाहीं. ४३ आत्मवस्तु आत्मत्वानें परिपूर्ण

येणेंजाणें । ज्ञाता सदा तद्रूपपणें । राहणेंजाणें स्पर्शेना ॥ ४४ ॥ ज्ञाता स्वयें रिघे शयनीं । परी शेजबाज न देखे अवनीं । मी निजेलों हेंहीं न मनीं । निजीं निजरूपपणीं सर्वदा ॥ ४५ ॥ ज्ञाता जेवूं बैसे निजसुखें । परी मी भुकेलों हें न देखे । रसने नेणतां सर्व रस चाखे । जेवी येणें सुखें निजगोडी ॥ ४६ ॥ दिसे यावत्तृप्त जेविला। परी तो धाला ना भुकेला । तो उच्छिष्टही नाहीं झाला । शेखीं आंचवला संसारा ॥ ४७॥ जरी तो स्वभावें सांगे गोष्टी । तरी अबोलणें घाली शब्दापोटीं । बोली अतिरसाळ गोडी उठी । तरी न सुटे मिठी मौनाची॥ ४८ ॥ मी एक चतुर बोलका । हाही नुठी त्या आवांका। बोलबोलों नेणें फिका । बोलोनि नेटका अबोलणा ॥ ४९ ॥ ज्ञाता पाहे निजात्मसुखें । माझें तुझें हेंही वोळखे । परी तो डोळांचि न देखे । देखे आपण्यासारिखें त्रैलोक्य ॥ ४५० ॥ तो जों दृश्य पाहों बैसे । तों दृश्याचा ठावोचि पुसे । जें देखे तें आपण्याऐसें । निजात्मसौरसें जग देखे ॥ ५१ ॥ करूनि डोळ्यांचा अंत । ज्ञाता देखणेपणें पहात । त्या देखण्याच्या निजस्वार्थ । न चढे हात वेदशास्त्रा ॥ ५२ ॥ जाणे शब्दींचें शब्दज्ञान । मी श्रोता हे नुठी आठवण । उपेक्षूनियां देहींचे कान । करी श्रवण सर्वांगें ॥ ५३ ॥ यापरी स्वयें सज्ञान । होऊनियां सावधान । सोलूनियां शब्दज्ञान । करी श्रवण स्वभावें ॥ ५४ ॥ जाणे सुवास दुर्वास । भोगीं न धरी नाकाची आस । सुमना सबाह्य जो सुवास । तो भोगी सावकाश सर्वदा ॥ ५५ ॥ मृदुकठिणादि स्पर्श जाणे । परी मी जाणतों हें स्फुरों नेणे । अंगा लागे तें निजांग करणें । हा स्पर्श भोगणें सज्ञानीं ॥ ५६ ॥ ज्ञाता चालता दिसे चरणीं । परी तो चालतां स्वयें अचरणीं । स्वेच्छा हिंडतांही अवनीं । तो ठायाहूनी ढळेना ॥ ५७ ॥ हस्तव्यापारीं देतां दान । मी दाता ही नुठी आठवण । देतेंघेतें दान होय आपण । यापरी सज्ञान वर्तवी करां ॥ ५८ ॥ कायिक वाचिक मानसिक । कर्म निजपत

असतां तेथें येणें-जाणें कोठचें! ज्ञाता सदा तद्रूप असल्यामुळें त्याला रहाणें व जाणें स्पर्शीहि करीत नाहीं ४४ ज्ञानी स्वतःच निजावयास जातो, पण तो भूमि, पलंग, बिछाना पहात नाहीं. 'मी निजलों' हेंहि तो मनांत आणीत नाहीं. निरंतर स्वरूपानंदांत असतो. ज्ञानी आनंदानें जेवावयास बसतो; पण 'मला भूक लागली' असें तो समजत नाहीं. रसनेला न जाणतां तो सगळे रस चाखितो. ४६ अशा गोडीनें तो सुखानें जेवतो. तो पोटभर जेवला असें दिसतें, पण वास्तविक तो तृप्तहि होत नाहीं किंवा उपाशींहि रहात नाहीं. त्याचा हात उष्टाहि होत नाहीं व शेवटीं तो संसाराला आंचवतो. ४७ तो जरी स्वभावतः बोलत असतो तरी प्रत्येक शब्दांत तो अबोला भरून ठेवितो. त्याच्या भाषणांत अत्यंत रसाळ गोडी असली तरी तो आपलें खरे मौन सोडीत नाहीं. ४८ किंवा मी एक चतुर बोलका; हा अभिमानहि त्याच्या मनांत उद्भवत नाहीं. तो वायफळ बडबड करीत नाहीं. बोलून अबोलका असतो. ४९ ज्ञानी आत्मसुखाच्या दृष्टीनें पहात असतो. तो 'माझें, तुझें' हेंहि ओळखितो. पण तो डोळ्यांनीं त्याच्याकडे पहात नाहीं. तर सगळें त्रिभुवन स्वतःसारखें पहातो. ४५० तो दृश्य पहावयास जो बसतो, तों तें दृश्यच नाहींसें होतें व जें पहातो तें त्याला स्वतःसारखेंच दिसतें. तो सगळें जगत् स्वतःशीं समरस झालेलें पहातो. ५१ डोळ्यांचा अंत करून ज्ञानी चैतन्यरूपानें पहातो. त्याच्या त्या पहाण्यांतील स्वार्थ वेद-शास्त्रांसहि कळत नाहीं. ५२ तो शब्दांतील शब्दज्ञान जाणतो. पण 'मी श्रोता,' याची त्याला आठवणहि होत नाहीं. देहाच्या कानांची उपेक्षा करून सर्वांगानें तो श्रवण करितो. ५३ याप्रमाणें तो स्वतः सज्ञान होऊन सावधान होतो, शब्दज्ञान सोडून त्यांतील अर्थ ग्रहण करितो, ५४ तो सुगंध व दुर्गंध जाणतो; पण नाकाची अपेक्षा करीत नाहीं, पुष्पांचा अंतर्बाह्य सुवास तो आनंदानें निरंतर घेतो. ५५ मृदु-कठिण इत्यादि स्पर्श जाणतो, पण 'मी जाणतों' ही स्फूर्ति त्याला होत नाहीं. ज्याचा स्पर्श होईल तें आपलें अंगच समजणें ही ज्ञानी लोकांची स्पर्श अनुभवण्याची रीत आहे. ५६ ज्ञानी पायांनीं चालतांना दिसतो; पण तो चरणांवांचून चालत असतो. स्वेच्छेनें सगळी पृथ्वी हिंडून आला तरी तो वास्तविक आपल्या जागेवरूनहि हललेला नसतो. ५७ हातांनीं दान दिलें तरी 'मी दाता' अशी त्याला आठवणहि होत नाहीं. देणें व घेणें हीं दोन्हीं तो स्वतःच होतो. याप्रमाणें ज्ञानी आपल्या हातांना वागवितो. ५८ त्याचें कायिक,

स्वाभाविक । ज्ञाता ब्रह्मरूपें निर्दोख । देहासी देख स्पर्शेना ।। ५९ ।। अकर्तात्मनिजसत्ता । ज्ञाता सर्व कर्मीं वर्ततां । न देखे कर्म क्रिया कर्तव्यता । निजीं निजात्मता निजबोधें ।। ४६० ।। ज्ञाता नित्य निजात्मसुखें । देहीं असोनि देह न देखे । तो देहकर्मीं केवीं आडके । पूर्ण परमात्मसुखें संतुष्ट ।। ६१।। जगासी लागलें कर्मबंधन । तेथें खातां जेवितां सज्ञान । केवीं न पवे कर्मबंधन । तेंचि निरूपण हरि सांगे ।। ६२ ।।

> यदि स्म पश्यत्यसदिन्द्रियार्थं नानानुमानेन विरुद्धमन्यत् ।
> न मन्यते वस्तुतया मनीषी स्वाप्नं यथोत्थाय तिरोदधानम् ।। ३२ ।।

हो कां लौकिकाचे परी । ज्ञाता वर्ते लोकाचारीं । तोही प्रपंचामाझारीं । कर्में करी लौकिकें ।। ६३ ।। परी कार्य कर्म कार्तव्यता । हे ज्ञात्यासी नाहीं अहंता । तेणें प्रपंचामाजीं निजात्मता । निश्चयें तत्त्वतां वश्य केली ।। ६४ विषयादि प्रपंचभान । सत्य मानिती अज्ञान । तो प्रपंच देखती सज्ञान । ब्रह्म परिपूर्णत्वें ।। ६५ ।। साकरेचा इंद्रावणघड्ड । जाणा गोड नेणा कडू । तैसा प्रपंचाचा पडिपाडू । लाभ आणि नाडू ज्ञानाज्ञानें ।। ६६ ।। सुवर्णाची खोटी । मूर्ख मानिती केवळ गोटी । ज्ञाते घालूनियां मिठी । घेती ज्ञानदृष्टी बहुमोलें ।। ६७ ।। तेवीं संसारिक क्रियाकर्म । मूर्खा मूर्खपणें भासे विषम । तेंचि ज्ञात्या परब्रह्म । स्वानंदें आराम सर्वदा ।। ६८ ।। प्रपंच खणोनि सांडावा । मग ब्रह्मभाव मांडावा । हेंही नुखितांही न लागे त्या सदैवा । उखितां आधवा परब्रह्म ।। ६९ ।। मिथ्या दोराचा सर्पाकार । तेथ

वाचिक व मानसिक कर्म स्वभावतःच घडत असतें. ज्ञानी ब्रह्मस्वरूपांत निर्दोषच असतो. तो देहालाहि स्पर्श करीत नाहीं. ५९. तो अकर्ता असून आत्मसत्तेनें वागत असतो. ज्ञानी कर्में करीत असतां त्यांत कर्मक्रिया व कर्तव्यता पहात नाहीं. तो आत्मज्ञानानें सर्व आत्मवत् समजत असतो. ४६० ज्ञानी नित्य आत्मसुखांत असतो. तो देहधारी असून देह पहात नाहीं. मग तो देहाच्या कर्मांत कसा अडकणार! तो परमात्मसुखांत पूर्ण संतुष्ट असतो. ६१ जगाला जें कर्मबंधन लागलें आहे, तें ज्ञानी खाण्यापिण्याची क्रिया करीत असतां त्याला कसें बाधत नाहीं, त्याचेंच निरूपण आतां हरि करीत आहे. ४६२.

—अहो, इंद्रियांनी युक्त असलेल्याचें सर्वथा अदर्शन कसे संभवतें! उत्तर—

यदि असदिन्द्रियार्थं पश्यति स्म नानानुमानेन विरुद्धं सत् अन्यत् आत्मव्यतिरिक्तं मनीषी वस्तुतया न मन्यते—जरी विद्वान् कदाचित् इंद्रियांच्या विषयांना पहातो, तथापि नानात्वामुळें स्वप्नाप्रमाणें ते मिथ्या आहेत, अशा अनुमानानें कल्पित होणारा अन्य आत्म्याहून व्यतिरिक्त वस्तुत्वानें पहात नाहीं. यथा उत्थाय स्वाप्नं तिरोधानं तथा—ज्याप्रमाणें स्वप्नांतून जागें झालेला केवळ संस्कारानें प्रतीत होणाऱ्या पण स्वतः अस्त पावणाऱ्या विषयांना मनुष्य मिथ्या मानितो व त्यांना द्रष्ट्याहून पृथक् मानीत नाहीं, त्याप्रमाणें. ३२.

ज्ञानी व्यवहारांत जरी चार चौघांसारखा वागत असला व प्रपंचांतील सगळीं लौकिक कर्में करीत असला, तरी त्याला कार्य, कर्म, कर्तव्यता यांचा अहंकार नसतो. त्यानें प्रपंचांत राहून आत्मतत्त्व खरोखर वश केलेलें असतें. ६४ अज्ञानी लोक विषयादिक प्रपंच खरा मानितात; पण ज्ञानी प्रपंचाला परिपूर्ण ब्रह्मरूपानें पहातो. ६५ कडू वृंदावनफळाचा साखरेचा खडा बनविला तर तो जाणणाराला व गोड अजाणत्याला कडु वाटतो. त्याप्रमाणेंच प्रपंचाचा प्रकार आहे. याचें ज्ञान असणारांस लाभ; व अज्ञान असणारांची हानि. ६६ सोन्याची गोटी पाहून मूर्खलोक तिला मातीची समजतात, परंतु तज्ज्ञ तिच्यावर उड्या टाकितात व पुष्कळ मोल देऊन ज्ञानदृष्टीनें विकत घेतात. त्याप्रमाणें संसारांतील क्रिया-कर्म मूर्खाला त्याच्या मूर्खपणामुळें विषम भासतें. पण तेंच ज्ञानी माणसाला परब्रह्म वाटतें व तो त्या स्वानंदानें सर्वदा सुखांत असतो. ६८ अगोदर प्रपंच खणून टाकावा व मग ब्रह्मभाव धरावा, याचीहि त्या ज्ञान्याला गरज पहात नाहीं. कारण तो सगळें परब्रह्मच पहात असतो. ६८ दोरी पडलेली असतां तो सर्प असा निश्चय करून अज्ञलोक त्याच्या भोंवतीं जमून अनेक प्रकारचीं भयंकर अनुमानें करितात व तो त्रास

मिळोनि अज्ञान नर । नाना अनुमानीं भयंकर । सत्य साचार मानिती ॥ ४७० ॥ तेवीं मिथ्या प्रपंचाचें भान । बाधक मानिती अज्ञान । तेंचि स्वानुभवें सज्ञान । जाणती पूर्ण परब्रह्म ॥ ७१ ॥ जेवीं स्वप्न साच निद्रिताप्रती । तेवीं प्रपंच निजभ्रांती । तो निजात्मा जागृताप्रती । मिथ्या निश्चितीं निजबोधें ॥ ७२ ॥ मिथ्या प्रपंचाचें भान । जाणोनि झाले जे सज्ञान । त्यांसी सर्व कर्मीं वर्ततां जाण । देहाभिमान कदा नुपजे ॥ ७३ ॥ साधकांचा साधावया स्वार्थ । पूर्वीं सर्वस्वरूपें भगवंत । बोलिला तेणें विकारवंत । झाला निश्चित म्हणशील ॥ ७४ ॥ वस्तु नव्हे विकारवंत । ते निजसाम्यें सदोदित । तेंचि अर्थीं श्रीकृष्णनाथ । असे सांगत निजबोधें ॥ ७५ ॥

पूर्वं गृहीतं गुणकर्मचित्रमज्ञानमात्मन्यविविक्तमङ्ग ।
निवर्तते तत्पुनरीक्षयैव न गृह्यते नापि विसृज्य आत्मा ॥ ३३ ॥

संसार तो पूर्वदशे । अतिअतर्क्य मायावशें । शुद्ध वस्तु बहुधा भासे । गुणकर्मविन्यासें बहुरूप ॥ ७६ ॥ नाम रूप व्यक्ति वर्ण । कुळ गोत्र क्रियाचरण । यापरि प्रपंच भिन्न । सत्य अज्ञान मानिती ॥ ७७ ॥ प्रपंच वस्तूच्या ठायीं अध्यस्त । यालागीं वस्तु तद्रूप भासत । स्फटिक नानारंगीं अलिप्त । परी संबंधें भासत तद्रूप ॥ ७८ ॥ जग पाहतां यापरी । भिन्न भासे विज्ञानेंकरीं । तेणें आत्मा म्हणती विकारी । नर अविचारी अज्ञानें ॥ ७९ ॥ त्या अज्ञानाची होय निवृत्ती । तैं साधकां माझी सुलभ प्राप्ती । यालागीं माझी निजभक्ती । म्यां यथानिगुतीं प्रकाशिली ॥ ४८० ॥ साधकांचा निजस्वार्थ । जेणें शिघ्र होय

खराच समजतात. ४७० त्याप्रमाणेंच अज्ञजन मिथ्या प्रपंचाचा बाध खरा आहे असें मानितात. पण त्यालाच ज्ञानी स्वानुभवानें पूर्ण परब्रह्म समजतो. ७१ निजलेल्या माणसाला स्वप्न जसें खरेंच वाटत असतें, त्याप्रमाणें आत्मस्वरूपाच्या अज्ञानामुळें प्रपंच सत्य भासतो. जागृतींत जसें स्वप्न मिथ्या, तसाच हा प्रपंच आत्मज्ञानानें मिथ्या ठरतो. ७२ 'प्रपंच मिथ्या आहे' हें जाणून जे सज्ञान झाले, ते सगळीं कर्में जरी करीत असले, तरी त्यांच्या मनांत देहाभिमान कदापि उपजत नाहीं. ७३ उद्धवा, साधकांचा स्वार्थ साधण्यासाठीं मी 'सर्वस्वरूपानें भगवानूच आहे' असें पूर्वीं म्हटलें होतें; पण 'त्यामुळें तो विकारी झाला,' असें जर म्हणशील, ७४ तर आत्मतत्त्व केव्हांहि विकारी नसतें. तें सदोदित विकारशून्यच असतें, असें आतां श्रीकृष्ण आत्मज्ञानानें सांगत आहे. ४७५.

—याप्रमाणें आत्मा विकार पावत नाहीं, असें सांगितलें, पण तें संभवत नाहीं. कारण त्याला बद्धावस्थेनें त्याज्यमानत्व व मुक्तावस्थेनें गृह्यमाणत्व असतें. भात कांडल्यानें तें आपला व्रीहिभाव टाकून तंडुलभाव जरी ग्रहण करीत असलें, तरी विकार तें पावत नाहीं असें म्हणतां येत नाहीं—

अङ्ग—हे उद्धवा ! **पूर्वं गुणकर्मचित्रं अज्ञानं आत्मनि अविविक्तं गृहीतं (आसीत्)**—बद्धावस्थेंत गुणांनीं व कर्मांनीं विचित्र झालेलें देहेंद्रियादि अज्ञानकार्य आत्म्यांतील अध्यासानें अपृथक्त्वानें ग्रहण केलेलें होतें. **तत् एव पुनः ईक्षया निवर्तते**—पण तेंच विवेकानें निवृत्त होतें. **आत्मा न गृह्यते न अपि विसृज्यः**—पण आत्मा कोणत्याहि रूपानें ग्रहण केला जात नाहीं. व त्याचा त्यागही केला जात नाही. [मुक्तीला जर क्रियाफलत्व असतें तर आत्म्याला विकार झाला असता; पण त्याला आरोपित अज्ञानमात्रनिवृत्ति रूपत्व असल्यामुळें बंध व मोक्ष यांचा आत्म्याशी कांहीं संबंध नाहीं. त्यामुळें त्याला विकार नाहीं.] ३३.

संसार आरंभावस्थेंत मायावशतेमुळें अत्यंत अतर्क्य आहे. शुद्ध परब्रह्म गुणकर्मांच्या विभागाप्रमाणें अनेक प्रकारें भासतें. ७६ नाम, रूप, व्यक्ति, वर्ण, कुळ, गोत्र, क्रियाचरण, यायोगें प्रपंच भिन्न आहे, असें अज्ञजन मानितात. ७७ परंतु प्रपंच ब्रह्मावर आरोपित असल्यामुळें ब्रह्महि तद्रूपच भासतें स्फटिक वास्तविक सर्व रंगांहून अलिप्त असतांहि, त्याचा ज्या रंगाशीं संबंध जडतो, त्या रंगाचा तो भासतो. ७८ त्याप्रमाणें अज्ञ जगत् भिन्न समजतो व त्यामुळेंच तो आत्म्यालाहि विकारी मानितो. लोक अज्ञानानें इतके अविचारी बनतात. ७९ त्या अज्ञानाची जेव्हां निवृत्ति होते, तेव्हांच साधकाला माझी प्राप्ति सुलभ होते. म्हणून मी माझी भक्ति यथार्थपणें प्रकाशित केली. ४८०

हस्तगत । यालागीं सर्व भूतीं भगवंत । हा म्यां निजगुह्यार्थ प्रबोधिला ॥ ८१ ॥ हें धरोनियां अनुसंधान । भावें करितां माझें भजन । तेथ मावळे मीतूंपण । अविद्येसीं अज्ञान समूळ मिथ्या ॥ ८२ ॥ तेथ दृश्य द्रष्टा दर्शन । त्रिगुणेंसीं कार्य कारण । नुरेचि प्रपंचाचें भान । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ८३ ॥ तेथ नाम रूप गुण जाती । नाहीं महाभूतें भूतव्यक्ती । चैतन्य पूर्ण सहजास्थिती । ब्रह्मीं ब्रह्मस्फूर्ति असेना ॥ ८४ ॥ तें उंच ना ठेंगणें । मोठें ना रोड होणें । उजू ना वांकुडेपणें । असों नेणें विकारी ८५ ॥ तेथ शीत ना उष्ण । मृदु ना कठिण । कडू ना गोडपण । सुखदुःखेंवीण निर्द्वंद्व ॥ ८६ ॥ तेथ भेद ना अभेद । बोलणें ना निःशब्द । शाहणे ना मुग्ध । देखणें ना अंध चिद्रूपपणें ॥ ८७ ॥ तें येथें ना तेथें । येतें ना जातें । जवळी ना परतें । सदोदित स्वयें सिद्ध ॥ ८८ ॥ तें खातें ना न खातें । तें घेतें ना देतें । जितें ना मरतें । परादिपर तें परात्पर ॥ ८९ ॥ तें बद्ध ना मुक्त । नित्य ना अनित्य । क्षोभे ना प्रसन्न होत । वस्तु सदोदित तद्रूपत्वें ॥ ४९० तेथ पाप ना पुण्य । आकार ना शून्य । सगुण ना निर्गुण । स्वानंदें पूर्ण सुखरूप ॥ ९१ ॥ सर्वभूतीं भगवद्भजन । करूनि माझे भक्तजन । माझें निजरूप परिपूर्ण । स्वयें आपण होऊनि ठेले ॥ ९२ ॥ त्यांसी संत म्हणोनि कांहीं घेणें । अथवा असंत म्हणोनि सांडणें । हें नुरेचि त्यांसी वेगळेपणें । ब्रह्मीं ब्रह्मपणें परिपूर्ण ॥ ९३ ॥ बद्धकाळीं बद्धता । आत्मेनि घेतली नाहीं तत्त्वतां । अथवा मुक्तिकाळींची मुक्तता । आत्मा सर्वथा स्पर्शेना ॥ ९४ ॥ आत्मा अविकारी पाहीं । येणें निरूपणें पडे ठायीं । जरी म्हणशी कळलें नाहीं । ऐक तेंही सांगेन ॥ ९५ ॥ आत्मा सर्वदा नित्य पाहीं । यालागीं त्यासी उत्पत्ति नाहीं । उत्पत्ति न लगे ज्याचें ठायीं । तो गर्भासी कहीं स्पर्शेना ॥ ९६ ॥ गर्भजन्म त्यासी नाहीं । ज्यासी देहाचा अभाव पाहीं । देहेंवीण वृद्धि कंहीं । त्याचे ठायीं स्पर्शेना

साधकाचा खरा स्वार्थ शीघ्र त्याच्या हातीं यावा, म्हणून मीं 'सर्व भूतांतील भगवद्भाव' हा आपला गुह्यार्थ उपदेशिला. ८१ हा अर्थ मनांत वागवून भक्तिभावानें माझें भजन केलें असतां 'मी-तूंपणा' मावळतो. अविद्येसह समूळ अज्ञानहि मिथ्या ठरते. ८२ मग दृश्य, द्रष्टा, दर्शन; त्रिगुणांसह कार्य-कारण; आणि प्रपंचाचें भान उरत नाहीं. परिपूर्ण ब्रह्म पूर्णत्वानें भरलेलें असतें. ८३ तेथें नाम, रूप, गुण, जाति, महाभूतें व भूतव्यक्ति कांहीं रहात नाहीं. पूर्ण चैतन्य आपल्या स्वाभाविक स्वरूपांत असतें. ब्रह्मामध्यें ब्रह्मस्फूर्ति होत नाहीं. ८४ तें ब्रह्म उंच नाहीं; ठेंगणें नाहीं; स्थूल-कृश नाहीं; सरळ-वांकडें नाहीं; तें विकार जाणतच नाहीं; ८५ त्याला शीत-उष्ण नाहीं; तें मृदु-कठिण नाहीं; कडु-गोड नाहीं; तें सुख-दुःखावांचून निर्द्वंद्व असतें; ८६ त्यांत भेद-अभेद नाहीं; बोलणें-नबोलणें नाहीं; शहाणें-अज्ञ नाहीं; डोळस-आंधळें नाहीं; तें पूर्ण चित्स्वरूप असतें; ८७ तें इकडे-तिकडे नसतें; जातें-येतें नसतें; जवळ-दूर नसतें; सदोदित स्वयंसिद्ध असतें; ८८ तें खाणारें-न खाणारें नाहीं; घेणारें-देणारें नाहीं; तें जिवंत-मरणारें नाहीं; तें परादि वाचेच्या पलीकडे परात्पर आहे; ८९ तें बद्ध-मुक्त नाहीं; नित्य-अनित्य नाहीं; क्षुब्ध-प्रसन्न नाहीं; आत्मतत्त्व सदोदित स्वरूपानें रहातें. ४९० त्याला पाप-पुण्य, आकार-निराकार, सगुण-निर्गुण नाहीं. तें स्वानंदानें पूर्ण सुखस्वरूप असतें. ९१ माझे भक्त सर्व प्राण्यांत भगवद्भाव ठेवून स्वतःच माझ्या परिपूर्ण आत्मस्वरूपाला प्राप्त होऊन राहिले आहेत. ९२ त्यांना संत म्हणून स्वीकारणें किंवा असंत म्हणून सोडून देणें हा भिन्नपणा उरतच नाहीं. ते ब्रह्मामध्यें परिपूर्ण ब्रह्म होऊन रहातात. ९३ संसारांतील बद्ध-कालीं आत्मा बद्धता घेत नाहीं आणि मुक्त-कालीं मोक्षाला सर्वथा स्पर्श करीत नाहीं. ९४ 'आत्मा' अविकारी आहे, हें या निरूपणावरून स्पष्ट केलेंच आहे; पण एवढ्यावरूनहि कळलें नाहीं, असें म्हणशील तर पुनः सांगतों, ऐक. ९५ आत्मा सदासर्वदा नित्य असल्यामुळें त्याला उत्पत्ति नाहीं. तो गर्भाला स्पर्शहि करीत नाहीं. त्यामुळें त्याला उत्पत्ति लागतच नाहीं; ९६ ज्याला गर्भजन्म नाहीं,त्याला देहाचा अभावच

॥ ९७ ॥ जो सर्वदा विदेही । कर्म न रिघे त्याच्या ठायीं । कर्मेंवीण बद्धता पाहीं । आत्म्यासी कंहीं लागेना ॥ ९८ ॥ जो निरवयव साचार । त्यासी एकही न घडे संस्कार । ज्यासी नाहीं आकार । त्यासी विकार स्पर्शेना ॥ ९९ ॥ जो गर्भजन्माअतीत । मरण रिघों न शके तेथ । काळाचाही न लगे घात । क्षयातीत परमात्मा ॥ ५०० ॥ न लगे जन्म कर्म मरण । त्यासी विकारी करी कोण । वस्तु अविकारी परिपूर्ण । यापरी जाण उद्धवा ॥ १ ॥ निबिड दाटल्या अज्ञान । आत्मा नाहीं न करवे जाण । प्रखर झालियाही ज्ञान । आत्मा नवा जाण नुपजवे ॥ २ ॥ ज्ञानाज्ञानीं अलिप्त । आत्मा निर्विकार नित्य येचि अर्थी सदृष्टांत । असे सांगत श्रीकृष्ण ॥ ॥ ३ ॥

यथा हि भानोरुदयो नृचक्षुषां तमो निहन्यान्न तु सद्विधत्ते ।
एवं समीक्षा निपुणा सती मे हन्यात्तमिस्रं पुरुषस्य बुद्धेः ॥ ३४ ॥

डोळांनांदते दृष्टीसी । तम अवरोधी तियेसी । सूर्य उगवूनि तमातें निरसी । परी नवे दृष्टीसी नुपजवी ॥ ४ ॥ तेवीं अविद्या क्षोभूनि सबळ । आत्मा नाहीं न करवेच केवळ । पुरुषबुद्धीस आणोनि पडळ । मिथ्या द्वैतजाळ दाखवी ॥ ५ ॥ तेथ पावल्या शुद्ध ज्ञानासी । अविद्यामळ मात्र निरसी । नवें उपजवावया आत्म्यासी । सामर्थ्य ज्ञानासी असेना ॥ ६ ॥ आत्मा निजप्रकाशेंसी । ज्ञानाज्ञानातें प्रकाशी । ते ज्ञानाज्ञान परमात्म्यासी । कदाकाळेंसीं स्पर्शेना ॥ ७ ॥ ज्ञानाज्ञानविकार । अविद्यांतःपाती साचार । आत्मा अविद्येहूनि पर । नित्य निर्विकार या हेतु ॥ ८ ॥ रात्रि नाहीं सूर्यासी । मा दिवसू काय आहे त्यासी ।

असणार आणि देहावांचून बाढ होणें शक्य नाहीं. ९७ जो सर्वदा विदेही त्याला कर्म संभवत नाहीं व कर्मावांचून आत्मा बद्ध होत नाहीं. जो अवयवरहितच आहे, त्याला एकहि संस्कार संभवत नाहीं. कारण ज्याला आकार नसतो त्याला विकार स्पर्श करीत नाहीं. ९९ जो गर्भजन्मानेंच रहित, त्याला मरण येणें शक्यच नाहीं. काळाचाहि त्याच्यावर आघात होत नाहीं. परमात्मा असा क्षयातीत आहे. ५०० ज्याला जन्म कर्म-मरण नाहीं त्याला विकारी कोण करणार ! हे उद्धवा ! याप्रमाणें आत्मवस्तु परिपूर्ण अविकारी आहे. १ गाढ अज्ञान पसरलें तरी आत्मा नाहींसा करितां येत नाहीं किंवा प्रखर ज्ञान झालें तरी आत्मा नवीन उत्पन्न करितां येत नाहीं. २ ज्ञान-अज्ञानांपासून अलिप्त असलेला आत्मा नित्य निर्विकार आहे. श्रीकृष्ण हाच अर्थ दृष्टान्त देऊन सांगत आहे. ५०३.

—आतां हेंच दृष्टान्तानें स्पष्ट करितात—

यथा हि भानोः उदयः नृचक्षुषां तमः निहन्यात् न तु सत् विधत्ते—ज्याप्रमाणें सूर्याचा उदय मनुष्यांच्या नेत्रांना झांकणाऱ्या अंधकाराची निवृत्ति करितो, पूर्वींच विद्यमान असलेल्या घटादि पदार्थांना उत्पन्न करीत नाहीं, **एवं मे समीक्षा निपुणा सती पुरुषस्य बुद्धेः तमिस्रं हन्यात्**—त्याचप्रमाणें माझी आत्मविद्या अतिशय समर्थ होत्साती पुरुषाच्या बुद्धीवरील अज्ञानपटल नाहींसें करितें. ३४.

डोळ्यांमध्यें रहाणाऱ्या दृष्टीला अंधकारामुळें दिसत नाहीं. सूर्य उगवून अंधाराला घालवितो, तेव्हां दिसूं लागतें. पण सूर्य कांहीं नवी दृष्टि उत्पन्न करीत नाहीं. ४ त्याप्रमाणें प्रबल माया क्षुब्ध होऊन ती आत्म्याला उत्पन्न करीत नाहीं. ती मनुष्यांच्या बुद्धीवर आवरण घालून मिथ्या मायाजाळ दाखविते. ५ शुद्ध ज्ञान झाल्यावर तें अविद्यारूप मळ घालवितें; पण नवा आत्मा उत्पन्न करण्याचें सामर्थ्य ज्ञानालाहि नाहीं. ६ आत्मा आपल्या प्रकाशानें ज्ञान-अज्ञानांस प्रकाशित करितो; पण तें ज्ञान-अज्ञान परमात्म्याला कधींकाळींहि स्पर्श करीत नाहीं. ७ ज्ञान व अज्ञान हे दोन्ही अविद्येमध्यें अंतर्भूत होणारे विकार आहेत. आत्मा अविद्येहून पर आहे. यास्तव तो नित्य निर्विकार आहे. ८ सूर्याला रात्र नाहीं, मग दिवस तरी कोठला ! त्याप्रमाणें आत्म्याला ज्ञान व अज्ञान ही दोन्हीं केव्हांहि स्पर्श करीत नाहींत. ९ आत्मा

तेवीं ज्ञानाज्ञान आत्म्यासी । कदाकाळेंसीं स्पर्शेना ॥ ९ ॥ आत्मा निर्विकार स्वयंज्योती । अलिप्त ज्ञानाज्ञानस्थिती । त्या स्वरूपाची सहज प्राप्ती । उद्धवाप्रति हरि सांगे ॥ १० ॥

एष स्वयंज्योतिरजोऽप्रमेयो महानुभूतिः सकलानुभूतिः ।

एकोऽद्वितीयो वचसां विरामे येनेषिता वागसवश्चरन्ति ॥ ३५ ॥

एवं स्वयंज्योतीचें व्याख्यान । परमात्मा स्वप्रकाशघन । साधक तद्रूप आपण । अभिन्नत्वें जाण सर्वदा ॥ ११ ॥ आत्मा परिपूर्ण निजपूर्णता । त्यासी वेगळी कैंचीं मातापिता । यालागीं आत्म्यासी जन्माची कथा । जाण सर्वथा असेना ॥ १२ ॥ त्रिगुणांचें त्रिविध मळ । हे मिथ्या मायिक समूळ । आत्म्यासी न लागता अळुमाळ । यालागीं निर्मळ निजात्मा ॥ १३ ॥ अप्रमेय म्हणिपे तें ऐका । ऐसा तैसा इतुका तितुका । पैल तो अमका तमका । प्रमाण देखा कदा नव्हे ॥ १४ ॥ काळा गोरा सांवळा । निळा धवळा पिंवळा । एथ तेथ दूरी जवळा । या प्रमाणांवेगळा परमात्मा ॥ १५ ॥ महानुभूतिपद-व्याख्यान । आत्मा अखंडदंडायमान । निजीं निजरूपें समसमान । स्वानंदघन सर्वदा ॥ १६ ॥ तेथ देश काळ वर्तमान । ध्येय ध्याता अथवा ध्यान । ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान । हेंही जाण असेना ॥ १७ ॥

निर्विकार असून स्वयंप्रकाश आहे. तो ज्ञान व अज्ञान या दोहोंपासून अलिप्त आहे. त्या स्वरूपाची प्राप्ति होण्याचा सुलभ उपाय श्रीहरि उद्धवाला सांगत आहे. ५।१०.

—आत्म्याच्या निर्विकारतेचा विस्तार करितात—

एषः स्वयंज्योतिः—हा स्वयंप्रकाश आहे. (यांतील ' हा ' या पदानें अपरोक्षत्वानें नित्य प्राप्त असलेल्या आत्म्याच्या प्राप्तीचें निवारण करितात व ' स्वयंज्योतिः ' या पदानें ' अज्ञानमळाचें निवारण ' या स्वरूपाच्या विकाराचें निवारण करितात.) अजः—हा अज आहे (यानें उत्पत्तीचें निवारण केलें आहे.) अप्रमेयः—हा कोणत्याहि प्रमाणाचा विषय होत नाहीं. (यानें ज्ञानलक्षण गुणाच्या आधानानें याला संस्कार करितां येत नाहीं हें दाखविलें.) महानुभूतिः—याचा प्रभाव फार मोठा आहे. (या पदानें देश, काल व वस्तु यांच्या परिच्छेदाचा अभाव असल्यामुळें यांचें अस्तित्व, वृद्धि, विपरिणाम, अपक्षय व नाश या विकारांची निवृत्ति केली आहे. आतां स्वयंज्योतिष्ट्वादिकांविषयीं हेतु सांगतात—) सकलानुभूतिः—कारण तो सर्वांचा अनुभव घेणारा आहे. एकः अद्वितीयः—तो एक व अद्वितीय आहे (अर्थात् विकाराचें निमित्त असा दुसरा पदार्थ नसल्यामुळें त्याच्या ठिकाणीं दुसरा कोणत्याहि प्रकारचा विकार संभवत नाहीं. ' अहोपण, श्रुतीचा विषय होणाऱ्या या आत्म्याला स्वयंज्योतिष्ट्व कसें ! उत्तर—) वचसां विरामे—वाणीचा विषय होत नसल्यामुळें तिची निवृत्ति झाली असतां तो प्रतीतीला येतो. (याविषयीं ' यतो वाचो निवर्तन्ते० ') इत्यादि तैत्तिरीय श्रुति प्रमाण आहे. तै. भा. २. ४. पृ. १०१ त्याविषयीं हेतु—) येन इषिता वाक् असवः चरन्ति—ज्यानें नुसत्या इच्छेनेंच प्रेरित केलेली वाक् व प्राण आपापलें कार्य करितात. (याविषयीं ' केनेषितं पतति० ' ' श्रोत्रस्य श्रोत्रं० ' इत्यादि तलवकारश्रुति प्रमाण आहे. के. भा. पृ. ११) ३५.

याप्रमाणें परमात्मा स्वयंज्योति म्ह० स्वयंप्रकाश आहे. साधकहि स्वतः तद्रूपच असून त्याहून कधींहि भिन्न नसतो. ११ आत्मा आपल्या पूर्णत्वानेंच परिपूर्ण आहे. त्याला निराळीं मातापितरें काय करावयाचीं ! म्हणून आत्म्याला जन्माचें सर्वथा नांवहि नाहीं. १२ त्रिगुणांचे तीन प्रकारचे मल हे समूळ मिथ्या मायिक आहेत. ते आत्म्याला अणुभरहि लागत नाहींत. म्हणून आत्मा निर्मल आहे. १३ आतां अप्रमेयच म्हणजे काय, तें ऐका. तो असा, तसा, इतका, तितका, पलीकडला, अमका, तमका इत्यादि त्याचें नेमकें प्रमाण सांगतां येत नाहीं. १४ काळा, गोरा, सांवळा, निळा, ढवळा, पिंवळा इकडे-तिकडे दूर-जवळ, या सर्व प्रमाणांहून परमात्मा वेगळा आहे. १५ आतां ' महानुभूतिः ' या पदाचा अर्थ ऐका. आत्मा सतत जागरूक आहे. आपल्या स्वरूपांत सम-समान व सर्वदा स्वानंदरूप आहे. १६ त्याला देश, काळ, वर्तमान; ध्येय, ध्याता, ध्यान; ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान हें नसतें. १७ तो नाम-

नाम–रूप–जात–गोत–। क्रियाकर्मांसी अलिप्त । जन्ममरण कैंचें तेथ । वस्तु सदोदित स्वानंदें ॥ १८ ॥ तेथ वृद्धि आणि ऱ्हास । आदिमध्यांतविलास । परिपाकादि विन्यास । यांचाहि प्रवेश असेना ॥ १९ ॥ म्हणशी पूर्वोक्त धर्मस्थिती । तेथ न रिघे कैशा रीतीं । सकळानुभूति त्या पदोक्तीं । वस्तु सर्वार्थी अलिप्त ॥ ५२० ॥ या धर्मांचा धर्मी आणि धर्म । सकळ भूतांचें क्रियाकर्म । प्रकाशक मी आत्माराम । यासी अलिप्त परम परमात्मा ॥ २१ ॥ गंगाजळा आणि मेघासी । आकाश व्याप्त असोनि त्यांसी । परी तें अलिप्त दोहींसी । तेवीं ज्ञानाज्ञानासी परमात्मा ॥ २२ ॥ जेथ अज्ञानाचा अभावो । तेथ कर्माकर्मा कैंचा ठावो । सकळानुभूति या नांव पहा हो । अभेदान्वयो स्वानंदें ॥ २३ ॥ ऐसा परमात्मा परमानंद । स्वजातीयविजातीयस्वगतभेद । नसोनियां वस्तु शुद्ध । जाण प्रसिद्ध निजबोधें ॥ २४ ॥ विजातीय भेद मी देह म्हणणें । स्वजातीय भेद मी जीवपणें । स्वगत भेद मी ब्रह्म स्फुरणें । हे तिन्ही नेणे परमात्मा ॥ २५ ॥ तेथ उणखूण लक्ष्यलक्षण । युक्तिप्रयुक्ति प्रमाण । हेंही सर्वथा न रिघे जाण । ब्रह्म परिपूर्ण एकाकी ॥ २६ ॥ ऐसें एकाकी परब्रह्म । निजगुह्याचें गुह्य उत्तम । हें जाणे तो सभाग्य परम । त्यासी भवभ्रम न बाधी ॥ २७ ॥ तो देहीं असतांचि जाण । त्यासी न बाधी देहगुण । कदा न बाधी कर्माचरण । जन्ममरण बाधीना ॥ २८ ॥ ऐकोनि ऐशिया ज्ञानासी । तें स्वरूप स्पष्ट सांग म्हणसी । तरी तेथ रिगमू नाहीं वाचेसी । श्रुति शब्दें परतल्या ॥ २९ ॥ तेथ अतिविवेकसंपन्न । बुद्धि प्रवेशेना आपण । सवेगपणें न पवे मन । ते वस्तु वाचेअधीन सर्वथा नव्हे ॥ ५३० ॥ खुंटली शास्त्रांची व्युत्पत्ती । दर्शनें अद्यापि विवादती । श्रुति परतल्या नेति नेति । तेथ वचनोक्ती विराम ॥ ३१ ॥ धरोनि जाणिवेची हांव । शब्दज्ञानें घेतली धांव । परी वस्तूचें एकही नांव । घ्यावया जाणीव न सरेची ॥ ३२ ॥ एवं विचारितां साचार । परादि वाचा

रूप, जात-गोत, क्रिया-कर्म, यांहून अलिप्त असतो. मग त्याला जन्म-मरण कोठचें! आत्मा सदोदित स्वानंदपूर्णच असतो. १८ त्याच्यामध्यें वृद्धि-ऱ्हास; आदि-मध्य-अंत या अवस्था; परिणामादि विकार यांचा प्रवेशहि होत नाहीं. १९ पण तूं कदाचित् म्हणशील कीं, पूर्वोक्त धर्मस्थिति त्याच्यामध्यें कशी प्रवेश करीत नाहीं! तर 'सकलानुभूतिः' या पदानें वस्तु सर्व प्रकारें अलिप्त असते, असें सांगितलें आहे. ५२० या सर्व धर्मांचा धर्मी आणि धर्म, सर्व प्राण्यांचें क्रियाकर्म यांचा प्रकाशक मी आत्माराम आहें. पण परमात्मा या सर्वांहून अलिप्त आहे. २१ गंगाजल आणि मेघ या दोहोंसहि आकाश व्यापितें; पण तें त्या दोहोंहून अलिप्तच असतें. त्याप्रमाणें ज्ञानअज्ञानांपासून परमात्मा अलिप्त असतो. २२ जेथें अज्ञानाचाच अभाव तेथें कर्म-अकर्मांना जागा कोठची! यालाच 'सकलानुभूतिः' असें म्हणतात. त्यांत स्वानंदामुळें भेदभाव नाहीं. २३ हा परमात्मा असा परमानंद, व सजातीय-विजातीय, स्वगतभेदशून्य आहे. आत्मबोधानें तें शुद्ध ब्रह्म आहे. २४ 'मी देह' असें म्हणणें हा विजातीय भेद; मी जीव आहें, असें म्हणणें हा सजातीय भेद; 'मी ब्रह्म' असें स्फुरणें हा स्वगतभेद होय. परंतु परमात्मा हे तिन्ही भेद जाणत नाहीं. २५ तेथें खूण, लक्ष्य, लक्षण, युक्ति, प्रयुक्ति, प्रमाण हें मुळींच लागत नाहीं. ब्रह्म परिपूर्ण एकटेंच असतें. २६ असें हें एकटेंच परब्रह्म निजगुह्यांतील उत्तम गुह्य आहे. हें जो जाणतो, तो परम भाग्यवान् आहे. त्याला भवभ्रम बाधत नाहीं. २७ कर्माचरण बाधत नाहीं. तो देहांत असतांहि त्याला देहाचे गुण बाधत नाहींत व जन्म-मरण बाधत नाहीं. २८ हें ज्ञान ऐकून 'तें स्वरूपच मला स्पष्ट सांग' असें जर म्हणशील तर तेथें वाचेचा प्रवेशहि होत नाहीं. श्रुतीचे शब्दहि मागें परतल्यावर २९ त्यांत अत्यंत विवेकसंपन्न बुद्धीहि प्रवेश करीत नाहीं. मनाचा एवढा वेग असून तेंहि तेथें पोंचत नाहीं. तें आत्मतत्त्व सर्वथा वाणीच्या अधीन नाहीं. ३० शास्त्रांची व्युत्पत्ति खुंटली; सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा, वेदान्त हीं सहा दर्शनें अद्यापि त्याविषयीं वाद करीत आहेत. श्रुतीहि 'नेति नेति' म्हणून परत फिरल्या. तेथें वाणी स्वस्थ होऊन बसली ३१ ज्ञानाची हांव धरून शब्दज्ञानानें धांव घेतली; पण परब्रह्माचें एकहि नांव घेण्यास ती जाणीव पुरी पडली नाहीं. ३२ अशा प्रकारें विचार केला असतां परादि

नव्हे उच्चार । यालागीं वस्तु परात्पर । क्षराक्षरांअतीत ॥ ३३ ॥ जे सर्वावयवीं सर्वदा शून्य । शेखी शून्यही नव्हे आपण । शून्यप्रकाश चिद्धन । वस्तु परिपूर्ण एकत्वें ॥ ३४ ॥ तेथ रिघावया वचनोक्ती । शब्दें साधिल्या नाना युक्ती । त्या चिदाकाशीं मावळती । जेवीं कां उगवतां गभस्ती खद्योत ॥ ३५ ॥ खद्योत सूर्यासी खेंव देता । तैं वस्तु येती वचनाचे हाता । वस्तूपाशीं शब्दाच्या कथा । जाण तत्त्वतां हारपती ॥ ३६ ॥ सूर्योदय जालिया पाहीं । खद्योत शोधितां न पडे ठायीं । तेवीं वस्तुप्राप्ति पाविजे जिहीं । तैं मागमोस नाहीं शब्दाचा ॥ ३७ ॥ हो कां आंधारिये रातीं ।ज्याची दीपें चाले क्रियास्थिती । तेथ झालिया सूर्योदयप्राप्ती । तेचि उपेक्षिती दीपातें ॥ ३८ ॥ तेवी शाब्दिकां ज्ञानयुक्ती । अनुतापें ब्रह्म विवंचिती । ज्यांसी झाली ब्रह्मप्राप्ती । तेचि उपेक्षिती शब्दातें ॥ ३९ ॥ जंव जंव शब्दाचा अभिमान । तंव तंव दूरी ब्रह्मज्ञान । येचि अर्थीचें उपलक्षण । ऐक निजखूण उद्धवा ॥ ५४० ॥ कन्या द्यावया वरासी । माता पिता बंधु ज्योतिषी । मेळवूनियां सुहृदांसी । कन्या वरासी अर्पिती ॥ ४१ ॥ तेथ भर्तारसंभोगसेजेपाशीं । जवळी मातापितासुहृदेंसीं । असणें हाचि अवरोध तिसी । पतिसुखासी प्रतिबंध ॥ ४२ ॥ तेवीं योग्यता चातुर्य जाण । शब्दज्ञानें ज्ञातेपण । जवळी असतां ब्रह्मज्ञान । सर्वथा जाण हों न शके ॥ ४३ ॥ जेवीं डोळां अल्प कण न समाये । तेवीं ब्रह्मीं कल्पना न साहे । यालागीं निर्विकल्पें पाहें । ब्रह्मज्ञान होये सुटंक ॥ ४४ ॥ समस्त ज्ञानाचा उपरम । सकळ वचनांचा विराम । तैंचि पाविजे ब्रह्म सुगम । ऐसें पुरुषोत्तम बोलिला ॥ ४५ ॥ जें नाकळे बुद्धीच्या ठायीं । जें मनासी नातुडे कंहीं । जें वचनासी विषयो नव्हे पाहीं । प्रमाणाचे पाहीं पावलें न वचे ॥ ४६ ॥ यापरी वस्तु न पडे ठायीं । जरी ते वस्तूचि म्हणशी नाहीं । ऐसें उद्धवा कल्पिसी । ऐक तेविषयीं सांगेन ॥ ४७ ॥

वाणीलाहि तें उच्चारितां येत नाहीं. म्हणून ब्रह्म क्षर-अक्षरांच्या अतीत व परात्पर आहे. ३३ जें सर्व अवयवांनीं सर्वदा शून्य असतें तें शेवटीं स्वतः शून्य नसतें. कारण शून्याला प्रकाशित करणारें चित्स्वरूप एकत्वानें परिपूर्ण आहे. ३४ त्यांत प्रवेश करावयास शब्दांनीं अनेक प्रकारच्या युक्ति लढविल्या; पण सूर्य उगवतांच काजवे जसे लोपून जातात, तशा त्या परब्रह्मांत मावळून गेल्या. ३५ काजवा जर सूर्याला आलिंगन देईल तर आत्मतत्त्व वाणीच्या हातीं लागेल. आत्मवस्तूपाशीं शब्दांचें नांवच टिकत नाहीं. ३६ सूर्योदय झाल्यावर काजवा जसा शोधून कोठें सांपडत नाहीं, त्याप्रमाणें ज्यांना आत्मवस्तु प्राप्त झाली आहे त्यांच्यापाशीं शब्दाचा मागमूस लागत नाहीं. ३७ अंधाऱ्या रात्रीं ज्यांचीं कामें दिव्याच्या प्रकाशांत चालतात, तेच सूर्योदय होतांच दिव्याची उपेक्षा करितात. ३८ त्याप्रमाणें जिज्ञासु शब्दांच्या ज्ञानयुक्तींनीं व मोठ्या श्रमानें ब्रह्माचें विवेचन करितात. पण ज्यांना ब्रह्मप्राप्ति झाली आहे ते शब्दांची उपेक्षा करितात. ३९ शब्दांचा जेवढा अभिमान तेवढें ब्रह्मज्ञान दूर पळतें. उद्धवा! दृष्टान्तासह याचें लक्षण सांगतों, तें ऐक. ५४० कन्या वराला अर्पण करण्याच्या वेळीं माता, पिता, बंधु, ज्योतिषी इत्यादि सगळे आप्तइष्ट जमून ती त्याला अर्पण करितात. (विवाह लावितात.) ४१ परंतु पुढें त्या पति-पत्नींची गांठ पडण्याच्या प्रसंगीं त्यांच्या शय्येपाशीं जर माता-पिता इत्यादि आप्तजन जमले तर त्यांचा तिला मोठा प्रतिबंध होऊन व तिच्या सुखांत जसा अडथळा येतो, ४२ त्याप्रमाणें योग्यता, चातुर्य, शब्दज्ञान व ज्ञातेपणा हीं जवळ असतां ब्रह्मज्ञान कदापि प्राप्त होत नाहीं. ४३ नेत्रांत अगदीं बारीक कण गेल्यास तोहि जसा सहन होत नाहीं, त्याप्रमाणें ब्रह्मामध्यें कल्पना सहन होत नाहीं. म्हणून निर्विकल्पानें पाहिलें असतां शुद्ध ब्रह्मज्ञान प्राप्त होतें. ४४ जेव्हां सर्व ज्ञानाचा शेवट व सर्व भाषणांचा अंत होतो, तेव्हांच ब्रह्म सुगम होतें, असें श्रीकृष्णानें सांगितलें. ४५ बुद्धीला जें आकलन करितां येत नाहीं. तें मनाला कधीं सांपडत नाहीं. जें शब्दाचा विषय नव्हे, त्यापुढें प्रमाण तर पाऊलहि पुढें टाकीत नाहीं. ४६ उद्धवा! यावर तूं कदाचित् 'आत्मवस्तु जर आकलन करितां येत नसेल तर तें आत्मतत्त्वच नव्हे' अशी कल्पना करशील म्हणून त्याविषयींहि सांगतों, ऐक. ५४७.

॥ मूळ श्लोकींचें पद ॥ येनेषिता वागसवश्चरंति ॥

येथें देहेंद्रियप्राण । हे जड मूढ अचेतन । त्यांसी चेतवी आत्मा चिद्घन । तेंही उपलक्षण अवधारीं ॥ ४८ ॥ आत्मप्रभा दृष्टि प्रकाशे । परी आत्मा दृष्टीसी न स्पर्शे । आत्मा दृष्टी सब्राह्य असे । परी आत्मा दृष्टीसी न दिसे अदृश्यत्वें ॥ ४९ ॥ आत्मसत्ता ऐकती श्रवण । श्रवणांसी आत्मा नातळे जाण । श्रवणां सबाह्य असोनि पूर्ण । श्रवणविषय जाण नव्हेचि आत्मा ॥ ५५० ॥ वाचा आत्मसत्ता उठी । आत्मा नातळे वाचिका गोठी । वस्तु शब्दांचे पाठींपोटीं । तो शब्द शेवटीं नेणे वस्तू ॥ ५१ ॥ मन आत्मसत्ता चपळ । मना सबाह्य आत्मा केवळ । तो मनासी नातळे अळुमाळ । मनासी अकळ निजात्मा ॥ ५२ ॥ चित्त चेतवी चिद्घन । चित्सत्ता चित्तासी चिंतन । चित्ता सबाह्य चैतन्य पूर्ण । तरी चित्तासी चैतन्य कळेना ॥ ५३ ॥ आत्मसंयोगें अहं उल्हासे । अहंता आत्मा कदा न स्पर्शे । अहंता सबाह्य आत्मा असे । परी तो आत्मा न दिसे अहंकारें ॥ ५४ ॥ आत्मप्रभाप्रकाशविधी । प्रकाशिली विवेकबुद्धी । बुद्धीस आत्मा न कळे त्रिशुद्धी । आत्मा बुद्धी सबाह्य ॥५५॥ आत्मप्रभा प्राण चळे । परी प्राणासी आत्मा नातळे । प्राण सबाह्य आत्ममेळें । तरी प्राणासी न कळे परमात्मा ॥५६॥ उद्धवा तूं यापरी पाहें । जड जयाचेनि वर्तताहे । तो आत्मा स्वतःसिद्ध आहे । नाहीं नोहे कल्पांतीं ॥ ५७ ॥ यापरी आत्मा स्वतःसिद्ध । भेद नांदवूनि अभेद । द्वंद्व प्रकाशोनि निर्द्वंद्व । हा निजात्मबोध दृढ केला ॥ ५८ ॥ एवं आत्मा निर्द्वंद्व अद्वैतें । तो आहे नाहीं म्हणावया येथें । कोणी नुरेचि गा म्हणतें । आत्मा निजात्मतें परिपूर्ण ॥ ५९ ॥ आत्मा निजात्मा सदोदित । संसार तेथ आरोपित । येचि अर्थीं श्रीकृष्णनाथ । असे सांगत श्लोकार्थें ॥ ५६० ॥

देह, इंद्रियें व प्राण हे जड, मूढ व अचेतन आहेत. त्यांना चित्स्वरूप आपल्या आत्मप्रकाशानें प्रकाशित करितो. त्याचेंहि लक्षण सांगतों, ऐक. ४८ आत्मप्रकाश दृष्टीला प्रकाशित करितो; परंतु आत्मा दृष्टीला स्पर्श करीत नाहीं. आत्मा दृष्टीला सबाह्य व्यापितो; पण तो अदृश्य असल्यामुळें दृष्टीला दिसत नाहीं. ४९ आत्मसत्तेनें कानांना ऐकण्याची शक्ति येते; पण आत्मा कानांना स्पर्शहि करीत नाहीं. तो श्रवणांच्या अंतर्बाह्य पूर्ण असूनहि त्यांचा विषय होत नाहीं. ५५० आत्मसत्तेनेंच वाणी प्रकट होते; पण वाचेच्या शब्दांना आत्मा स्पर्शहि करीत नाहीं. शब्दांच्या मागें-पुढें आत्मा असतो; पण तो शब्द कांहीं त्याला जाणत नाहीं. ५१ आत्मसत्तेनेंच मन चपळ झालें आहे. मनाच्या आंत बाहेर आत्माच भरलेला आहे. पण तो मनाला अणुमात्रहि स्पर्श करीत नाहीं. मनाला आत्मा जाणतां येत नाहीं चिद्घन चित्ताला चैतन्य देतें. ५२ चित्सत्तेनेंच चित्त चिंतन करितें. चित्ताच्या आंत-बाहेर पूर्ण चैतन्य असतें. तरी चित्ताला तें चैतन्य कळत नाहीं. ५३ आत्म्याच्या संयोगानेंच अहंकाराला उल्हास येतो; पण आत्मा अहंकाराला कधीं स्पर्शहि करीत नाहीं. ५४ आत्मा अहंतेच्या सबाह्य असतो; पण अहंकाराला तो दिसत नाहीं. आत्मप्रकाशानें विवेकबुद्धि प्रकाशित होते; पण बुद्धीला आत्मा खरोखर कळत नाहीं. आत्मा बुद्धीच्या सबाह्य असतो. ५५ आत्मप्रकाशानेंच प्राणाला चालन मिळतें; पण आत्मा प्राणाला स्पर्शहि करीत नाहीं. आत्मा प्राणाला सबाह्य व्यापितो; पण प्राणाला परमात्मा कळत नाहीं. ५६ हे उद्धवा ! याप्रमाणें तूं पहा ! ज्याच्या योगें जड पदार्थ वागतात, तो स्वतःसिद्ध आहे. तो कल्पांतींहि नष्ट होत नाहीं. ५७ आत्मा असा स्वतःसिद्ध आहे. तो भेदाला वागवून स्वतः भेदरहित असतो. द्वंद्वाला प्रकाशित करून स्वतः निर्द्वंद्व रहातो. हा आत्मबोध दृढ करावा. ५८ याप्रमाणें आत्मा अद्वैतामुळें निर्द्वंद्व आहे. तो आहे किंवा नाहीं, हें म्हणावयास तेथें दुसरें कोणी उरतच नाहीं. आत्मा आत्मस्वरूपानें परिपूर्ण आहे. आत्मा सदोदित ब्रह्मस्वरूपच आहे. ५९ त्यावर संसाराचा मिथ्या आरोप झाला आहे. याविषयींच श्रीकृष्णनाथ पुढील श्लोकानें सांगत आहे. ५६०.

एतावानात्मसंमोहो यद्विकल्पस्तु केवले । आत्मन्नृते स्वमात्मानमवलम्बो न यस्य हि ॥ ३६ ॥

आत्मा केवळ नित्यमुक्त । त्रिगुण गुणांसी अतीत । नभाहूनि अतिअलिप्त । सदोदित पूर्णत्वें ॥ ६१ ॥ ब्रह्म अखंडदंडायमान । सर्वदा स्वानंदघन । ऐसें अलिप्तीं प्रपंचभान । तो मिथ्या जाण आरोपू ॥ ६२ ॥ आरोपासी अधिष्ठान । स्वयें परमात्मा आपण । यालागीं प्रपंचाचें भान । तेथेंचि जाण आभासे ॥ ६३ ॥ परमात्म्याहूनि भिन्न । प्रपंचासी नाहीं स्थान । यालागीं उत्पत्ति स्थिती निधन । तेथेंचि जाण आभासे ॥ ६४ ॥ जेवीं दोराचा सर्प पाहीं । दोरावेगळा न दिसे कंहीं । दोर सर्प झालाचि नाहीं । तरी त्याच्या ठायीं आभासे ॥ ६५ ॥ तेवीं निर्विकल्प पूर्ण ब्रह्म । नातळे नाम रूप गुण कर्म । तरी त्याच्या ठायीं भ्रम । प्रपंच विषम परिकल्पी ॥ ६६ ॥ जेवीं दोरीं भासे मिथ्या सर्प । तेवीं ब्रह्मीं मिथ्या भवारोप । तेथ सुखःदुख भयकंप । तोही खटाटोप मायिक ॥ ६७ ॥ एवं प्रपंचाचें मिथ्या भान । वस्तु शुद्धत्वें स्वानंदघन । हें निर्दुष्ट केलें निरूपण । ब्रह्म परिपूर्ण अद्वय ॥ ६८ ॥ एवं नाना युक्ती सुनिश्चित । ब्रह्म साधिलें अबाधित । हें न मानिती जे पंडित । तें मत खंडित श्रीकृष्ण ॥ ६९ ॥

यन्नामाकृतिभिर्ग्राह्यं पञ्चवर्णमबाधितम् । व्यर्थेनाप्यर्थवादोऽयं द्वयंपण्डितमानिनाम् ॥ ३७ ॥

—आत्म्याच्या अद्वितीयत्वाचें उपपादन करण्यासाठीं भेदाचें मिथ्यात्व सांगतात—

केवले आत्मन् विकल्पः इति यत् एतावान् तु आत्मसंमोहः—अभिन्न आत्म्यामध्यें जो भेदविकल्प तोच मनाचा सर्व भ्रम आहे. यत् स्वं आत्मानं ऋतं यस्य अवलंबः न हि—कारण या स्वरूपभूत आत्म्यावांचून त्या भेदरूप विकल्पाचा अन्य आश्रय नाहीं. [रजतभ्रमाचा शुक्तीवांचून दुसरा आश्रय नाहीं, त्याप्रमाणें ' नेह नानास्ति किंचन ' इत्यादि अनेक श्रुति याविषयीं प्रमाण आहेत.] ३६.

आत्मा केवल, नित्य मुक्त, त्रिगुणांच्या विकारांहून अतीत, आकाशाहून अति अलिप्त व सदोदित परिपूर्ण आहे. ६१ ब्रह्म अखंड, एकरस, आनंदघन व प्रपंचापासून अलिप्त असतां त्यावर प्रपंचाचा मिथ्या आरोप होतो. ६२ या आरोपाचें अधिष्ठान स्वतः परमात्माच आहे. त्यामुळें त्यावर प्रपंचाचा मिथ्या भास होतो. ६३ प्रपंचाला परमात्म्याहून भिन्न स्थान नाहीं. त्यामुळें उत्पत्ति-स्थिति-लय त्यामध्येंच भासतात. ६४ दोरावरील सापांत दोरावांचून दुसरें कांहींहि [illegible] सर्प न होतांच साप भासतो; ६५ त्याप्रमाणें निर्विकल्प पूर्ण ब्रह्म नाम-रूप-गुण-कर्म यांस स्पर्शहि [illegible] नाहीं. तरी त्याच्यावर भ्रमानें विषम प्रपंच कल्पिला जातो. ६६ दोरीचा जसा मिथ्या सर्प भासतो, तसा ब्रह्मावर प्रपंचाचा मिथ्या आरोप होतो. त्यांतील सुख-दुःख, भय-कंप हे सर्व विकार मायिक आहेत. ६७ याप्रमाणें प्रपंचाचें भान मिथ्या आहे. आत्मा शुद्ध असल्यामुळें तो आनंदघन आहे. अद्वय ब्रह्म परिपूर्ण आहे, हें निर्दोष निरूपण केलें. ६८ याप्रमाणें अनेक प्रकारच्या निश्चित युक्तींनीं ' ब्रह्म अबाधित आहे ' हें सिद्ध केलें. आतां [illegible] मानीत नाहींत, त्यांच्या मताचें श्रीकृष्ण खंडण करीत आहे. ६९.

[illegible] प्रमाणांनीं प्रतीत होणाऱ्या प्रपंचाचा बाध संभवत नसल्यामुळें व वेदान्तार्थांना क्रत्वर्थकर्तृप्रतिपादनपरत्वानें [illegible] असल्यामुळें द्वैत सत्य आहे असें मानितात, यास्तव त्यांच्या मताचें अनुमान करून त्यावर दोष देतात—

[illegible] ग्राह्यं पंचवर्णं अबाधितं यत् द्वयं तत् अबाधितं इति पंडितमानिनां अयं अर्थवादः—नाम व रूप [illegible]. पंचभूतात्मक जें द्वैत तें अबाधित आहे, असें मानणाऱ्या पंडितमन्यांना म्हणजे ' आम्हीच काय ते पंडित ' [illegible] असतो, त्यांना ' वेदान्तांतील हा अर्थवाद आहे ' अशी प्रतीति येते. तत्त्ववेत्त्यांना अशी प्रतीति येत नाहीं [illegible] अर्थावांचूनहि त्यांना ती प्रतीति येत असते [अर्थावांचून कशी, ती पहा ! वेदान्तवाक्याचें [illegible] नाहीं. त्यामुळें त्यांना अर्थवाद म्हणतां येत नाहीं. त्याचप्रमाणें अकर्ता, अभोक्ता, परमानंदरूप जो आत्मा [illegible] अंग होऊं शकत नाहीं. ' द्वैताला अबाधितत्व नाहीं, नामरूपत्वामुळें, पंचभूतात्मकत्वामुळें ग्राह्यत्वामुळें. [illegible] अनुमानांनीं व वाचारंभणादि श्रुतींनीं त्याला बाधितत्व आहे.] ३७.

वेदवेदांतप्रतिपाद्य एथ । सकळ शास्त्रार्थाचें निजमथित । ब्रह्म अद्वय सदोदित । म्यां सुनिश्चित नेमिलें ॥ ५७० ॥ तें हें माझें निजमत । उपेक्षूनियां पंडित । ज्ञातेपणें अतिउन्मत्त । अभिमानयुक्त पांडित्यें ॥ ७१ ॥ त्या पंडितांचें पांडित्यमत । प्रपंच प्रत्यक्ष अनुभूत । तो मिथ्या मानोनियां एथ । कैंचें अद्वैत काढिलें ॥ ७२ ॥ अद्वैतासी नाहीं गांवो । जेथ तेथ जरी पाहों जाओं । अद्वैता नाहीं नेमस्त ठावो । यालागीं पहा हो तें मिथ्या ॥७३॥ रूप नाम गुण कर्म । पंचभूतें भौतिकें विषम । चतुर्वर्ण चारी आश्रम । सत्य परम मानिती ॥ ७४ ॥ सत्य मानावया हेंचि कारण । मनोभ्रमें भ्रमले जाण । ज्ञानाभिमानें छळिले पूर्ण । आपण्या आपण विसरले ॥ ७५ ॥ मुख्य मानिती विषयसुख । विषयार्थ पुण्य करावें चोख । स्वर्ग भोगावा आवश्यक । हें सत्य देख मानिती ॥ ७६ ॥ विषय सत्य मानिती परम । हें देहाभिमानाचें निजवर्म । तेणें सज्ञान केले अधम । मरणजन्म भोगवी ॥ ७७ ॥ पुढती स्वर्ग पुढती नरक । पुढती जननीजठर देख । यापरी पंडित लोक । केले ज्ञानमूर्ख अहंमतें ॥ ७८ ॥ त्यांचें ज्ञानतें वेदबाह्य । सर्वथा नव्हे तें ग्राह्य । जैसें अत्यंजाचें अन्न अग्राह्य । तैसें तें होय अतित्याज्य ॥ ७९ ॥ ज्ञानाभिमानियांचा विचार । तें अज्ञानाचें सोलींव सार । तयाचा जो निजनिर्धार । तो जाण साचार महामोहो ॥ ५८० ॥ तयाचा जो निजविवेक । इंद्रावणफळाऐसा देख । वरी साजिरें आंत विख । तैसा परिपाक ज्ञानाभिमानियांचा ॥ ८१ ॥ नामरूपात्मक प्रपंच । मिथ्या मायिकत्वें आहाच । ज्ञानाभिमानी मानूनि साच । वृथा कचकच वाढविती ॥ ८२ ॥ प्रपंचरचनेची कुसरी । आपण जैं मानावी खरी । तैं देहबुद्धि वाजली शिरीं । दुःखदरिद्रीं निमग्न ॥ ८३ ॥ त्यांची योग्यता पाहतां जाण । गायत्रीतुल्य वेदपठण । सकळ शास्त्रें जाणे पूर्ण । श्रुति पुराण इतिहास ॥ ८४ ॥ अतिनिःसीम वक्तेपण । समयींचें स्फुरे समयीं स्फुरण । तेणें वाढला देहाभिमान । पंडितमान्य अतिगर्वें ॥ ८५ ॥ नेणे अद्वैतसमाधान । तरी योग्यता गर्व गहन । निजमताचा मताभिमान । प्राणांतें

वेद-वेदान्तानें प्रतिपादन केलेलें, सगळ्या शास्त्राचा मथितार्थ असें ब्रह्म सदोदित अद्वय असतें, हें मीं निश्चयानें सिद्ध केलें. ५७० पण त्या माझ्या मताची उपेक्षा करून आपल्या ज्ञानानें उन्मत्त झालेले विद्वन्मन्य अभिमानानें स्वतःचें पांडित्य प्रकट करितात. ७१ त्या पंडितांचें पांडित्य असें आहे कीं, प्रपंचाचा प्रत्यक्ष अनुभव येत असतां, त्याला मिथ्या मानून तुम्हीं हें अद्वैत कोठलें काढलेंत ! ७२ अद्वैताचा पत्ताहि कोठें लागत नाहीं. जेथें पहावयास जावें, तेथें त्याचा ठाव-ठिकाणाहि लागत नाहीं. यास्तव तें अद्वैतच मिथ्या आहे. ७३ ते मतवादी विषम रूप-नाम-गुण-कर्म, भौतिक विकार, पंचभूतें, चार वर्ण, चार आश्रम यांसच परम सत्य मानितात. ७४ त्याला सत्य मानावयाचें कारण भ्रम आहे. ते मनोभ्रमानें भ्रान्त झाले आहेत. ज्ञानाभिमानानें पूर्णपणें फसून आपणच आपल्याला विसरले आहेत. ७५ विषयासाठीं उत्तम पुण्य करावें व स्वर्ग अवश्य भोगावा, हेंच ते खरें मानितात. ७६ विषयांना परम सत्य मानणें, हें देहाभिमानाचें रहस्य आहे. त्यानें सज्ञानांनाहि अधम करून त्यांस जन्म-मरण भोगावयास लाविलें आहे. ७७ पुनः स्वर्ग पुनः नरक, पुनः गर्भवास याप्रमाणें पंडितांना ज्ञानाभिमानानें पढतमूर्ख बनविलें आहे. ७८ त्यांचें तें ज्ञान वेदबाह्य असल्यामुळें सर्वथा ग्राह्य नाहीं. अंत्यजाच्या घरचें अन्न जसें अग्राह्य, तसेंच त्यांचें तें मत अत्यंत त्याज्य समजावें. ७९ ज्ञानाभिमानी लोकांचे विचार म्हणजे अज्ञानाचें गाळीव सारच असतें. त्यांचा निर्धार म्हणजे पक्का महामोह; ८० त्यांचा विवेक म्हणजे वृंदावन फळासारखा वरून सुंदर व आंतून कडु असतो. ज्ञानाभिमानी लोकांचा परिणाम शेवटीं अनिष्ट होतो. ८१ नामरूपात्मक प्रपंच मायिक असल्यामुळें मिथ्या आहे, हें न जाणतां ज्ञानाभिमानी त्याला सत्य समजून व्यर्थ कलह वाढवितात. ८२ प्रपंचरचनेचें चातुर्य जर खरें मानिलें, तर देहाभिमान शिरीं घेऊन दुःख-दारिद्र्यांत निमग्न व्हावें लागतें. ८३ त्या पंडितांची योग्यता पाहूं गेल्यास त्यांचें वेदपठण गायत्रीतुल्य असतें. सगळीं शास्त्रें, श्रुति, पुराणें, इतिहास त्यांच्या मुखोद्गत असतात. ८४ त्यांच्या अंगीं अस्खलित वक्तृत्व व समयसूचकता असते; पण त्यामुळें त्यांचा देहाभिमान वाढतो व ते पंडितमन्य गर्वानें अत्यंत ताठतात. ८५ त्यांना अद्वैताचें समाधान

जाण सांडीना ॥ ८६ ॥ पंडितमान्यांचें बोलणें । अवचटें नायकावें दीनें । जे नागवले देहाभिमानें । त्यांचेनि सौजन्यें अधःपातू ॥ ८७ ॥ विषभक्षित्याचा पांतीकर । अत्याग्रहें जो झाला नर । त्यासी अप्रार्थिता मरणादर । अतिदुर्धर जीवीं वाजे ॥ ८८ ॥ यालागीं न धरावी ते संगती । त्यांसीं न करावी वदंती । कदा नव जावें त्यांप्रती । ते त्याज्य निश्चितीं जीवेंभावें ॥ ८९ ॥ त्यांचे न लागावें बोली । त्यांचे न चालावें चाली । जे ज्ञानाभिमानभुली । मुकले आपुली हितवार्ता ॥ ५९० ॥ ते नाणावे निजमंदिरा । स्वयें न वचावें त्यांच्या द्वारा । त्यांसी न पुसावें विचारा । जे अभिमानद्वारा नाडले ॥ ९१ ॥ त्यांसी व्हावी हातभेटी । कदा न देखावे निजदृष्टीं । ते त्याज्य गा उठाउठीं । जेवीं धर्मिष्ठीं परनिंदा ॥ ९२ ॥ वेदशास्त्रांचा मथितार्थ । जो कां अद्वैत परमार्थ । तो ज्यांसी नावडे निजस्वार्थ । विचरे अनर्थ त्यांपाशीं ॥ ९३ ॥ यालागीं त्यांची संगती । साक्षेपें सांडवी श्रीपती । साधकाचे योगस्थिती । अंतराय-निवृत्ती हरि सांगे ॥ ९४ ॥

योगिनोऽपक्वयोगस्य युञ्जतः काय उत्थितैः । उपसर्गैर्विहन्येत तत्रायं विहितो विधिः ॥ ३८ ॥

योगी प्रवर्तल्या योगाभ्यासीं । योग संपूर्ण नव्हतां त्यासी । उपसर्ग येती छळावयासी । तेंचि हृषीकेशी सांगत ॥ ९५ ॥ शरीरीं एखादा उठे रोग । खवळे विषयाची लगबग । अथवा संभ्रमांत उपसर्ग । कां योगभंग विकल्पें ॥ ९६ ॥ ज्ञानाभिमान सबळ उठी । तेणें गुणदोषीं बैसे दिठी । परापवादाची चावटी । त्याची एकांतगोष्टी निजगुज ॥ ९७ ॥ देहीं शीतळता उभडे । कां उष्णता अत्यंत

कळत नाहीं. स्वतःच्या योग्यतेचा अत्यंत गर्व चढतो व ते आपल्या मताचा अभिमान प्राण गेला तरी सोडीत नाहींत. ८६ अशा पंडितमन्याचें बोलणें अज्ञजनांनीं अकस्मात् केव्हांहि ऐकूं नये. देहाभिमानानें नाडलेल्या लोकांच्या सौजन्यानेंहि अधःपातच होतो. जो मनुष्य विष भक्षण करणाराचा अतिशय आग्रहानें भागीदार होतो त्याला न बोलावतांच मरण मोठ्या आदरानें गांठतें. ८८ यास्तव त्यांची संगति धरूं नये. त्यांच्याशीं भाषण करूं नये. त्यांच्यापाशीं कधीं जाऊं नये. त्यांचा जीव-भावानें त्याग करावा. ८९ त्यांच्याशीं वाद घालूं नये. त्यांच्या मार्गानें जाऊं नये. जे ज्ञानाभिमानाला भुलतात ते आपल्या हिताला मुकतात. ५९० त्यांना आपल्या घरीं आणूं नये. आपण स्वतः त्यांच्या घरीं जाऊं नये. त्यांचा विचार घेऊं नये. कारण ते अभिमानानें नाडलेले असतात. ९१ त्यांच्याशीं गांठी-भेटी करूं नयेत. त्यांना कधीं डोळ्यांनीं पाहूं नये. धार्मिक मनुष्य जसा परनिंदा त्याज्य मानितो, तसा त्यांचा तत्काळ त्याग करावा. ९२ वेद-शास्त्रांचा मथितार्थ असा जो अद्वैतरूप परमार्थ, तो आपला खरा स्वार्थ त्यांना आवडत नाहीं. त्यांच्यापाशीं अनर्थ संचार करीत असतो. ९३ यास्तव त्यांची संगति सर्वथा सोडावी. आतां श्रीहरि साधकांच्या योगाचें स्वरूप व त्यांतील विघ्नांच्या निवृत्तीचा उपाय सांगत आहे. ५९४.

---याप्रमाणें ज्ञानयोगाचें सविस्तर निरूपण करून ज्ञाननिष्ठाच्या विघ्नांचा प्रतीकार पुढील तीन श्लोकांनीं सांगतात---

अपक्वयोगस्य योगं युंजतः योगिनः कायः यदि (अन्तरेव) उत्थितैः उपसर्गैः विहन्येत--ज्याचा योग परिपक्व झालेला नाहीं, अशा योगाभ्यासी योग्याचें शरीर जर मध्येंच उत्पन्न झालेल्या रोगादि उपद्रवांनीं पराभूत होईल, तत्र अयं विधिः विहितः--तर त्याप्रसंगीं हा उपाय सांगितलेला आहे. ३८.

योगी योगाभ्यासांत प्रवृत्त झाल्यास त्याचा योग सफल होण्यापूर्वीं त्याला छळावयास विघ्नें येतात. याविषयींच श्रीकृष्ण सांगत आहे. ९६ शरीराला एखादा रोग होतो, विषयांचे विकार खवळतात किंवा त्वरेमुळें त्रास होतो किंवा विकल्प उत्पन्न होऊन योगाचा भंग होतो ९६ किंवा ज्ञानाचा गर्व वाढतो व त्यामुळें दुसऱ्याच्या गुण-दोषांकडे दृष्टि जाते. दुसऱ्याची टवाळी करणें हेंच त्याचें एकान्तांतील हितगुज असतें. ९७ देहाला कधीं थंडीची

चढे । किंवा वायु अव्हाटीं पडे । कां क्षुधा वाढे अनिवार ॥ ९८ ॥ विक्षेप कषाय वोढवती । परदारापरद्रव्यासक्ती । इत्यादि उपसर्ग येती । उपाय श्रीपति तदर्थ सांगे ॥ ९९ ॥

योगधारणया कांश्चिदासनैर्धारणान्वितैः । तपोमन्त्रौषधैः कांश्चिदुपसर्गान्विनिर्दहेत् ॥ ३९ ॥

देहीं शीतळता वाढल्या जाण । तीस निवारी अग्निधारण । देहीं उष्मा चढल्या पूर्ण । सोमधारण उच्छेदी ॥ ६०० ॥ वायु अव्हांटल्या अवचितां । तें देहीं वायु भरावा पुरता । वायु मेळवूनी वायु-आंतौता । आणिती निजपंथा अभ्यासबळें ॥ १ ॥ वायु क्षोभोनि सकोप । जैं जठरावरी पडे झडप । तैं क्षुधा खवळे अमूप । तृप्तीचें रूप उठीना ॥ २ ॥ तेथ मोकळा सांडूनि प्राण । अपान वाढवावा आपण । तो जठरा आलिया जाण । तेथ क्षोभला प्राण सहजचि ये ॥ ३ ॥ तेथ प्राणापानऐक्यता । सहजें ये साध-कांच्या हाता । मग षट्चक्रें भेदितां । क्षणही सर्वथा लागेना ॥ ४ ॥ तेव्हां सतराविये़चें अमृतपान । साधकांसी फावे संपूर्ण । यापरी क्षुधा निर्दळण । येणें योगें जाण साधिती ॥ ५ ॥ परदारा परद्रव्यासक्ती । हे पापकर्माची फळप्राप्ती । याची करावया निवृत्ती । तपश्चर्या निश्चितीं उद्धवा ॥ ६ ॥ भावें करितां मंत्रा-नुष्ठान । तेणें वैराग्य उपजे जाण । वैराग्यें विषयनिर्दळण । सहजें जाण साधकां ॥ ७ ॥ शुद्ध मंत्राचें पुरश्चरण । करी विघ्नांचें निर्दळण । तेथ पिशाचबाधासंचरण । घेऊनि प्राण स्वयें पळे ॥ ८ ॥ शरीरीं संचरल्या व्याधी । त्यातें निर्दळी दिव्य औषधी । मनाचा छेदावया आधी । योग त्रिशुद्धीं साधावा ॥ ९ ॥ तेथ साधल्या योगसिद्धी । समूळ निर्दळी आधिव्याधी । सकळ विघ्नांतेंही छेदी । जाण त्रिशुद्धी उद्धवा ॥ ६१० ॥ हें किती सांगूं भिन्न भिन्न । भावें करितां माझें ध्यान । सकळ उपसर्गां निर्दळण । तेंचि निरूपण हरि सांगे ॥ ११ ॥

अत्यंत बाधा होते, कधीं उष्णता वाढते, तर कधीं अपान वायूची वाट सरते, किंवा अतिशय भूक लागते. ९८ विक्षेप व रागादि कषाय ओढवतात. परस्त्री व परद्रव्य यांवरील आसक्ति वाढते. इत्यादि अनेक विघ्नें येतात. श्रीहरि त्यांच्या निवारणाचा उपाय सांगत आहे. ५९९.

कांश्चित् योगधारणया कांश्चित् धारणान्वितैः आसनैः कांश्चित् च उपसर्गान् तपोमंत्रौषधैः विनिर्दहेत्— कांहीं संताप-शैत्यादि उपद्रवांचें निवारण सोम-सूर्यादिकांच्या धारणेनें करावें. कांहीं वातादि रोगांचें निवारण वायुधारणेनें युक्त अशा आसनांनीं करावें. पापग्रह, सर्प इत्यादिकांपासून होणाऱ्या उपद्रवांचें निवारण तप-मंत्र-औषधि यांच्या योगानें करावें. ३९.

शरीराला थंडीची बाधा झाल्यास अग्निधारणेनें तिचें निवारण करावें. शरीरांत उष्ण वाढल्यास चंद्राच्या धारणेनें त्याचा उच्छेद करावा. ६०० अकस्मात् वाताचा विकार झाल्यास देहांत पूर्णपणें वायु भरावा आणि आंतल्या वायूंत तो मिळवावा, म्हणजे अभ्यासबलानें तोहि पूर्व स्थितीला प्राप्त होतो. १ वायु क्षुब्ध होऊन त्याचा दाब पोटावर पडला असतां अतिशय भूक लागते. तृप्ति कशी ती होतच नाहीं. २ अशा वेळीं प्राणाला मोकळे सोडून अपान वाढवावा. तो पोटांत आला कीं, ४ क्षुब्ध झालेला प्राण सहजच शांत होतो. ३ त्या वेळीं प्राणापानाचें ऐक्य सहजच साधकाच्या हातीं येतें व षट्चक्रांचा भेद करण्यास क्षणाचाहि उशीर लागत नाहीं. ४ तेव्हां साधकाला सतरावीचें अमृतपान पूर्णपणें लाभतें. अशा रीतीनें क्षुधेचें निवारण करितात. ५ उद्धवा! परस्त्री आणि परद्रव्य यांची आसक्ति असणें हें पापकर्मांचेंच फल आहे.त्याची निवृत्ति तपश्चर्या केल्यानें होते. ६ श्रद्धेनें मंत्रानुष्ठान केल्यास त्यायोगें विरक्ति उपजते आणि विरक्तीनें साधकाच्या विषयासक्तीचा सहज नाश होतो. ७ शुद्ध मंत्राचें पुरश्चरण विघ्नांचा नाश करितें. त्या वेळीं पिशाचबाधा-संचार स्वतःच जीव घेऊन पळतो. ८ शरीरांत रोगांचा प्रवेश झाल्यास दिव्य औषधीनें त्यांचें निवारण होतें. मानासिक व्याधि घालविण्यास योगसाधन करावें. ९ हे उद्धवा! योगसिद्धि साध्य झाली असतां ती आधि-व्याधि इत्यादि सगळ्या विघ्नांचा निःशेष छेद करिते. ६१० हे भिन्नभिन्न उपाय कोठवर सांगत बसूं! भक्तिभावानें माझें ध्यान केलें असतां सगळ्या विघ्नांचा नाश होतो. हरि आतां त्याचेंच निरूपण करीत आहे. ६११.

कांश्चिन्ममानुध्यानेन नामसङ्कीर्तनादिभिः । योगेश्वरानुवृत्त्या वा हन्यादशुभदान् शनैः ॥ ४० ॥

आधिव्याधींसीं सकळ विघ्न । विकल्प विकर्म देहाभिमान । ज्ञानाभिमानासी दहन । करी ध्यानक्षण उद्धवा ॥ १२ ॥ माझिया ध्यानाचे परिपाठीं । उपसर्ग पळती उठाउठी । शोधितां विघ्न न पडे दृष्टीं । निर्द्वंद्व सृष्टी साधकां ॥ १३ ॥ माझा लागल्या ध्यानभावो । उपसर्गाचा नुरेचि ठावो । सकळ विघ्नांचा अभावो । विकल्प वावो स्वयें होती ॥ १४ ॥ म्हणशी घालोनि आसन । एकाग्र करोनियां मन । कैं ठसावेल तुझें ध्यान । तैं साधकां विघ्न बाधीना ॥ १५ ॥ असो न टके माझें ध्यान । तैं सोपा उपाव आहे आन । माझें करितां नामकीर्तन । विघ्ननिर्दळण हरिनामें ॥ १६ ॥ जेथ नामाचा घडघडाट । तेथ उपसर्गा न चले वाट । महाविघ्नांचा कडकडाट । करी सपाट हरिनामें ॥ १७ ॥ अखंड माझी नामकीर्ती । ज्याच्या मुखास आली वस्ती । त्या देखोनि विघ्नें पळती । उपसर्गा नुरवी निःशेष ॥ १८ ॥ माझ्या नामाचा निजगजर । पळवी महापापसंभार । उपसर्गां नुरवी थार । नाम सधर हरीचें ॥ १९ ॥ अवचटें घेतां माझें नाम । सकळ पातकां करी भस्म । जेथ अखंड माझें गुण-नामकर्म । तेथ विघ्नसंभ्रम स्पर्शेना ॥ ६२० ॥ माझे नाम कीर्तीचे पवाडे । ज्याची वाचा अखंड पढे । विघ्नें न येती तयाकडे । जेवीं सूर्यापुढें आंधार ॥ २१ ॥ माझे नामकीर्तीवीण , येथें । ज्याचें तोंड न राहे रितें । तो नागवे महाविघ्नांतें । जेवीं पतंगातें हुताशू ॥ २२ ॥ नामकीर्ती दाटुगी होये । हें विश्वासें मानलें आहे । तें नाम मुखीं केवीं राहे । करावें काये म्हणशील ॥ २३ ॥ मुखीं नामनिर्वाह व्हावा । यालागीं करावी साधुसेवा । संतसेवनीं सद्भावो जीवा । तेथ नव्हे रिगावा विघ्नांसी ॥ २४ ॥ सद्भावें धरिल्या सत्संगती । त्या संगाचिये निजस्थिती । मुखीं ठसावे नामकीर्ती । विकल्प चित्तीं स्फुरेना ॥ २५ ॥ मुखीं हरिनामाची गोडी । संतसेवेची अतिआवडी । तयाची गा

कांश्चित् मम अनुध्यानेन नाम-संकीर्तनादिभिः—कामादि कांहीं उपद्रवांचें निवारण माझ्या अनुचिंतनानें व नाम-संकीर्तनानें करावें. अशुभदान् योगेश्वरानुवृत्त्या शनैः हन्यात्—दंभ-मानादि कांहीं उपसर्गांचा नाश योगेश्वराच्या अनुवृत्तीनें हळू हळू करावा. ४०.

उद्धवा एक क्षणभर केलेलें माझें ध्यान आधि-व्याधींसह सगळीं विघ्नें, विकल्प, विकर्म, देहाभिमान, ज्ञानाभिमान या सर्वांचें भस्म करून टाकितें. माझ्या ध्यानाचा अभ्यास करीत असतां सगळीं विघ्नें तत्काळ पळून जातात. विघ्न शोधूं गेल्यास कोठें सांपडत नाहीं व साधकाला सगळी सृष्टि निर्द्वंद्व होते. १३ माझ्या ध्यानाची आवड उत्पन्न होतांच विघ्नाला जागाच उरत नाहीं. सगळ्या विघ्नांचा अभाव होतो व विकल्प स्वतःच व्यर्थ होतात. 'आसन घालून मन एकाग्र करून बसल्यावर त्यायोगें साधकाला विघ्न बाधत नाहीं तें तुझें ध्यान केव्हां ठसतें !' १५ असें जर म्हणशील (तर ऐक.) अशा रीतीनें माझें ध्यान जर ठसत नसेल तर त्याला दुसरा सोपा उपाय आहे. माझें नामस्मरण करावें. हरिनामानें कामादि विघ्नांचा नाश होतो १६ जेथें हरिनामाचा घोष चालतो, तेथें विघ्नांना वाटच मिळत नाहीं. हरिनामानें महाविघ्नांचा कडकडाट थांबतो. ज्याच्या मुखांत माझी नामकीर्ति अखंड असते त्याला पहातांच विघ्नें पळतात. मग यत्किंचित्हि अडथळा उरत नाहीं. १८ माझ्या नामाचा गजर महापातकांच्या राशी पळवितो. विघ्नांना थारा मिळत नाहीं. हरीचें नाम इतकें समर्थ आहे. सहज जरी माझें नांव घेतलें तरी सगळ्या पातकांचें भस्म होतें. मग जेथें अखंड माझे गुणानुवाद गातात, तेथें तर विघ्नांची वार्ताहि नसते. ६२० सूर्यापुढें जसा अंधार येत नाहीं, त्याप्रमाणें माझ्या नामकीर्तीचे पोवाडे अखंड गाणाऱ्यापुढें विघ्नें उभींहि रहात नाहींत. २१ ज्याचें मुख हरिनामकीर्तीवांचून क्षणभरहि रिकामें रहात नाहीं, तो अग्नि जसा पतंगाला जाळितो, २२ तसा महाविघ्नांचा नाश करितो. 'नामकीर्ति इतकी समर्थ आहे, हें विश्वासानें जरी मान्य केलें तरी तें नाम मुखांत राहील कसें ! त्याला काय उपाय करावा !' असें जर म्हणशील २३ तर हरिनामाची मुखाला संवय होण्यासाठीं साधूंची सेवा करावी. जीवांनीं संतांच्या सेवेंत सद्भाव ठेविला असतां तेथें विघ्नांचा प्रवेशहि होत नाहीं. २४ सद्भावानें सत्संगति धरिली असतां त्या संगतीच्या प्रभावानें मुखांत नामकीर्ति ठसते व चित्तांत विकल्प स्फुरत नाहीं. २५ मुखाला हरिनामाची गोडी, संतसेवेची

प्रतापप्रौढी । उपसर्गकोडी निर्दळी ।। २६ ।। साधकांसी पाठिराखा । संत झालिया निजसखा । तैं महाविघ्नांचिया मुखा । विभांडी देखा क्षणार्धें ।। २७ ।। सेवितां साधूंचें चरणोदक । अतिशुद्ध होती साधक । तेणें शुद्धत्वें महादोख । समूळ देख निर्दळी ।। २८ ।। साधूंच्या चरणतीर्थापाशीं । सकल तीर्थें येती शुद्धत्वासी । भावें सेवितां त्या तीर्थासी । ते उपसर्गासी नागवती ।। २९ ।। वंदितां साधुचरणरज । साधकांचें सिद्ध होय काज । निर्दळूनि विघ्नांचें बीज । स्वानंद निज स्वयें भोगिती ।। ६३० ।। निजभाग्यगती अवचितां । संतचरणरेणु पडल्या माथां । तो काळिकाळातें हाणे लाथा । तेथ विघ्नांची कथा ते कोण ।। ३१ ।। निधडा शूर निजबळेंसीं । धुरां निजशस्त्र देऊनि त्यासी । युद्धीं थापटिलिया पाठीसी । तो विभांडी परांसी तेणें उल्हासें ।। ३२ ।। तेवीं सद्भावें सत्संगती । मुखीं अखंड नामकीर्ती । भावें करितां संतांची भक्ती । महाबाधा निर्दळिती साधक ।। ३३ ।। कीर्ति भक्ती सत्संगती । हे त्रिवेणी लागे ज्याप्रती । त्यासी उपसर्ग नातळती । पावन त्रिजगतीं त्याचेनी ।। ३४ ।। माझी भक्ति आणि नामकीर्ती । यांची जननी सत्संगती । तो सत्संग जोडल्या हातीं । विघ्नें न बाधिती साधकां ।। ३५ ।। योग याग आसन ध्यान । तप मंत्र औषधी जाण । साधितां न तुटे देहाभिमान । तो सत्संग जाण निर्दळी ।। ३६ ।। योगादि सर्व उपायीं जाण । निवारिती अल्प विघ्न । विघ्नांचा राजा देहाभिमान । तो त्यांचेनि जाण ढळेना ।। ३७ ।। दुर्धर देहाभिमान । ज्ञातेपणीं अतिदारुण । त्याचें समूळ निर्दळण । सत्संग जाण स्वयें करी ।। ३८ ।। नेणपणाचा अभिमान । तत्काळ जाय निघोन । तैसा नव्हे ज्ञानाभिमान । चाविरा जाण जाणिवा ।। ३९ ।। त्याही अभिमानाचें निर्दळण । सत्संग निजांगें करी आपण । यालागीं सत्संगासमान । आन साधन असेना ।। ६४० ।। एकाचेनि निजमतें । आजरामर करावें देहातें । तेही योगादि साधनांतें । मूर्खमतें साधिती ।। ४१ ।।

अत्यंत आवड असली म्हणजे त्याच्या प्रभावानें कोट्यवधि विघ्नांचा नाश होतो. २६ संत साधकाचा पाठिराखा सखा झाल्यावर तो क्षणार्धांत महाविघ्नांचें तोंड फोडितो. २७ साधूंच्या चरणांचें तीर्थ सेवन केलें असतां साधक अत्यंत शुद्ध होतो व त्या पावनत्वामुळें महादोष नाहींसे होतात. २८ साधूंच्या चरणतीर्थापाशीं इतर सगळीं तीर्थें पवित्र होण्यासाठीं येतात. म्हणून तें तीर्थ भक्तीपूर्वक घेतल्यास सगळ्या विघ्नांचा नाश होतो. २९ संतांच्या चरणधुळीला वंदन केलें असतां साधकाची कार्यसिद्धि होते. विघ्नांचें बीज नाहींसें करून साधक स्वतः आत्मसुख भोगितात. ६३० मोठ्या सुदैवानें संतचरण-धूळ सहज जरी मस्तकावर पडली, तरी तो मनुष्य कळिकाळासहि लाथा मारण्यास समर्थ होतो; मग विघ्नांची काय कथा ! ३१ पराक्रमी शूर योध्याला शस्त्र देऊन सैन्याचा पुढाकार दिला व युद्धांत त्याची पाठ थोपटून त्याला प्रोत्साहन दिलें तर तो अधिकच शौर्यानें शत्रूंचा जसा संहार करितो; ३२ त्याप्रमाणें सद्भावानें सत्संगति व मुखांत अखंड नामकीर्ति असून श्रद्धेनें संतांची सेवा केल्यास साधक महाविघ्नांचा नाश करूं शकतात. ३३ कीर्ति, भक्ति व सत्संगति हा त्रिवेणीसंगम ज्याला लाभतो त्याला विघ्नें स्पर्शहि करीत नाहींत. त्याच्यायोगानें त्रिभुवन पावन होतें. ३४ सत्संगति माझी भक्ति व नामकीर्ति यांची माता आहे. ती सत्संगति एकदां जोडली कीं, साधकाला विघ्नें बाधत नाहींत. ३५ योग, यज्ञ, आसन, ध्यान, तप, मंत्र, औषधि हीं सर्व जरी साध्य झालीं तरी त्यांनीं जो देहाभिमान सुटत नाहीं, तो सत्संगतीनें नष्ट होतो. योगादि सगळे उपाय बारिकसारिक विघ्नांचें निवारण करूं शकतात; पण सर्व विघ्नांचा राजा जो देहाभिमाल त्याला त्यांना जागचा ढळवितांहि येत नाहीं. ३६ दुर्धर देहाभिमान विद्वत्तेनें तर अधिकच प्रबल होतो. ३७ त्याचा समूळ नाश एक सत्संगतीच करूं शकते. ३८ अज्ञ लोकांचा अभिमान तत्काल घालवितां येतो; पण ज्ञानाभिमान तसा तसा नव्हे, तो विद्वत्तेमुळें अतिशय चावरा असतो. ३९ त्याहि अभिमानाचा नाश सत्संग करितो. यास्तव सत्संगतीसारखें दुसरें साधन नाहीं. ३४० कोणाचें मत असें असतें कीं, देहच अजरामर करावा व या मूर्खांच्या मताप्रमाणें कोणी योगादि साधनें आचरितात. ६४१.

केचिद्देहमिमं धीराः सुकल्पं वयसि स्थिरम् । विधाय विविधोपायैरथ युञ्जन्ति सिद्धये ॥ ४१ ॥

देहो तितुका प्रारब्धाधीन । त्यासी प्रारब्धें जन्ममरण । त्या देहासी अजरामरण । पामर जन करूं पाहती ॥ ४२ ॥ त्या प्रारब्धाचें सूत्र पूर्ण । सर्वदा असे काळाधीन । यालागीं काळकृत जन्ममरण । सर्वांसी जाण सर्वदा ॥ ४३ ॥ चौदा कल्प आयुष्य जोडी । त्या मार्कंडेयासी काळ झोडी । युगा लोम झडे परवडी । त्या लोमहर्षाची नरडी मुरडिजे काळें ॥ ४४ ॥ चतुर्युगसहस्र संख्येसी । तो दिवस गणिजे ब्रह्मयासी । जो स्रजिता सकळ सृष्टीसी । त्यासी काळ ग्रासी स्वबळें ॥ ४५ ॥ स्रजित्या ब्रह्मयासी काळ पिळी । पाळित्या विष्णूतें काळ गिळी । प्रळयरुद्राचीही होळी । काळ महाबळी स्वयें करी ॥ ४६ ॥ यापरी काळ अतिदुर्धर । नेणोनि अविवेकी नर । वांछिती काळजयो पामर । देह अजरामर करावया ॥ ४७ ॥ जें जें दिसे तें तें नासे । हे काळसत्ता जगासी भासे । तरी अजरामरत्वाचें पिसें । मूर्ख अतिप्रयासें वांछिती ॥ ४८ ॥ थिल्लरींचा तरंग जाण । वांच्छी अजरामरपण । तंव थिल्लरासचि ये मरण । तेथ वांचवी कोण तरंगा ॥ ४९ ॥ तेवीं संसारचि नश्वर । त्यांतील देह अजरामर । करूं वांछिती पामर । उपायीं अपार शिणोनि ॥ ६५० ॥ देह जाईल तरी जावो । परी जीव हा चिरंजीव राहो । तदर्थ कीजे उपावो । तैसें अमरत्व पहा हो नरदेहा ॥ ५१ ॥ देह केवळ नश्वर । त्यातें अविवेकी महाधीर । करूं म्हणती अजरामर । उपायीं अपार शिणोनि ॥ ५२ ॥ केवळ काळाचें खाजें देहो । तो अमर करावया पहा हो । जो जो कीजे उपावो । तो तो अपावो साधकां ॥ ५३ ॥ एवं मूढतेचे भागीं । देहाच्या अमरत्वालागीं । शिणोनि उपायीं अनेगीं । हठयोगी नागवले ॥ ५४ ॥ परकायाप्रवेशार्थ जाण ।

—[illegible] साधक देहसिद्धीसाठींच हें सर्व करितात म्हणून त्यांना दोष देतात—

केचित् [illegible] विविधोपायैः इमं देहं सुकल्पं वयसि स्थिरं च विधाय अथ सिद्धये युञ्जन्ति–कांहीं बुद्धिमान् साधक [illegible] दुग्धादि अनेक उपायांनीं त्या शरीराला जरा-रोगादिकांनीं रहित व तारुण्यांत स्थिर करून निर्द्वंद्व, परकायाप्रवेश इत्यादि [illegible] तद्धारणारूप योग अनुष्ठितात. ४१.

[illegible] देह [illegible] सर्व प्रारब्धाधीन आहे. त्याला प्रारब्धानेंच जन्म-मरण येतें, असें असतां त्या देहाला हे पामर अ[illegible] पहातात. ४२ प्रारब्धाचें सगळें सूत्र काळाच्या अधीन असतें. म्हणून काळानें केलेलें जन्म-मरण स[illegible] लेलें आहे. ४३ ज्याला चौदा कल्प आयुष्य होतें त्या मार्कंडेयालाहि शेवटीं काळानें गांठलेंच. [illegible] त्याचा एक केंस गळून पडत असे, अशा लोमहर्षांचीहि काळानें मान मुरगाळली. ४४ ब्रह्मदेवाचा [illegible] हजार युगांचा असतो. तो सगळ्या सृष्टीला उत्पन्न करणारा असतांहि काळ त्याला आपल्य[illegible] ४५ सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाला व पालनकर्त्या विष्णूला काळ ग्राशितो. तो प्रबल काळ प्रलयरुद्राचेंहि [illegible].४६ असा हा काळ अति दुर्धर आहे. परंतु हें न जाणतां पामरजन काळावर जय मिळवूं इच्छि[illegible] करूं पहातात. ४७ जेवढें दिसतें तेवढें सगळें नाश पावतें. ही काळसत्ता जगाला स्पष्ट भासत असतांहि [illegible] होण्याच्या वेडानें केवढे प्रयास करीत असतात ! ४८ डबक्यांतील तरंग जर अजरामर होण्याची [illegible] डबक्याचाच नाश झाल्यावर त्या तरंगाला कोण वांचविणार ! ४९ त्याप्रमाणें मूळ संसारच [illegible] त्यांतील देहाला अजरामर करण्याचा प्रयत्न अपार क्लेश सोसून करितात. ६५० देह [illegible] चिरंजीव व्हावा. त्याकरितां उपाय करावा. तसेंच या नरदेहाचें अमरत्व आहे. [illegible] त्याला अविवेकी धाडशी लोक अनेक प्रकारचे कष्ट सोसून अजरामर करूं पहा[illegible] खाद्य आहे. त्याला अजरामर करावयास साधक जेवढे उपाय करितो, तेवढे [illegible] अशा प्रकारें मूर्खपणानें देहाच्या अमरत्वासाठीं अनेक हठयोगी खडतर [illegible] साठीं प्राणधारणा करून कित्येक थकले. देहाभिमानानें

शिणले साधितां प्राणधारण । एवं धरितां देहाभिमान । योगिजन नाडले ।। ५५ ।। देहाचें नश्वरपण । जाणोनियां सज्ञान । न धरिती ते देहाभिमान । तेंचि निरूपण हरि सांगे ।। ५६ ।।

न हि तत्कुशलादृत्यं तदायासो ह्यपार्थकः । अन्तवत्त्वाच्छरीरस्य फलस्येव वनस्पतेः ।। ४२ ।।

विचारितां हा संसार । समूळ अवघा नश्वर । तेथ देहाचा अजरामर । ज्ञाते आदर न करिती ।। ५७ ।। देह अजरामरविधीं । ज्ञाता सर्वथा न घाली बुद्धी । देहीं साधिल्या ज्या सिद्धी । त्या त्रिशुद्धी बाधिका ।। ५८ ।। देह तापल्या ज्वरादि तापें । तदर्थ मरणभयें कांपे । तेथ शीतळ आणिल्याही साक्षेपें । तेणेंही रूपें मरणचि ।। ५९ ।। मिथ्या देहींचा देहाभिमान । सदा भोगवी जन्ममरण । तो अजरामर करितां जाण । देहबंधन दृढ झालें ।। ६६० ।। साधोनियां योगसाधन । दृढ केलें देहबंधन । देहींच्या सिद्धि भोगितां जाण । अधःपतन चुकेना ।। ६१ ।। हो कां ज्ञानार्थ योग साधितां । प्रसंगें सिद्धि आलिया हाता । त्याही त्यागाव्या तत्त्वतां । निजस्वार्थालागुनी ।। ६२ ।। ज्याची चाल रायापाशीं । लांच हाता ये तयासी । तेणेंचि पावे अपमानासी । तेवीं साधकासी घातका सिद्धी ।। ६३ ।। वृक्षासी मोडूनि आलिया फळें । त्या फळांसी वृक्ष नातळे । तेवीं आलिया सिद्धींचे सोहळे । वैराग्यबळें त्यागावे ।। ६४ ।। कोरडे वैराग्यबळें । त्याग कीजे तो आडखळे । त्याग विवेकवैराग्यमेळें । तैं सिद्धींचे सोहळे तृणप्राय ।। ६५ ।। आंधळें हातिरूं मातलें । पतन देखे आपुलें । तेवीं अविवेकें त्याग केले । ते ते गेले अधःपाता ।। ६६ ।। मूळीं देहचि नश्वर एथ । तेथींच्या सिद्धि काय शाश्वत । ऐसे विवेकवैराग्ययुक्त । होय अलिप्त देहभोगा ।। ६७ एथ देह तितुका अनित्य । आत्मा एक नित्य सत्य । हें जाणोनि विवेकयुक्त । जडले निश्चित आत्माभ्यासीं ।। ६८ ।।

योग्यांना असें नाडलें आहे. ५५ पण सज्ञानलोक देह नश्वर आहे हें जाणून देहाभिमान धरीत नाहींत. आतां श्रीहरि याचेंच निरूपण करीत आहे. ६५६.

तत् कुशलादृत्यं न हि—पण हें त्यांचें कृत्य विद्वान् लोकांना आदरणीय नाहीं. हि तदायासः अपार्थकः—कारण त्याचा आदर करणें व्यर्थ आहे. वनस्पतेः फलस्य इव शरीरस्य अन्तवत्त्वात्—कारण वृक्षाच्या फळाप्रमाणें शरीराला विनाशित्व आहे. [वृक्षाप्रमाणें आत्मा स्थिर व फळाप्रमाणें देह नश्वर आहे.] ४२.

या प्रपंचाचा विचार केला असतां तो सगळा समूळ नश्वर आहे. यास्तव ज्ञानी देहाच्या अजरामरत्वाला महत्त्व देत नाहींत. ५७ देह अजरामर करण्याच्या उपायाकडे ज्ञानी लक्षच देत नाहीं. कारण देहाला प्राप्त झालेल्या सिद्धि खरोखर बाधक आहेत. ५८ ज्वरादिकांच्या योगानें देह तापला असतां तो मरणाच्या भयानें कांपूं लागतो. त्याला शीतोपचार केल्यास त्यानेंहि मरणच येतें. ५९ मिथ्या देहावरील देहाभिमानच सतत जन्म-मरण भोगवीत असतो. त्या देहाला जरी अजरामर केलें तरी देहबंधन दृढच होतें. ६६० योगसाधन साध्य करून देहबंधन जरी दृढ केलें तरी देहाच्या सिद्धि भोगूनहि अधःपात चुकत नाहीं. ६१ म्हणून ज्ञानासाठीं योगसाधन करीत असतां प्रसंगीं सिद्धि जरी हातीं आल्या तरी आपल्या खऱ्या स्वार्थासाठीं त्यांचाहि त्याग करावा. ६२ राजापाशीं ज्याचा प्रवेश असतो तोच लांच खातो; पण त्यायोगें त्याचा जसा अपमान होतो, त्याप्रमाणें साधकाला सिद्धि घातक आहेत. ६३ वृक्ष फळांच्या भारानें जरी वांकला तरीहि तो त्या फळांना स्पर्शहि करीत नाहीं, त्याप्रमाणें सिद्धींचें सुख प्राप्त झालें तरी त्यांस स्पर्शहि करूं नये. वैराग्यबळानें कोरड्या विरक्तीनें त्यांचा त्याग केल्यास तो टिकत नाहीं. पण विवेक व वैराग्य या दोहोंच्या ऐक्यानें सिद्धींचें वैभव केवळ तृणवत् समजतो. ६५ आंधळा हत्ती जर मत्त झाला, तर तो स्वतःच खड्ड्यांत पडून जसा नाश पावतो, त्याप्रमाणें अविवेकानें त्याग करणारे अधोगतीला जातात. ६६ देहच जर मुळीं नश्वर आहे, तर मग त्याच्या सिद्धि शाश्वत कशा असतील! असा विवेक-वैराग्यानें विचार करून साधक देहभोगापासून अलिप्त रहातो. ६७ यास्तव देह तेवढा अनित्य आहे, एक आत्माच काय तो सत्य व नित्य आहे. हें जाणून विवेकी जन आत्मचिंतनांतच चित्त गुंतवितात. ६६८.

योगं निषेवतो नित्यं कायश्चेत्कल्पतामियात् । तच्छ्रद्दध्यान्न मतिमान्योगमुत्सृज्य मत्परः ॥ ४३ ॥

योग साधितां परमार्थी । सिद्धि वश्य झालिया होती । त्या त्यागाव्या तत्त्वतां । निजस्वार्थीलागूनी ॥ ६९ ॥ सिद्धि त्यागितां न वचती । भोगबळें गळां पडती । तरी तें सांडूनि योगस्थिती । माझे भजनपंथीं लागावें ॥ ६७० ॥ माझिये भक्तीच्या निजमार्गीं । रिगमू नाहीं विघ्नांलागीं । मी भक्तांच्या प्रेमभागीं । रंगलों रंगीं श्रीरंग ॥ ७१ ॥ सद्भावें करितां माझी भक्ती । भक्तांसी नव्हे विघ्नप्राप्ती । भक्त सबाह्य मी श्रीपती । अहोरात्रीं मी रक्षीं ॥ ७२ ॥ करितां भगवद्भजन । भक्तांसी बाधीना विघ्न । ते भक्तीचें महिमान । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ७३ ॥

योगचर्यामिमां योगी विचरन् मदपाश्रयः । नान्तरायैर्विहन्येत निःस्पृहः स्वसुखानुभूः ॥ ४४ ॥

अनन्यप्रीतीं मज शरण । सर्व भूतीं मद्भावन । अभेदबुद्धीं माझें भजन । त्यासी सर्वथा विघ्न बाधीना ॥ ७४ ॥ माझ्या भक्ताचे उपसर्ग । सकळ निर्दळीं मी श्रीरंग । ज्यासी अनन्य भजनयोग । त्यासी माझें निजांग वस्तीसी ॥ ७५ ॥ जेथ विघ्न धांवे भक्तांकडे । तेथ माझी उडी पडे । निवारीं निजभक्तांचें सांकडें । तीं लळिवाडें पैं माझीं ॥ ७६ ॥ तीं लळिवाडें म्हणशी कैसीं । त्यांचें सांकडें मी सदा सोशीं । राजा दंडितां प्रल्हादासी । म्यां सर्वार्थें त्यासी रक्षिलें ॥ ७७ ॥ संकट मांडिलें

—'अहोपण, एखादेवेळीं [illegible] अंतस्त्वानेंहि प्राणायामादि करीत असतांना जरा-रोगादिकांचा अभाव झालेला दिसतो !' उत्तर—खरें आहे तथापि [illegible] सोडून त्यातच आसक्त होऊं नये, असें आतां सांगतात—

योगं नित्यं निषेवतः कायः कल्पतां इयात् चेत्—सतत योगाभ्यास करणाऱ्या योगाचा देह जर सिद्धीला प्राप्त होईल, तर, मत्परः मतिमान् योगं उत्सृज्य तत् न श्रद्दध्यात्—मत्परायण झालेल्या बुद्धिमान् योग्यानें योगाभ्यासाचा त्याग करुन त्या देहसिद्धीवर विश्वास ठेवूं नये. ४३.

[illegible]साठीं योगसाधन करि[illegible] असतां सिद्धि वश झाल्या तरी त्यांचा आपल्या हितासाठीं तत्त्वतः त्याग करावा. ६९. सिद्धि सोडल्या [illegible] नाहींत. भोगाची लालुच दाखवून त्या गळीं पडतात. तेव्हां योगाची खटपट [illegible] भजनमार्गा[illegible]. ६७० माझ्या भक्तिमार्गांत विघ्नांचा प्रवेश नाहीं. कारण मी श्रीरंग भक्तांच्या प्रेमरंगा[illegible]. ७१ [illegible] माझी भक्ति केली असतां भक्तांवर विघ्नें कधींहि येत नाहींत. मी श्रीपति भक्तांचें [illegible] रात्रंदिवस [illegible]. ७२ म्हणून भगवद्भजन केलें असतां भक्तांस विघ्न बाधत नाहीं. आतां तोच [illegible] आहे. ७३.

—[illegible] करुन योगाभ्यास करावा ' असें सांगितलें. आतां मच्छरण झालेल्या साधकाला विघ्नांचें [illegible]—

[illegible] निःस्पृहः योगी इमां योगचर्या विचरन् आन्तरायैः न विहन्येत—मत्परायण झालेला निःस्पृह व [illegible] आला आहे असा योगी या पूर्वोक्त योगचर्येचें अनुष्ठान करणारा असा होत्साता विघ्नांनीं [illegible] कारण विषयतृष्णा आहे. माझा आश्रय केलेल्या योग्याची विषयतृष्णा निवृत्त होते. त्यामुळें [illegible] नाहींत व तो स्वानंदपूर्ण होतो.] ४४.

जे [illegible], सर्व प्राणिमात्रांत ईश्वरभाव ठेवितात व अभेदभावानें माझें भजन करितात त्यांस [illegible] नाहींत. ७४ मी श्रीरंग माझ्या भक्तांची सगळीं विघ्नें निवारतों. जो माझी अनन्य भक्ति करितो, [illegible] आधार सांपडतो. ७५ माझ्या भक्ताकडे विघ्नें धांव घेतांच मी तेथें उडी टाकितों व भक्तांवरील [illegible] ते माझे आवडते असतात. ७६ ते तुझे लाडके कसे ! असें जर म्हणशील, तर ऐक [illegible] सोशितों. प्रल्हादाला राजानें शिक्षा करतांच मीं ती सर्व सोशिली. ७७ अंबरी-

अंबरीषासी । तैं म्यां अपमानिलें दुर्वासासी । दाही गर्भवास स्वयें मी सोशीं । उणें भक्तांसी येऊं नेदीं ॥ ७८ ॥ बाधा होतां गजेंद्रासी । हातीं बसवूनि सुदर्शनासी । उडी घालूनि त्यापाशीं । निमिषार्धेसीं सोडविला ॥ ७९ ॥ द्रौपदीचिये अतिसांकडीं । सभेसी करितां तें उघडी । म्यां निजांगें घालूनि उडी । वस्त्रांच्या कोडी पुरविल्या ॥ ६८० ॥ द्रौपदीचिया हातीं देतां वस्त्रघडी । नेसतां दिसेल ते उघडी । यालागीं मी लवडसवडीं । नेसलीं लुगडीं स्वयें झालों ॥ ८१ ॥ दावाग्नीं पीडितां गोपाळ । निजमुखीं म्यां गिळिला ज्वाळ । एथवरी भक्तांची कळकळ । मज सर्वकाळ उद्धवा ॥ ८२ ॥ द्रौण्यस्त्राचे बाधेहातीं। म्यां गर्भीं रक्षिला परीक्षिती । गोकुळ पीडितां सुरपती । म्यां धरिला हातीं गोवर्धन ॥ ८३ ॥ वांचवावया अर्जुनासी । दिवसा लपविलें सूर्यासी । हार पतकरूनि रथभूमीसी । सत्य भीष्मासी म्यां केलें ॥ ८४ ॥ ऐसा मी भक्तसहाकारी । नित्य असतां शिरावरी । भक्तासी विघ्न कोण करी । मी श्रीहरि रक्षिता ॥ ८५ ॥ जे अनुसरले मद्भक्तीसी । मी विघ्न लागों नेदीं भक्तांसी । निजांग अर्पोनियां त्यांसी । निजीं निजसुखेंसीं नांदवीं ॥ ८६ ॥ भावें करितां माझी भक्ती । साधकां स्वसुखाची प्राप्ती । तेथें इच्छेसीं कामलोभ जाती । माझी सुखस्थिति मद्भक्तां ॥ ८७ ॥ म्हणसी भक्तांसी देहांतीं । होईल निजसुखाची प्राप्ती । तैशी नव्हे चौथी भक्ती । देहीं वर्ते स्थिति सुखरूप ॥ ८८ ॥ देह राहो अथवा जावो । परी सुखासी नाहीं अभावो । यापरी मद्भक्त पहा हो । सुखें सुखनिर्वाहो भोगिती ॥ ८९ ॥ भक्त वर्ततां दिसती देहीं । परी ते वर्तती माझ्या ठायीं । मी अवघाचि त्यांच्या हृदयीं । सर्वदा पाहीं नांदत ॥ ६९० ॥ भक्त निजबोधें मजभीतरी । मी निजांगें त्यां आंतबाहेरी । एवं निजसुखाच्या माजघरीं । परस्परीं नांदत ॥ ९१ ॥ मी देव तो एक भक्त । हेही बाहेरसवडी मात । विचारतां आंतवटा अर्थ । मी आणि भक्त एकचि ॥ ९२ ॥ तूप थिजलें विघुरलें देख । तेवीं मी आणि भक्त दोनी एक । मज

षावर संकट येतांच मीं दुर्वासऋषीचा अपमान केला व त्याचे दहा गर्भवास स्वतः सोशिले. मी भक्ताकडे कांहीं कमीपणा येऊं देत नाहीं. ७८ गजेंद्रावर विघ्न येतांच मी हातीं सुदर्शनचक्र घेऊन, उडी घालून त्याला अर्ध्या-क्षणांत सोडविलें. ७९ द्रौपदीवर कौरवसभेंत उघडी होण्याचा अतिशय बिकट प्रसंग आला असतां मी स्वतः तत्क्षणीं उडी टाकून तिला वस्त्रांच्या राशी पुरविल्या. ६८० द्रौपदीच्या हातांत वस्त्राची घडी दिल्यास तें नेसतेवेळीं ती उघडी दिसेल म्हणून मी स्वतःच मोठ्या त्वरेनें तिचीं नेसतीं लुगडीं झालों. ८१ दावाग्नीनें गोपाळांना पीडा दिली असतां मीं आपल्या मुखानें ती ज्वाला गिळली. उद्धवा ! मला भक्तांची अशी सतत कळकळ असते. ८२ मीं अश्वत्थाम्याच्या शस्त्रापासून गर्भांत परीक्षितीचें रक्षण केलें. इंद्रानें गोकुळाला पीडा दिली असतां मीं गोवर्धन पर्वत हातावर झेलला. ८३ अर्जुनाला वांचविण्यासाठीं जयद्रथाच्या युद्धांत मीं दिवस असतांच सूर्याला लपविलें. मीं स्वतः प्रतिज्ञाभंग करून भीष्माचार्याला युद्धांत सत्यप्रतिज्ञ केलें. ८४ असा मी भक्तांचा साह्यकर्ता नित्य शिरावर असतां भक्तांना कोण विघ्न करणार ! मी श्रीहरि त्यांचा रक्षणकर्ता आहें. ८५ ज्यांनीं माझ्या भक्तीचा मार्ग धरिला आहे, त्या माझ्या भक्तांस मी विघ्नांचा स्पर्शहि होऊं देत नाहीं. माझें अंगच त्यांना अर्पण करून त्यांस आपल्या आत्म-सुखांत ठेवितों. ८६ भावानें माझी भक्ति केली असतां साधकाला आत्मसुखाची प्राप्ति होते, इच्छेसह काम व लोभ निघून जातात व माझ्या भक्तांना माझ्या आत्मसुखाची स्थिति लाभते. ८७ ' त्यांना मरणानंतर आत्मसुख मिळत असेल ' असें जर म्हणशील, तर माझी चवथी भक्ति तशी नाहीं. ८८ या देहांत असतांनाच आत्मसुख प्राप्त होतें. देह जावो किंवा राहो त्या सुखाचा कांहीं अभाव नाहीं. याप्रमाणें माझे भक्त सहज आत्मसुखाचा अनुभव घेतात. ८९ भक्त जरी देहांत वागत असलेले दिसले, तरी वास्तविक ते माझ्यांतच असतात. मी पूर्णपणें त्यांच्या हृदयांत सतत रहात असतों. ६९० भक्त आत्मज्ञानानें मजमध्यें असतो व मी स्वतः त्याच्या आंत-बाहेर असतों. याप्रमाणें आत्मसुखाच्या माजघरांत आम्ही दोघेहि रहात असतों. ९१ (सु. गी. ९-२९ पृ. १८७) मी देव आणि तो भक्त हें बोलणेंहि वरपांगी आहे. विचाराअंतीं अंतरंगानें मी आणि भक्त एकच आहोंत. ९२ थिजलेलें व वितळलेलें

भक्तासी वेगळिक । कल्पांतीं देख असेना ॥ ९३ ॥ मी तो एकचि एथें । हेंही म्हणावया नाहीं म्हणतें । यापरी मिळोनि मातें । भक्त निजसुखातें पावले ॥ ९४ ॥ तो हा ब्रह्मज्ञानाचा कळसू । अध्याय जाण अठ्ठाविसू । बाप बिंदानी हृषीकेशू । तेणें देउळासी कळसू मेळविला ॥ ९५ ॥ जेवीं अळंकारीं मुकुटमणी । तेवीं अठ्ठाविसावा ब्रह्मज्ञानीं । श्रीकृष्ण भक्तांची निजजननी । तो उद्धवालागोनि शृंगारी ॥ ९६ ॥ माता उत्तम अळंकारकोडीं । अपत्य शृंगारी अतिआवडीं । तेवीं उत्तमोत्तम ज्ञाननिरवडी । उद्धव कडोविकडीं शृंगारिला ॥ ९७ ॥ मातेसी आवडे निपटणें । तेवीं उद्धव वृद्धपणींचें तानें । श्रीकृष्ण त्याकारणें । गुह्यज्ञानें शृंगारी ॥ ९८ ॥ माता बाळकातें शृंगारी । तें लेणें मागुतें उतरी । उद्धव शृंगारिला श्रीहरी । तें अंगाबाहेरी निघेना ॥ ९९ ॥ अंगीं लेणें जडलें अलोलिक । तेणें गुणें उद्धव झाला अमोलिक । पायां लागती तीनी लोक । ब्रह्मादिक पूजिती ॥ ७०० ॥ निजात्मअळंकारें श्रीपती । उद्धव शृंगारिला ब्रह्मस्थितीं । तेणें वंद्य झाला त्रिजगतीं । त्यातें पुराणीं पढती महाकवी ॥ १ ॥ गोडीमाजीं श्रेष्ठ अमृत । तेंही फिकें करूनि एथ । उद्धवालागीं परमामृत । श्रीकृष्णें निश्चित पाजिलें ॥ २ ॥ अमर अमृतपान करिती । तेही मरणार्णवीं बुडती । उद्धव अजयी केला श्रीपती । कथामृतीं निववूनी ॥ ३ ॥ तेणें तो सर्वांगीं निवाला । परमानंदीं तृप्त झाला । तेणें उद्धवत्वा विसरला । डोलों लागला स्वानंदें ॥ ४ ॥ तेव्हां स्वानंदउन्मत्तता । दुजें निर्दळी देखतां । संसारा हाणोनि लाता । चढे माथां देवांच्या ॥ ५ ॥ चढोनि देवांचियां माथां । शेखीं गिळी देवभक्तता । मग सच्चिदानन्दस्वानन्दता । निजात्मता स्वयें झाला ॥ ६ ॥ तेथ सत् चित् आनंद । हाही नाहीं त्रिविध भेद । सदोदित परमानन्द । स्वानंद शुद्ध कोंदला ॥ ७ ॥ नश्वर त्यागाचिये

तूप जसें भिन्न दिसावें तसें मी आणि भक्त दोन दिसतों, पण वस्तुतः एकच आहोंत. ९३ माझ्यांत आणि माझ्या भक्तांत कल्पांतींहि भेद नसतो.मी व तो एकच आहोंत असें म्हणणारेंहि कोणी नाहीं. ९४ याप्रमाणें भक्त माझ्याशीं एकरूप होऊन माझ्या आत्मसुखाला प्राप्त झाले. तो हा अठ्ठाविसावा अध्याय ब्रह्मज्ञानाचा कळसच आहे. कुशल शिल्पकार श्रीकृष्णानें हा देवळावर कळस चढविला. ९५ अलंकारांत जसा मुकुटमणि असतो, तसा ब्रह्मज्ञानांत हा अठ्ठाविसावा अध्याय आहे. श्रीकृष्ण भक्तांची माऊली असल्यामुळें त्यानें उद्धवाला शृंगारिलें. ९६ माता जशी विपुल अलंकारांनीं आपल्या तान्हुल्याला अत्यंत आवडीनें सजविते त्याप्रमाणें श्रीकृष्णानें उत्तमोत्तम ज्ञाननिर्णयानें उद्धवाला नख-शिखांत भूषविलें. ९७ मातेला जसें शेवटलें अपत्य आवडतें, तसा उद्धव श्रीकृष्णाचें वृद्धपणांतील बालक होता, म्हणून त्यानें त्याला आपल्या गुह्य ज्ञानानें सजविलें. माता बालकाच्या अंगावर दागिने घालिते, पण पुनः ते काढून ठेविते. परंतु श्रीहरीनें उद्धवाला एकदां जे अलंकार घातले ते त्याच्या अंगावरून निघालेच नाहींत. ९९ अलौकिक भूषणें अंगाला जडल्यामुळें उद्धव अमोलिक झाला. त्रिभुवन त्याच्या पायां पडूं लागलें व ब्रह्मदेवादि त्याची पूजा करूं लागले. ७०० श्रीपतीनें आत्मज्ञानरूपी अलंकारानें उद्धवाला भूषित केल्यामुळें तो ब्रह्मस्थितीला प्राप्त झाला, त्रिभुवनांत वंद्य झाला व पुराणें त्याला महाकवि म्हणूं लागलीं. १ गोडीमध्यें जें श्रेष्ठ अमृत, त्यालाहि फिकें करून श्रीकृष्णानें उद्धवाला परम अमृत पाजिलें. २ अमर-देव अमृतपान करितात, पण तेहि अखेर मृत्युसागरांत बुडतात; पण श्रीपतीनें उद्धवाला कथामृतानें तृप्त करून अक्षय करून ठेविलें. ३ त्यामुळें तो सर्वांगानें शांत झाला. परमानंदानें तृप्त झाला व त्यायोगें आपलें उद्धवपण विसरून स्वानंदानें डोलूं लागला. ४ त्याला परमानंदाचा उन्माद चढून दुजेपणा दृष्टीस पडतांच त्याचा नाश करूं लागला व प्रपंचाला लाथा हाणून तो देवांहूनहि श्रेष्ठ पदवीला चढला. ५ देवाच्या वर चढून शेवटीं त्यानें देवपणा व भक्तपणा नाहींसा केला व स्वतःच सच्चिदानंद स्वानंदानें आत्मरूप झाला. ६ तेथें सत्-चित्-आनंद हा त्रिविध भेद नाहीं. सदोदित परमानंद, शुद्ध स्वानंद भरून राहिलेला असतो. ७ नश्वराचा त्याग केला, म्हणजे त्या अनश्वरालाच सत् म्हणतात. जडाची निवृत्ति झाली कीं, त्यालाच

स्थिती । अनश्वरातें संत म्हणती । जडाची करितां निवृत्ती । चिद्रूप म्हणती वस्तूतें ॥ ८ ॥ जेथ दुःखाचा नाहीं बाधू । त्यातें म्हणती आनंदू । एवं सच्चिदानंदू । ज्ञानसंबंधू मायिक ॥ ९ ॥ वस्तु संत ना असंत । चित् नव्हे अचित् । ते सुखदुःखातीत । जाण निश्चित सन्मात्र ॥ ७१० ॥ हा अठ्ठाविशींचा निजबोध । उद्धवासी तुष्टोनि गोविंद । देता झाला आनंदकंद । भाग्यें अगाध तो एक ११ ॥ सांडोनि निजधामा जाणें । स्वयें श्रीकृष्ण त्याकारणें । देता झाला निजगुह्य ठेवणें । त्याचें भाग्य वानणें तें किती ॥ १२ ॥ जें नेदीच पित्या वसुदेवासी । जें नेदीच बंधु बळभद्रासी । जें नेदीच पुत्रा प्रद्युम्नासी । तें उद्धवासी दीधलें ॥ १३ ॥ जें नेदीच देवकीमातेसी । जें नेदीच कुंती आतेसी । शेखीं नेदीच यशोदेसी । तें उद्धवासी दीधलें ॥ १४ ॥ म्हणाल सांगीतलें अर्जुनासी । तोही अत्यंत पढियंता त्यासी । त्याहातीं उतरावया धराभारासी । युद्धीं त्वरेंसी उपदेशिला ॥ १५ ॥ तैसें नव्हे उद्धवाकडे । सावकाश निजनिवाडें । गुप्त ठेवणें फाडोवाडें । अवघें त्यापुढें अर्पिलें ॥ १६ ॥ पित्याचिया निजधनासी । स्वामित्व लाभे निजपुत्रासी । तेवीं श्रीकृष्णाचिया गुह्यज्ञानासी । झाला मिराशी उद्धव ॥ ४७ ॥ पांडवांमाजीं धन्य अर्जुन । यादवांमाजीं उद्धव धन्य । या दोघांच्या भाग्यासमान । न दिसे आन त्रिजगतीं ॥ १८ ॥ सकळ साराचा निजसारांश । तो हा एकादशीं अठ्ठावीस । जेवीं यतींमाजीं परमहंस । तेवीं अष्टाविंश भागवतीं ॥ १ ॥ जेवीं क्षीराब्धीमाजीं शेषशयन । त्याहीवरी जैसा नारायण । तेवीं भागवतामाजीं जाण । ब्रह्मपरिपूर्ण अष्टाविंश ॥ ७२० ॥ जेवीं वैकुंठ परम पावन । त्यावरी विराजे श्रीभगवान । तेवीं भागवतामाजीं जाण । विराजमान अष्टाविंश ॥ २१ ॥ एवढें या महत्त्वाचें वैभव । कृष्णकृपेनें पावला उद्धव । बाप निजभाग्याची धांव । ब्रह्म स्वयमेव स्वयें झाला ॥ २२ ॥ उद्धव झाला ब्रह्म पूर्ण । त्यासी कृष्णकृपा प्रमाण । तें मी वाखाणीं अज्ञान । देशभाषण प्राकृत ॥ २३ ॥

चिद्रूप म्हणतात. ८ जेथें दुःखाची पीडा होत नाहीं, त्याला आनंद म्हणतात. पण सच्चिदानंद हाहि मायिक ज्ञानसंबंध आहे. ९ आत्मवस्तु सत् नाहीं, व असत्‌हि नाहीं. चित् नव्हे व अचित्‌हि नव्हे. तें सन्मात्र सुख-दुःखांहून अतीत आहे. ७१० आनंदकंद गोविंदानें संतुष्ट होऊन या अठ्ठाविसाव्या अध्यायांत आत्मबोध उद्धवाला दिला. तो एकटाच असा महान् भाग्यवान् होय. श्रीकृष्णानें त्याच्यासाठीं आपलें निजधामाला जाणें बाजूला ठेविलें आणि त्याला आपलें गुह्य ज्ञान दिलें, तेव्हां त्याच्या भाग्याचें वर्णन किती करावें ! १२ त्यानें जें आपल्या वसुदेव पित्याला दिलें नाहीं, बलराम बंधूला दिलें नाहीं, प्रद्युम्न पुत्राला दिलें नाहीं, तें ज्ञान उद्धवाला दिलें. १३ त्यानें जें देवकी मातेला दिलें नाहीं, कुंती आतेला दिलें नाहीं, शेवटीं यशोदेलाहि दिलें नाहीं, तें ज्ञान त्यानें उद्धवाला दिलें. १४ 'त्यानें अर्जुनाला हें ब्रह्मज्ञान सांगितलें होतें' असें जर म्हणाल, तर अर्जुनहि त्याचा असाच अत्यंत आवडता होता. त्याच्या हातून पृथ्वीचा भार उतरविण्यासाठीं श्रीकृष्णानें युद्धधुमाळींत त्याला अतिशय गडबडीनें घाईंत उपदेश केला. १५ उद्धवाची स्थिति तशी नव्हती. त्याला त्यानें आपलें मत सावकाश व स्पष्टपणें सांगितलें आणि ज्ञानाचा सगळा गुप्त ठेवा उघड करून दाखविला. १६ पित्याच्या मरणोत्तर त्याचा पुत्र संपत्तीचा जसा वारस होतो, त्याप्रमाणें श्रीकृष्णाच्या गुह्य ज्ञानाचा उद्धव मालक झाला. १७ पांडवांमध्यें अर्जुन धन्य होय आणि यादवांमध्यें उद्धव धन्य होय. या दोघांसारखा भाग्यवान् त्रिभुवनांत तिसरा कोणी दिसत नाहीं. १८ सगळ्या सारांचें सार असा हा एकादश स्कंधांतील अठ्ठाविसावा अध्याय आहे. १८ यतींमध्यें जसा परमहंस तसा भागवतांत हा अठ्ठाविसावा अध्याय आहे. १९ क्षीरसागरांत जसें शेषशयन व त्यावर जसा नारायण, तसा भागवतांतील हा अठ्ठाविसावा अध्याय पूर्णब्रह्म आहे. ७२० परम पावन वैकुंठांत जसा भगवान् शोभतो तसा भागवतांत अठ्ठाविसावा अध्याय झळकतो. २१ उद्धवाला श्रीकृष्णकृपेनें इतक्या महत्त्वाचें वैभव प्राप्त झालें. त्याच्या भाग्याची धांव मोठी अजब खरी कीं, तो स्वतःच ब्रह्म झाला. २२ उद्धव पूर्णब्रह्म झाला, याला श्रीकृष्णकृपा प्रमाण आहे. मी अज्ञ प्राकृत-देशीभाषेंत त्याचें वर्णन करीत आहें. २३ आंधळ्यावर सूर्य प्रसन्न झाला म्हणजे तो जसा भूमींतील गुप्त ठेवाहि

अंधासी सूर्य प्रसन्न । झालिया देखे तो निधान । तेवीं प्रकटोनि जनार्दन । हें गुह्यज्ञान बोलवी ॥ २४ ॥ जनार्दन प्रकटला आतां । हें बोलणें माझी मूर्खता । तो स्वतःसिद्ध सदा असतां । हेंही झालों मी जाणता त्याचिया कृपा ॥ २५ ॥ त्याचिया कृपें ऐसें केलें । माझें मीपण निःशेष नेलें । नेलेपण देखों नाहीं दीधलें । जेवीं सूर्यें केलें अंधारा ॥ २६ ॥ मज कृपा करील जनार्दन । हेंही नेणें मी अज्ञान । तेणें दयाळुवें कृपा करून । हें गुह्यज्ञान बोलविलें ॥ २७ ॥ निकट असतां जनार्दन । मी नेणें त्याचें महिमान । तेणें आपला महिमा आपण । मजमुखें जाण बोलविला ॥ २८ ॥ मी जें म्हणे माझें मुख । तेंही जनार्दन झाला देख । तेणें मुखें निजात्मसुख । बोलवी निशंक निजात्मसत्ता ॥ २९ ॥ एवं माझेनि नांवें कविता । परी जनार्दनाचि झाला वक्ता । तेणें वक्तेपणें तत्त्वतां । रसाळ कथा चालली ॥७३०॥ ब्रह्मरसें रसाळ कथा निरूपिलें श्रीभागवता । त्यामाजीं ब्रह्मतल्लीनता । जाण तत्त्वतां अष्टाविंश ॥ ३१ ॥ अठ्ठाविसाव्याचें निरूपण । तें तत्त्वतां ब्रह्म पूर्ण । श्रद्धेनें करितां श्रवण । उद्धव संपूर्ण निवाला ॥ ३२ ॥ उद्धव निवोनियां आपण । स्वयें विचारितां झाला जाण । म्हणे हें शुद्ध आत्मज्ञान । परी प्राप्त कठिण अबळांसी ॥ ३३ ॥ या चित्स्वरूपाची प्राप्ती । सुगम होय साधकांप्रती । पुढील अध्यायाचे अर्थीं । उद्धव विनंती करील ॥ ३४ ॥ कडा फोडूनि मार्ग कीजे । कां उंचीं फरस बांधिजे । तेवीं सुगमें निर्गुण पाविजे । तो उपाव पूसिजे उद्धवें ॥ ३५ ॥ ब्रह्मप्राप्तीचा सुगम उपावो । स्वयें सांगेल देवाधिदेवो । तो सुरस पुढील अध्यावो । साधकां पहा हो परमार्थसिद्धी ॥ ३६ ॥ पव्हणियाविण पायउतारा । अबळीं उतरिजे भवसागरा । तैसा साधकांलागीं सोपारा । उपाव पुढारा हरि सांगे ॥ ३७ ॥ सीतेचेनि कृपापडिभारें । सेतु बांधिजे रामचंद्रें । तेथ समुद्र तरिजे वानरें । जें वनचरें अतिमंदें ॥ ३८ ॥ तेवीं उद्धवप्रश्नप्रीतीसी । भवाब्धिसेतु हृषीकेशी । बांधिला निजभक्तिउपायेंसी । तेथ तरती आपैसीं भाविकें अबळें ॥ ३९ ॥ कृष्णभक्तिसेतुद्वारें । तरलीं जड मूढ पामरें । ते भक्ति सांगिजेल यादवेंद्रें । श्रोतां सादरें परिसिजे ॥ ७४० ॥ एका जनार्दना शरण । तेणें श्रोते सुप्रसन्न । पुढील अध्यायाचें कथन । तेणें साधक जन तरतील ॥ ४१ ॥

पाहूं शकतो, त्याप्रमाणें जनार्दनानें प्रकट होऊन हें गुह्यज्ञान मजकडून बोलविलें. २७ जनार्दन अगदीं समीप असतां मी त्याचा महिमा जाणला नाहीं; तेव्हां त्यानें आपला महिमा माझ्या तोंडून वदविला. २८ मी ज्याला 'माझें मुख' म्हणतों, तेंहि जनार्दन स्वतःच झाला व त्या मुखानें त्यानें आत्मसत्तेनें आत्मसुख निःशंकपणें बोलविलें. २९ याप्रमाणें त्यानें माझ्या नांवानें कविता केली; पण जनार्दन स्वतःच वक्ता झाला व त्यानें आपल्या वक्तृत्वानें रसाळ कथा चालविली. ७३० श्रीभागवतांत ब्रह्मरसाच्या रसाळ कथेचें निरूपण केलें आहे. त्यांतील अठ्ठाविसाव्या अध्यायांत ब्रह्मतल्लीनता आहे. ३१ अठ्ठाविसाव्या अध्यायाचें निरूपण खरोखर पूर्ण ब्रह्मच आहे. त्याचें श्रद्धेनें श्रवण करितांच उद्धव पूर्णपणें तृप्त झाला. ३२ तो स्वतः तृप्त होऊन श्रीकृष्णाला पुढें 'हें शुद्ध आत्मज्ञान आहे खरें; पण तें अज्ञदुर्बलांस प्राप्त होणें कठिण आहे. ३३ तरी या चित्स्वरूपाची प्राप्ति साधकाला सुलभ होईल, असा उपाय सांग' असें पुढील अध्यायांत विचारील. ३४ कडा फोडून मार्ग काढावा व त्यावर उंच फरसबंदीचा घाट बांधावा. त्याप्रमाणें ज्यायोगें निर्गुण ब्रह्म सुलभ होईल, असा उपाय उद्धव विचारील. ३५ व देवाधिदेव श्रीकृष्ण स्वतः ब्रह्मप्राप्तीचा सोपा उपाय पुढील अध्यायांत सांगेल ती सुरस कथा साधकांना परमार्थसिद्धि करून देईल. ३६ पोहल्याशिवाय केवळ पायउतारानें अज्ञ जनांना संसारसागरांतून तरून जातां यावें, असा सोपा उपाय पुढें श्रीकृष्ण साधकांना सांगणार आहे. ३७ श्रीरामचंद्रानें सीतेवर अनुग्रह करण्याच्या निमित्तानें सेतु बांधिला; पण त्यायोगें मूढ वनचर जे वानर ते सुद्धां तरून गेले, ३८ त्याप्रमाणें उद्धवप्रश्नाच्या प्रेमासाठीं श्रीकृष्णानें आपल्या भक्तीच्या उपायानें संसारसेतु बांधिला. त्यावरून भाविक अज्ञ जन सहज तरून जातील. ३९ ज्या श्रीकृष्णभक्तिरूप सेतूच्या साह्यानें जड, मूढ, पामरजन तरून गेले, ती भक्तीच आतां यादवेंद्र श्रीकृष्ण सांगत आहे. ७४० तरी श्रोत्यांनीं सादर होऊन ऐकावें. एकनाथ जनार्दनाला शरण गेल्यामुळें श्रोते सुप्रसन्न झाले. तरी पुढील अध्यायाच्या

सांडूनियां एकपण । एका जनार्दना शरण । सुगम साचें आत्मज्ञान । तें भक्तिसाधन हरि सांगे ॥ ७४२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे परमहंससंहितायां एकाकारटीकायां परमार्थ-निर्णयो नाम अष्टाविंशतितमोऽध्यायः ॥ २८ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवतमहापुराणे एकादशस्कन्धे अष्टाविंशतितमोऽध्यायः ॥ २८ ॥

अध्याय एकोणतिसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ॐनमो श्रीगुरुदयार्णव । तुझे कृपेसी नाहीं थांव । कृपेनें तारिसी जीव । जीवभाव सांडवूनी ॥ १ ॥ सांडवूनी देहबुद्धी । निरसोनि जीवोपाधी । भक्त तारिसी भवाब्धीं । कृपानिधि कृपाळुवा ॥ २ ॥ तुझें पाहतां कृपाळूपण । जीवासी जीवें मारिसी पूर्ण । नामा रूपा घालिसी शून्य । जाति-गोत संपूर्ण निर्दळिसी ॥ ३ ॥ निर्दळूनि आपपरां । निसंतान करिसी संसारा । तो तूं जिवलग सोयरा । कृपाळु खरा घडे केवीं ॥ ४ ॥ जेवीं आंधारीं नांदते दृष्टी । भासती नक्षत्रें खद्योतकोटी । ते आंधारेंसीं सूर्य घोंटी । तेवीं तुझी भेटी साधकां ॥ ५ ॥ तुझी जेथ साचार भेटी । तुवां केलिया कृपादृष्टी । संसार-भेदाची त्रिपुटी । त्रिगुणेंसीं सृष्टी दिसेना ॥ ६ ॥ न दाखवूनि गुणादि सृष्टी । दाविसी अद्वय ब्रह्म दृष्टी । त्यासी कदा नव्हे दृष्टीभेटी । भेटीसी तुटी कदा न पडे ॥ ७ ॥ जो कदा न देखिजे दृष्टी । त्यासी केवीं

कथनानें साधक तरून जातील. ४१ एकनाथ आपला एकपणा सोडून जनार्दनाला शरण आहे. आतां श्रीहरि आत्मज्ञान सुगम होण्याचें जें भक्तिरूप साधन तें सांगेल. ७४२.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील परमार्थ-निर्णय नांवाचा अठ्ठाविसावा अध्याय समाप्त झाला.

ॐनमः । दयासागर श्रीगुरूला नमस्कार असो. तुझ्या कृपेला पार नाहीं. जीवाभावापासून सोडवून तूं कृपेनें जीवाला तारितोस, १ हे कृपानिधे, दयाळू गुरुराया ! तूं जीवाची देहबुद्धि सोडवून त्यांची उपाधि नाहींशी करितोस व भक्तांना संसारसमुद्रांतून तारितोस. २ तुझें कृपाळुत्व मोठें विलक्षण आहे. जीवाला जीवानें मारणारा व नाम-रूपाला शून्य करून त्यांचें जात व गोत यांसह निर्दाळणारा तूं दयाळु खरा ! ३ आप-पर भावनेचा नाश करून तूं संसाराचें निर्मूलन करितोस, तो तूं जीवलग, सोयरा व खरा कृपाळु होशील कसा ! ४ अंधारामध्यें दृष्टीला कोट्यवधि नक्षत्रें व काजवे दिसतात. पण सूर्य त्या अंधाराला जसा नाहींसा करितो, तशी साधकाला तुझी भेट आहे. ५ तुझी जेव्हां खरोखरच भेट होते व तूं जेव्हां कृपादृष्टीनें पहातोस, तेव्हां संसारभेदाची त्रिपुटी व त्रिगुणांसह सृष्टि दिसत नाहीं. ६ गुणादि सृष्टि न दाखवितां तूं दृष्टीला अद्वय ब्रह्म दाखवितोस, त्याला कधीं दृष्टीची भेटच होत नाहीं व भेटींत कधीं अंतरहि पडत नाहीं. ७ ज्याला कधीं दृष्टीनें पाहिलेंच नाहीं, त्याची भेट